म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १९६३

१९६३





पांच थोर नेते



प्र.रा.दामले






REFBK-0013309

मराठी ग्रंथ संग्रहालय, जळगाव.
क्रमांक ७४७३९ दिनांक १०।७।६१
वर्ग १९६३ नोंद दिनांक ७।३।६७

पांच थोर नेते


[रानडे, टिळक, आगरकर, गोखले व गांधीजी]

— विवेचनात्मक गुणग्रहण —



लेखक :
प्राचार्य प्र. रा. दामले,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणें–१.





: एकमेव प्रमुख विक्रेते :

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

१९६२

प्रकाशक

शामकांत ल. बर्वे,
आयडियल बुक सर्व्हिस,
८८५ सदाशिव, पुणें २.

•

प्रथमावृत्ति
१५ ऑगस्ट १९६२



सर्वाधिकार सुरक्षित

•

किंमत रु. २–५०

•

मुद्रक

वि. दा. गांगल, एम्. एस्सी.
लोकसंग्रह छापखाना,
१७८६ सदाशिव, पुणें २.

माझे बंधु

कै. ती।। भास्कर रामकृष्ण दामले

यांस

लेखकाचें निवेदन

विद्यार्थिदशेपासून भोंवतालच्या सामाजिक व राष्ट्रीय घडामोडींकडे कांहींशा आस्थेनें लक्ष देण्याची मला संवय आहे. लहानपणीं अर्वाचीन महाराष्ट्रीय नेत्यांपैकीं रानडे, टिळक, आगरकर, गोखले यांच्या व विशेषतः टिळकांच्या जीवनांतील अनेक घटना परिचितांच्या तोंडून ऐकावयास मिळत. स्वतः महाराष्ट्रीय असल्यामुळें महाराष्ट्रीय जीवनविषयक विचार मनांत अनेकदां येत व येतात. त्याचीं स्थित्यंतरेंही थोडींफार पाहण्यांत आलीं. सन १९२०नंतर गांधीजींच्या भारतांतील सार्वजनिक चरित्रास प्रारंभ झाला. तेव्हां मी महाविद्यालयीन शिक्षण घेत होतों. व तेव्हांपासून त्यांचें दुःखद निधनाच्या वेळेपर्यंत इतर अनेक भारतीयांप्रमाणें त्यांचीं वक्तव्यें, लिखाण, चळवळी व त्यावरून दिसणारा दृष्टिकोण यांची बौद्धिक दखल मजकडूनही घेतली जात होती. असे असलें तरी सविस्तर व पद्धतशीर विवेचन करून या थोर व्यक्तींबद्दल लिहिण्याची संधि आली नाहीं. कारणपरत्वें व प्रायः पुण्यस्मरणात्मक असें हें छोटेमोठे निबंध त्या त्या वेळीं नवभारत, सह्याद्रि वगैरे नियतकालिकांकरितां लिहिले. महाराष्ट्रविषयक एक लेखही यांत पुनः प्रसिद्ध केला आहे. तो गायकवाडवाड्यांतील गणपत्युत्सवांत करावयाच्या भाषणाचा सारांश आहे. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वांत आलें व इतरही स्थित्यंतरें झालीं. तरीही कांहीं बारीक फरक सोडल्यास त्यांतील विवेचन आजही बहुतांशीं योग्य व म्हणून उपयुक्त आहे असें वाटल्यानें तो लेख येथें पुनः प्रसिद्ध केला आहे. प्रत्यक्ष तें भाषण होऊं शकलें नाहीं. कारण त्याचवेळीं हैद्राबादविषयक पोलिसी कारवाई व्हावयाची होती व भाषणाचे मथळ्यामुळें विशेषतः 'उद्यांचा' या शब्दावरून जिल्हाधिकारी यांचा गैरसमज झाला व तें व्याख्यान न व्हावें अशी सूचना आल्याचें कळलें ! मजकडे चवकशी झाली असती तर मला खुलासा करतां आला असता ! असो.

प्रस्तुत संग्रहांतील विवेचनास अनेक मर्यादा आहेत. माझी माहिती प्रायः वर्तमानपत्रें व त्या त्या नेत्यांच्या लिखाणाचें थोडेंबहुत वाचन यांवर आधारलेली आहे. ज्याला आपण इन्साइड इन्फॉरमेशन किंवा अगदीं जवळून केलेलें निरीक्षण म्हणू तसें करण्याची मला संधि नव्हती. पुण्यस्मरणात्मक, चरित्रात्मक, निवेदन हेंच त्यांतील लेखाचें प्रत्यक्ष प्रयोजन असल्यामुळें सविस्तर, पद्धतशीर, व व्यापक अशी चर्चा येथें करण्यांत आली नाहीं. मी ज्या व्यवसायांत आहे त्याच्या जबाबदाऱ्या सांभाळून मनांत असूनही या विषयावर पद्धतशीर लिखाण करतां आलें नाहीं. ही त्रोटक टाचणें पुनः प्रसिद्ध करण्याचें कारण असें कीं, त्रोटक असलीं तरी त्यांतील विवेचन कांहीं अंशीं तरी उद्‌बोधक वाटेल अशी आशा आहे. व अशा थोर व्यक्तींच्या जीवनाचा प्रामाणिक अभ्यास हें राष्ट्रोद्धाराचें महत्त्वाचें साधन आहे अशी माझी समजूत आहे.

आज हे लेख प्रसिद्ध करतांना त्यांतील आणखी दोन उणीवा प्रामुख्यानें मनांत येतात. पहिली उणीव या लेखाच्या त्रोटकपणाची व कांहीशा प्रासंगिक स्वरूपाची. तिचा वर उल्लेख केलाच आहे. या पुस्तिकेबरोबरच टिळक, गोखले, गांधी, यांच्याविषयीं इंग्रजींतून दिलेल्या तीन व्याख्यानांची एक पुस्तिकाही प्रसिद्ध होत आहे. त्यांतील विवेचन थोडें अधिक पद्धतशीर आहे. दुसरी गोष्ट मनांत अधिकाधिक येते ती ही कीं रानडे, टिळक, गोखले व कांहीं प्रमाणांत आगरकर या थोर व्यक्तींचें अनुकरण व त्यांच्या कार्याचा योग्य अभ्यास आज पुरेसा होत नसला तरी त्यांच्याविषयीं व गु. डॉ. अण्णासाहेब कर्वे यांसारख्या कांहीं कार्यकर्त्यांविषयीं सामान्य माहिती पुष्कळांना असते. परंतु गेल्या शतकांत महाराष्ट्रापुरतां विचार केला तरी निरनिराळ्या क्षेत्रांत इतर अनेक थोर कर्तबगारीच्या व चारित्र्यसंपन्न व्यक्ति होऊन गेल्या. त्यांचे मोठेपणाची थोडीबहुत ओळख सुद्धां फारच थोडया महाराष्ट्रीयांस आहे. लोकहितवादी, सार्वजनिक काका, जांभेकर, ज्योतिबा फुले, न्या. तेलंग, जगन्नाथ शंकर शेट, पंडिता रमाबाई, विष्णुशास्त्री चिपळूणकर, राजवाडे, डॉ.केतकर, नारायण वामन टिळक, हरीभाऊ आपटे अशा अनेक व्यक्तींनीं महाराष्ट्रीयांच्या जीवनाचे प्रगतिप्रीत्यर्थ फार महत्त्वाचे प्रयत्न केले व धैर्य, कनवाळू-

पणा, चिकाटी असे निरनिराळे गुण प्रकर्षानें त्यांचेमध्यें होते. शिक्षणक्षेत्र, उद्योगधंदा व व्यापार या क्षेत्रांतील कांहीं व्यक्ति व कांहीं थोडे संस्थानाधिपती यांनींही आजच्या महाराष्ट्राची बहुमोल सेवा केली आहे. आज मागें वळून पाहातां ज्या सह्याद्रीच्या परिसरांत आपण राहतों त्याच्या अनेक शिखरांप्रमाणें या अनेक थोर व्यक्ति आपल्या जीवनानें आपणास ध्येयवादित्वाचा आदर्श दाखवीत आहेत असें वाटतें. त्यांतील कोणाचेंही प्रामाणिकपणें अनुकरण केल्यानें जीवनाचें चीज होण्यासारखे आहे. अशा या सर्वांचें विशिष्ट श्रेष्ठत्व व परस्परपूरकत्व उलगडून दाखविणें हा या चरित्रमालेचा खरा उद्देश आहे व तो स्वतः लेखकाच्या हातून किंवा इतरांच्या हातून पुढेंमागें अधिक प्रमाणांत पार पडावा अशी इच्छा आहे.

या संग्रहांतील गांधीजींवरील लेखाबद्दल दोन शब्द लिहिणें इष्ट वाटतें. आज जर तो लेख पुनः लिहिला तर त्यांतील टीकात्मक भाग मी कांहींसा कमी करीन व सौम्य करीन. तो लेख गांधींच्या मृत्यूनंतर एक वर्षानंतर लिहिला गेला होता. व त्या वर्षांत साहजिकच गांधींविषयक केवळ स्तुतिपर लिखाण इतकें लिहिलें जात होतें कीं त्याची कांहींशीं प्रतिक्रिया साहजिकच माझे मनावर झाली व गांधीजींच्या थोरपणाबद्दल पूर्ण आदर ठेवून त्यांचें व्यक्तित्व व त्यांची कार्यपद्धति यांतील उणिवांचा मी मुद्दाम थोडा सविस्तर ऊहापोह केला आहे. जसजसे दिवस जात आहेत तसतसा गांधीजींच्या थोरपणाचा प्रभाव माझे मनावर अधिकाधिक पडत चालला आहे व तरतमभाव लावावयाचाच तर ज्या थोर महाराष्ट्रीयांच्या जीवनविषयक लेखांबरोबर गांधीजींवरील लेख प्रसिद्ध होत आहे, त्यांचे तुलनेनें गांधींचा थोरपणा व त्यांचें सामर्थ्य अधिक व्यापक स्वरूपाचीं होतीं असें मला आज निर्विवाद वाटतें. असो.

महाराष्ट्रीय जीवनाचा व्यापक व निःपक्षपातबुद्धीनें विचार करून भारतीय जीवनांत महाराष्ट्रीयांस अधिकाधिक कामगिरी करतां यावी याबद्दल बौद्धिक भूमिकेवरून सतत प्रयत्न करणाऱ्या ज्या थोडचा व्यक्ति आपल्यांत आहेत त्यांत म. म. द. वा. पोतदार हे प्रमुख आहेत. त्यांनीं माझ्या विनंतीवरून या छोटचा पुस्तिकेस पुरस्कार लिहिण्याचें मान्य केलें ह्या

बद्दल मी त्यांचें मनःपूर्वक आभार मानतों. महाराष्ट्राचें असें पहिलें विद्यापीठ, पुणें विद्यापीठ, त्याचें ते आज कुलगुरु आहेत ही एक अभिनंदनीय घटना आहे व त्या स्थानावरून ते महाराष्ट्रीय जीवनाचें प्रगतीस योग्य साहाय्य करूं शकतील अशी बळकट आशा आहे.

आयडियल बुक सर्व्हिसचे श्री. शा. ल. बर्वे यांचा माझें महाविद्यालयाशीं व माझेशीं स्नेहाचा ऋणानुबंध आहे. त्या आपुलकीमुळें या छोट्या पुस्तिकेचे प्रकाशनाची जबाबदारी त्यांनीं हौसेनें घेतली आहे. याबद्दल त्यांस मनःपूर्वक धन्यवाद.

वाडिया महाविद्यालय,
पुणें १.
दिनांक ६।८।६२

प्र. रा. दामले

प्रस्तावना

पुणें येथील वाडिया कॉलेजचे प्राचार्य प्रभाकर रामकृष्ण दामले यांनीं "पांच थोर नेते" या नांवानें प्रस्तुतचें छोटेखानी पुस्तक प्रकाशित केलें आहे. या पुस्तकांत प्राचार्य दामले यांनीं पूर्वी वेळोवेळीं लिहिलेले लेख एकत्र केले आहेत. महाराष्ट्राच्या विभूति असे ज्यांना सारे विचारवंत एकमतानें उल्लेखितात ते न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, प्रि. गोपाळ गणेश आगरकर, प्रो. गोपाळ कृष्ण गोखले असे चार आणि पांचवे महात्मा गांधी, यांच्या थोरपणाची मीमांसा करणारे विवेचक लेख प्राचार्य दामले यांनीं प्रसंगाप्रसंगानीं लिहिले. ते एकत्र करून या पुस्तकांत दिले आहेत. आणि शिवाय 'कालचा, आजचा, उद्यांचा महाराष्ट्र' हाही न होऊं शकलेल्या व्याख्यानासाठीं तयार केलेला लेख यांत जोडला आहे. प्रा. दामले हे एक अनुभवी, वाकबगार शिक्षक, तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक आणि विचारवंत म्हणून प्रसिद्ध आहेत. ज्या थोर नेत्यांच्या कामगिरीचा विचार प्रा. दामले यांनीं आपल्या लेखांतून केला आहे त्यांपैकीं महात्मा गांधी सोडून इतर चौघांचा कार्य-काळ प्रा. दामले यांनीं आपल्या समंजस वयांत पाहिलेला नाहीं. माझा लोकमान्य टिळकांशी प्रत्यक्ष असा परिचय माझ्या लहानपणापासून होता. गोखले यांना मीं दुरून पाहिलेले आणि त्यांचें मराठी व इंग्रजी वक्तृत्वहि मीं ऐकलेलें आहे. महात्मा गांधी यांनाहि मी एक-दोन वेळां जवळून पाहिलें आहे. या सर्व पांचहि नेत्यांचें लिखाण मीं आदरपूर्वक वाचलेलें आहे. आणि सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनीं या पांच थोर नेत्यांच्या चरित्रांचा आणि कामगिरीचा बारकाईनें अभ्यास करणें अत्यंत अवश्य आहे असे माझें मत आहे. त्यांच्या त्यांच्या काळीं त्यांच्या मतांविषयीं आणि कार्याविषयीं वादाचे कल्लोळ एवढे उंच उठले होते कीं, त्यांचा पडसाद आजहि अधून मधून ऐकूं येतो. परंतु जसा काळ दूर जात आहे, तसतसा या सर्व थोर पुरुषांचा मोठेपणा दिवसेंदिवस अधिकाधिक प्रत्ययाला येत आहे. या थोरांचा नामोच्चार

होत नाहीं असा एकहि दिवस महाराष्ट्रांत जात नाहीं. महात्मा गांधी हे महाराष्ट्रांत जन्मले नाहींत. किंवा त्यांनीं मराठी भाषेंत लिहिणें–बोलणें केलें नाहीं, तरीहि आपल्या कर्मकलापाचें स्थिर केंद्र महाराष्ट्रांतच ठेवलें. महाराष्ट्रावर तशी त्यांची मोठी श्रद्धा होती अन् ते ती वारंवार बोलून दाखवीत. अशी श्रद्धा राज्यपाल श्रीप्रकाश, कै. यदुनाथ सरकार, कै. पंडित, पं. मदन मोहन मालवीय प्रभृति अनेक थोरा-मोठ्यांनीं व्यक्त केलेली आढळते. म्हणून प्रा. दामले यांना आपल्या विवेचकदृष्टींतून या महनीय पुरुषांच्या चरित्रांचा आढावा घ्यावासा वाटला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. या पांच थोर पुरुषांनीं कोणता अमूल्य वारसा आपणांसाठीं ठेवला आहे तें प्रस्तुतच्या आणि पुढील पिढ्यांतील सर्व उत्साही तरुणांनीं अवश्य ध्यानांत घेतलें पाहिजे. प्रा. दामले यांचे हे लेख अशा तरुणांना पुष्कळच उद्‌बोधक होतील याविषयीं मला शंका नाहीं.

प्रा. दामले यांचे 'हीरो' टिळक हे आहेत. असें असलें तरी रानडे, गोखले, आगरकर आणि गांधी यांचें लोकविलक्षण माहात्म्य प्रा. दामले यांनीं प्रांजळपणें प्रकट केलें आहे. असें करीत असतांना प्रा. दामले यांची दृष्टि प्रत्येकाच्या अंतरंगांत विवेचक बुद्धीनें शिरून त्यांच्या थोरवीचें नेमकें मर्म उलगडून दाखविण्याच्या प्रयत्नांत गुंतली आहे. गुणग्रहणावरोबर दोष-दर्शनहि करण्यास प्रा. दामले कचरले नाहींत. या सर्व थोर नेत्यांची यथार्थ ओळख महाराष्ट्रास वेळींच झाली असती आणि त्यांना साक्षेपी आणि मर्मज्ञ अनुयायी विपुल प्रमाणांत लाभले असते आणि समाजाला या थोर विभूतींचा वारसा पुरविण्याचे कामीं अवश्य असलेलें भरपूर चातुर्य या अनुयायांनीं प्रगट केलें असतें तर महाराष्ट्रीयांना या नेत्यांनीं मिळवून दिलेलें उच्च स्थान आजहि टिकवितां आलें असतें; तें तसें झालें नाहीं याची हळहळ प्रा. दामले यांच्या लेखमालेंतून अनेक जागीं व्यक्त झाली आहे. प्रा. दामले विवेचक आहेत, मार्मिक आहेत, सहानुभाविक आहेत, प्रांजळ आहेत, आणि निर्भीडहि आहेत. म्हणून त्यांचे निष्कर्ष शब्दशः सर्वांनाच ग्राह्य होतील असें नाहीं. त्यांचा विशुद्ध दृष्टिकोण मात्र सर्वांना स्वीकार्य वाटेल. तुलनात्मक विवेचन प्रा. दामले यांनीं जागजागीं केलें

आहे. आणि अनेकांनीं मर्मग्रहणाऐवजीं निंदा–वर्षावावर भर दिल्यामुळें झालेल्या हानीबद्दल दुःख प्रकट केलें आहे.

'पांच थोर नेत्यां'च्या मोठेपणाचें जें मर्म प्रा. दामले यांनीं सांगितलें आहे तें मननीय आहे यांत शंका नाहीं. त्यांच्याच सारखी विशुद्ध वृत्ति धारण करून या पांच थोर नेत्यांच्या कामगिरीचें मूल्यमापन आणि त्यांच्या अंगच्या गुणांचें विशदीकरण निराळ्या शब्दांत करणें अवश्यहि ठरेल. बुद्धिवादी, भावनाप्रधान, इत्यादि अनेक शब्दांच्या परिभाषा आधीं निश्चित करून म्हणजे माप सांगून जर आपण आपला मूल्यमापनाचा हिशेब सादर केला तर त्याच्या रुपये आणे पैंत कोठें काय तफावत निघते तें सांगणें सोपें जाईल. यास्तव मापनदंडाचें कोष्टक स्वच्छपणें निराळें सांगितलें पाहिजे. म्हणजे ज्याला त्याला आपले हिशेब सादर करतां येतील. आगरकर, टिळक, रानडे आणि गांधी यांच्याविषयीं आम्हीहि आपले विचार प्रसंगी मांडलेलें आहेत. तो सर्व ऊहापोह करण्याचें हें स्थळ नव्हे. येथें एवढें म्हटलें तरी पुरें आहे कीं, प्रा. दामले यांनीं आपले लेख अनेक वर्षांपूर्वी लिहिले असले तरी आजहि ते विचार-मंथनाला अत्यंत उपकारक ठरतील. आणि म्हणून या विषयाची आस्था बाळगणाऱ्या सर्व होतकरू मंडळींनीं या लेखांचें मनन करावें अशी शिफारस मी निःशंकपणें करतों.

पुणें विद्यापीठ,
पुणें.
९ मे १९६२

दत्तो वामन पोतदार

अनुक्रमणिका

१.	न्या. रानडे यांचें प्रागतिकत्व	१ — १३
२.	न्या. मू. महादेव गोविंद रानडे : (पुण्यस्मरण)	१४ — २६
३.	लो. बाळ गंगाधर टिळक : व्यक्तिमत्त्व व कार्य	२७ — ४१
४.	आगरकरांचा बुद्धिवाद	४२ — ६७
५.	ना. गोपाळ कृष्ण गोखले : (पुण्यस्मरण)	६८ — ७७
६.	कालचा, आजचा व उद्यांचा महाराष्ट्र	७८ — ८८
७.	महात्मा गांधी : व्यक्ति व कार्य	८९ — ११३

92309

न्या. रानडे यांचें प्रागतिकत्व*

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या चरित्रांतील ठळक गोष्टी सुप्रसिद्ध आहेत. तरी पण पुढील प्रमेयांची पार्श्वभूमि म्हणून कांहींचा त्रोटक उल्लेख येथें उपकारकच ठरेल. १८ जानेवारी १८४२ या दिवशीं रानड्यांचा जन्म झाला. १८६६ पर्यंत ते एम्. ए., एल्एल्. बी. झाले. विद्यार्थि-दशेपासूनच ते लोकादरास पात्र झाले—इतके कीं, त्यांस 'पदवीधरांचा मुकुटमणि (Prince of Graduates)' असें लोक म्हणत. शिक्षणानंतर ओरिएंटल ट्रॅन्सलेटरच्या कचेरींत, कोल्हापूरच्या न्यायखात्यांत आणि इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून एल्फिन्स्टन कॉलेजांत अशीं कामें, थोडा थोडा वेळ परंतु उत्तम प्रकारें केल्यावर, १८७१ मध्यें ते न्यायखात्यांत कायम झाले.

१८७१–१८९३ पर्यंत मुख्यतः पुणें शहर हें रानड्यांचें कार्यक्षेत्र झालें. पुण्यामध्यें त्यापूर्वी चाललेल्या सर्व चळवळींत नवें चैतन्य ओतून रानडे यांनीं अनेक नवीन कार्यांचा आरंभ केला. प्रार्थनासमाज व सार्व-जनिक सभा या असलेल्या संस्थांस रानड्यांनीं आपल्या सहकार्यानें जोम आणला. त्याच सुमारास युवराजांच्या (पुढचे राजे सातवे एडवर्ड) सन्मानाप्रीत्यर्थ दरबार होता. त्या निमित्तानें या देशांतील दुष्काळ व इतर दैन्यावस्था यांवर खरा उपाय म्हणजे अधिकाधिक राजकीय जबाबदारी हिंदी लोकांवर टाकणें, असें रानड्यांनीं प्रतिपादिलें. बडोद्याचे त्या वेळचे महाराज मल्हारराव गायकवाड यांच्यावर केल्या जाणाऱ्या आरोपांबद्दल योग्य न्यायालयीन चौकशी व्हावी याकरितां सार्वजनिक सभेतर्फे प्रयत्न झाले, त्यांत रानड्यांनीं पुढाकार घेतला. सुप्रसिद्ध 'वसंत व्याख्यानमाले'ची स्थापना १८७५ मध्यें झाली. तिचे संस्थापक रानडेच होत. १८७१–७८ या दरम्यान पुण्यांत न्यायाधिशाचें काम करीत असतां वर निर्देशिलेल्या

---

* दि. १८ जानेवारी १९५३ रोजीं 'डेक्कन सभे'मार्फत झालेल्या व्याख्यानाचा सारांश.

व इतर अनेक सार्वजनिक कार्यांचा आरंभ त्यांच्या मदतीनें व मार्गदर्शनानें झाला.

नाशकास १८७८ सालीं त्यांची बदली झाली. त्या बदलीस त्यांच्या सार्वजनिक कार्याबद्दल व त्यांच्या देशापुढील राजकीय प्रश्नांबद्दलच्या मतांबद्दल नोकरशाहीची नापसंती हें मुख्य कारण समजलें जातें. या सुमारास सार्वजनिक सभेचें नियतकालिक सुरू झालें व त्यांत सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विषयांवर मूलगामी विचारांचें त्यांचें लिखाण सतत अनेक वर्षे प्रसिद्ध होऊं लागलें. विश्रामबाग वाड्यास लागलेली आग व वासुदेव बळवंत यांचें बंड या घटनांमुळें रानडे यांच्याबद्दलची नोकरशाहीची संशयितवृत्ति व त्यामुळें तिजकडून त्यांस दाखवला जाणारा सापत्नभाव यांस बळकटी आली. लवकरच दिवस निवळले व रानडे यांस अनेक बढतीच्या हुद्द्यांवर नेमलें गेलें. डे. ए. सोसायटी १८८० मध्यें स्थापिली गेली. प्रथमपासूनच रानडे तिचे सक्रिय हितचिंतक व मार्गदर्शक होते. १८८४ सालीं मुलींच्या (Female) हायस्कूलची स्थापना झाली. त्यांतहि रानड्यांचा भाग होता. त्या सुमारास स्थापन झालेली एक प्रकाशनसंस्था, ग्रंथकार परिषद् व डेक्कन पेपर मिल याहि संस्थांच्या स्थापकांस रानड्यांचा आधार होता.

१८८५ सालीं हिंदी राष्ट्रीय सभा स्थापन झाली. ती स्थापन करण्यांत रानड्यांनीं पुढाकार घेतला व नंतर १९०१ मध्यें आपलें निधन होईपर्यंत तिचा लौकिक, वजन व उपयुक्तता वाढेल असें कार्य सतत पडद्याआड राहून त्यांनीं केलें. १८८५ सालींच रानडे मुंबई कौन्सिलचे सभासद झाले व त्या वेळीं या मंडळाच्या कार्यास ज्या मर्यादा होत्या त्या संभाळून देशाच्या गरजा व त्यांवरील उपाय स्पष्टपणें पुढें मांडणें हें कार्य त्यांनीं तेथें केलें. प्रार्थनासमाजाच्या द्वारें रानड्यांनीं त्यांस मूलभूत वाटणाऱ्या धर्मभावनेची सेवा केली. १८८५ सालीं सामाजिक परिषद् स्थापण्यांत रानडे प्रमुख होते; व राष्ट्रीय सभेनंतर दर वर्षी ती घडवून आणून सहिष्णुतेनें परंतु निरलसतेनें त्यांनीं समाजसुधारणेचें कार्य अविरत केलें. १८८५ सालीं हिंद सरकारनें त्यांस आर्थिक समिती (Finance Committee)चे सभासद नेमिलें. समितीचे सभासद म्हणून राज्ययंत्राची आंतबाहेरची निश्चित माहिती रानडे यांस

झाली. १८९० मध्यें पश्चिम भारताची औद्योगिक परिषद् (Industrial Conference of Western India) भरली होती. त्यांत रानड्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. नंतर लवकरच रानडे यांची मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. मुंबईत रानडे यांनीं प्रार्थनासमाजांत उपासना चालवितांना अतिशय बहुमोल विचार वेळोवेळीं प्रकट केले व महाराष्ट्रीय संत व औपनिषदिक तत्त्ववेत्ते यांनीं सांगितलेला खरा हिंदुधर्म किती प्रगतिपर व जीवनसन्मुख आहे हें दाखवन दिलें. मध्यंतरीं १८९६ सालीं 'सार्वजनिक सभा' ही संस्था रानडे यांस संमत नसलेल्या राजकीय उन्नतीच्या मार्गाच्या अनुयायांच्या ताब्यांत गेल्यामुळें 'डेक्कन सभा' ही त्याच स्वरूपाची संस्था रानड्यांनीं ना. गोखले इत्यादींच्या सहकार्यानें स्थापिली. शेवटीं कांहीं वर्षें त्यांची प्रकृति बरी नसे. तरी पण 'कर्तव्याकरितां जीवन' हें त्यांचें ब्रीदवाक्य असल्यामुळें शेवटपर्यंत आपले निरनिराळे उद्योग संभाळून, कुटुंबीय, आप्त, स्नेही व समाज या सर्वांकरितां जें जें करणें इष्ट होतें तें तें करीत असतां, १९०१ सालीं रानडे कालवश झाले.

त्यांच्या कारकीर्दींत जवळ जवळ प्रथमपासून रानड्यांचा मोठेपणा समकालीनांकडून मान्य केला गेला; इतका तो निर्विवाद, रचनात्मक व कोणासहि न खुपणारा होता. त्यांच्याशीं उघडपणें वाद घातला व त्यांस दूषणें दिलीं, तीं मुख्यत: टिळकांनींच. परंतु टिळक व रानडे यांस उभयपक्षीं आदर व आपलेपणा होता व दोघेहि एकमेकांचें थोरपण ओळखीत होते, असें मानण्यास सबळ पुरावा आहे. रानड्यांचें श्रेष्ठत्व मान्य करणाऱ्यांत, आजच नव्हे तर अनेक वर्षांपासून, महाराष्ट्रीय क्रांतिकारक देशभक्तांचे नेते बॅरिस्टर सावरकर हे आहेत, हें कित्येकांस माहीत नसेल. आपल्या ५९ वर्षांच्या ह्यातींत न्यायाधिशाचें काम उत्तम प्रकारें संभाळून, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, वाङ्मयीन, औद्योगिक व राजकीय क्षेत्रांत रानडे यांनीं इतक्या योग्यतेचें काम केलें, इतक्या कार्यकर्त्यांस शिकवून पुढें आणलें व इतक्या संस्था उभारल्या किंवा नांवारूपास आणल्या कीं, त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र एक प्रकारें पोरका झाल्यासारखा झाला. रानड्यांच्या मोठेपणाबद्दल माझ्या पाहण्यांत आलेल्या वर्णनांपैकीं टिळकांनीं मृत्युलेखांत केलेलें वर्णन विशेष यथार्थ व परिणामकारक आहे. टिळकांनीं

रानडयांशीं तात्त्विक व व्यावहारिक भूमिकांवरून कांहींशा कठोरपणानें वाद केले. उगाच तोंडभर कुणाची स्तुति करण्याचा टिळकांचा स्वभाव नव्हता. त्यामुळें टिळकांनीं केलेल्या वर्णनास विशेष महत्त्व आहे. त्यांतील कांहीं उतारे उद्धृत करतों :—

(१) 'पण वर लिहिल्या कारणांमुळें महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. त्या थंड गोळ्याला कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुन्हा सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं, त्यास पुनः सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जर कोणी जिवापाड मेहनत केली असेल तर, ती प्रथमतः माधवरावजीनींच केली असें म्हटलें पाहिजे व आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय.'

(२) 'सर्व बाजूंनीं राष्ट्राची उन्नति झाली पाहिजे, असें त्यांस वाटत होतें व सर्व दिशांचें व बाजूंचें सांगोपांग परीक्षण करून त्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वरानें त्यांस प्रगल्भ व व्यापक बुद्धि दिली होती.'

(३) 'या सर्व चळवळी सुरू ठेवण्याबद्दल लोकमत जागृत करून कायम ठेवणें, निरनिराळ्या संस्थांकरितां निरनिराळीं मनुष्यें पाहून त्यांच्या हातून तीं तीं कामें करून घेणें, स्वदेशांतल्या किंवा परदेशांतल्या सर्वप्रकारच्या हालचालींवर नजर ठेवून त्यांचा देशाच्या उत्कर्षाशीं कसा संबंध पोहोंचतो, याचें अहोरात्र मनन करणें, हें माधवरावजींचें व्यसनच होऊन राहिलें होतें.'

(४) 'पण रावसाहेबांच्या बुद्धीचें व्यापकत्व जितकें अलौकिक होतें तितकाच शांति हा गुण त्यांच्या अंगांत असामान्य असल्यामुळें त्यांच्या दीर्घोद्योगास अखेरीस यश येऊन मुंबई इलाख्याच्या मध्यभागांत एक प्रकारची विशेष जागृति उत्पन्न झाली. माधवरावजींसारखे पुरुष जर्थे निपजले नाहींत तेथल्या आणि महाराष्ट्राच्या स्थितीची तुलना केली असतां आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल.'

(५) 'पण याहीपेक्षां त्यांच्या अंगचा लोकोत्तर गुण म्हटला म्हणजे आपल्या राष्ट्राचा अभ्युदय केव्हां ना केव्हां तरी झाला पाहिजे, किंबहुना ही गोष्ट परमेश्वरानेंच संकल्पित आहे, अशी जी त्यांच्या ठायीं उमेद होती तो होय. भावी सुपरिणामांबद्दल अशा तऱ्हेची निःसंशय मनोवृत्ति फारच थोड्या पुढाऱ्यांच्या ठायीं आढळून येते.'

प्रतिपक्षीयांना देखील मान्य होणाऱ्या या असामान्य कर्तृत्वाचें व यशाचें बीज काय, याचा विचार केला तर दोन गोष्टी निर्विवाद दिसतात. एक रानड्यांची सर्वांगीण व खोल अध्ययनप्रवण अशी स्वभावतः प्रगल्भ व सर्वगामी बुद्धि आणि दुसरी निवांतपणें कार्य अंगावर घेऊन सतत बौद्धिक श्रम करणें शक्य करणारी रानड्यांची आर्थिक व कौटुंबिक सुस्थिति. पण या दोन गोष्टींनीं देखील त्यांच्या थोरपणाचा उलगडा सर्वस्वीं होत नाहीं. माझ्या मतें रानड्यांचें वैशिष्ट्य त्यांच्या 'प्रागतिकत्वांत' होतें. म्हणून प्रागतिकत्वाची खरी ओळख करून घेतली असतां रानड्यांच्या मोठेपणाचें रहस्य समजेल.

प्रागतिकत्व (Liberalism) हा शब्द प्रायः विशिष्ट राजकारण-मतनिदर्शक म्हणून वापरला जातो. त्याहि अर्थी रानडे प्रागतिकच–लिबरलच – होते; परंतु अधिक खोल व व्यापक अर्थानेंहि ते 'प्रागतिक' होते. बुद्धि व भावना, विचार व विवेक, तर्क व धर्म (Reason and Religion) यांचा समन्वय रानड्यांच्या जीवनांत सारखा प्रतीत होतो, याचें मूळ त्यांच्या प्रागतिकत्वांत आहे. रानड्यांची धर्मनिष्ठा (Piety) हा त्यांच्या व्यक्तित्वाचा गाभा होय, हें पुष्कळ चरित्रकारांनीं दर्शविलें आहे. ही रानड्यांची धार्मिक वृत्ति एका विशिष्ट घडणीची होती हें लक्षांत ठेविलें पाहिजे. मनाचा निष्कपटपणा, स्वाभाविक व विचारानें बळकट केलेली शांतवृत्ति, जीवनाच्या सर्व अनुभवांबद्दल रचनात्मक दृष्टिकोण, अंधश्रद्धा व नास्तिक्य हीं दोन्हीं आत्यंतिक टोकें सोडून जागरूक व डोळस आस्तिक्याचा सुवर्णमध्य सांभाळणारी संयमी पण समाधानी वृत्ति, हीं त्यांचीं वैशिष्ट्यें होत. अर्वाचीन हिंदुस्थानांतील नेत्यांपैकीं फारच थोड्यांचा रानड्यांच्याइतका हिंदुस्थानच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल अढळ विश्वास असेल

परंतु आजच्या हिंदुस्थानांतील जीवनाच्या अनेक दोषांचीहि त्यांच्याइतकी जाणीव फारच थोड्यांना होती. हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासाचें आस्थेनें त्यांनीं अध्ययन केलें होतें व जगाच्या इतिहासाच्या परिशीलनानें राष्ट्रांचे अभ्युदय व त्यांची अवनति यांबद्दल विचारपूर्वक आपलीं मतें बनविलीं होतीं. त्यामुळें परकीय राज्याच्या संकटानें त्यांचें मन बावरून गेलें नव्हतें. शिवाय सृष्टिव्यवहाराच्या सूत्रांचें चालकत्व सदाचारप्रिय अशा शक्तीकडे आहे असा त्यांचा विश्वास होता. म्हणून अतिशय अवनतींत असलेला आपला देश, त्यांतील जनता शहाणपणानें वागली तर पुनः मागच्याप्रमाणें किंवा त्याहूनहि अधिक सर्वांगीण वैभवाच्या व चांगुलपणाच्या शिखरावर बसूं शकेल असा त्यांस भरंवसा वाटे.

ब्रिटिशांशीं या देशाचा आलेला संबंध स्पष्टपणें दुर्दैवाचा होता. परंतु या सकृद्दर्शनीं क्लेशदायक घटनेंतून हिंदी जनतेचें सर्वांगीण शिक्षण व पुनरुज्जीवन होणें शक्य आहे व त्या अर्थीं ह्या घटनेस परमेश्वरी योजना (Divine Dispensation) समजणें योग्य होय, अशी रानड्यांची भूमिका होती. आपल्या देशाच्या अवनतीचे हे दिवस कायमचे नव्हेत. वाईटांतून चांगलें निघतें. या संकटाचाहि आपल्या प्रगतीला करून घेतला तर मोठा उपयोग होण्यासारखा आहे, अशी त्यांची डोळस श्रद्धा होती. म्हणून 'उठा व जागे व्हा, व सर्व बाजूंनीं धिम्मेपणानें रचनात्मक कार्य करीत रहा', असा संदेश त्यांनीं शब्दांनी व विशेषतः आपल्या जीवनानें आपल्या देशबांधवांस दिला.

धार्मिकत्वावर अधिष्ठित असलेलें रानड्यांचें हें प्रागतिकत्व जीवनाचे सर्व प्रांत व्यापणारें असें होतें. आपला देश राजकीय पारतंत्र्यांत असल्यामुळें राजकीय प्रगतीचा प्रश्न एका अर्थीं अधिक निकडीचा होता व टिळकांनींच नव्हे तर रानड्यांचे मान्यवर शिष्य गोखले यांनींहि राजकीय सुधारणेसच अग्रस्थान दिलें. गांधीजींनीं त्यांच्या विशिष्ट पद्धतीनें राजकीय प्रगतीचा भाग म्हणूनच खादी, अस्पृश्यता-निवारण, मद्यपानबंदी, हिंदुमुस्लीम बंधुभाव, राष्ट्रीय शिक्षण वगैरे उद्योग हातीं घेतले. त्याचा अर्थ हाच कीं, सर्वांगीण प्रगतीशिवाय केवळ राजकीय हक्क मिळणार नाहींत व मिळाले तरी त्यांचा तितका उपयोग नाहीं. रानड्यांचाही दृष्टिकोण हाच होता. परंतु

रानडे व गांधी यांचे याबाबतींतील विशिष्ट भूमिकांत फरक होता तो असा कीं, गांधीजींचा दृष्टिकोण प्रायः भावनानिष्ठ होता, रानड्यांचा बुद्धिनिष्ठ होता. त्यामुळें एका अर्थीं तो कमी परिणामकारक; पण दुसऱ्या अर्थीं अधिक निर्दोष झाला. गांधीजींच्या पद्धतींत या प्रगतींतील निरनिराळ्या बाबींचें तारतम्य व साध्य-साधनभाव यांचा विवेक नीट राहिला नाहीं. शिवाय त्यांच्या अनुयायांपैकीं अनेकांस त्यांतील राजकीयेतर बाबींचें महत्त्व समजलें नाहीं व पटलें नाहीं. जे गांधींचे अनुयायी नव्हते त्यांस गांधींची भावनेची भाषा समजली नाहीं. त्यामुळें खादी, मद्यपानबंदी वगैरे बाबी हीं गांधीजींचीं वेडें (Fads) आहेत, असें त्यांस वाटलें. उलट रानड्े यांनीं यांतील प्रत्येक क्षेत्राच्या विशिष्ट मर्यादा संभाळून विचारपूर्वक त्यांत प्रगति घडवून आणण्याचा प्रयत्न केला, निरनिराळ्या क्षेत्रांत विशेष आस्था असलेल्या व्यक्तींस हाताशीं धरून कार्यास प्रारंभ केला. सार्वजनिक सभा, कायदेमंडळें, राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषदा, औद्योगिक व अर्थशास्त्रीय मंडळें, प्रार्थनासमाज इत्यादि अनेक संस्थांमधून निरनिराळ्या कार्यकर्त्यांना उत्तेजन देऊन व दिग्दर्शन करून रानड्यांनीं कार्य करविलें.

महाराष्ट्रांत राजकारण आधीं कीं समाजकारण आधीं, हा वाद झाला. त्यांत स्वतःला समाजसुधारणेची आस्था असूनहि, रानड्यांनीं समाजसुधारणा आधीं, असें उत्तर खास दिलें नसतें. अर्थकारण, राजकारण, समाजकारण व धर्मसेवा हीं सर्वच निकडीचीं आहेत, लोकसंग्रह करून सर्व क्षेत्रांतील कार्यांस चालना दिली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. टिळक स्वतःबद्दल असें म्हणत कीं, माझा काळ व शक्ति मी एका राजकीय क्षेत्रांतच वापरलीं तर तेथें तरी कांहीं भरीव कार्य होईल व म्हणून मला इतर क्षत्रांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करावें लागतें. गोखल्यांनाहि या 'कामांच्या डोंगरांची' तीव्र जाणीव असल्यानें त्यांनींहि प्रायः राजकारणक्षेत्रांतच आपलें कार्य केलें. उलट आगरकर, कर्वे इत्यादींनीं समाजसुधारणा हें आपलें क्षेत्र केलें. कांहीं अधिक मर्यादित क्षेत्रांत विठ्ठल रामजी शिंदे, भाऊराव पाटील इत्यादि व्यक्तींनींहि उपयुक्त कार्य केलें आहे. तरी पण महाराष्ट्रीय जीवनांत निरनिराळ्या प्रकारें दुही, परस्पर गैरसमज व

असहिष्णुता आली आहे. त्याचें एक कारण या निरनिराळ्या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांस आपण एकाच राष्ट्रीय जीवनाच्या प्रगतीकरितां विविध कार्यें करतों, याची योग्य जाणीव नव्हती, व त्यांच्या सामान्य अनुयायांस ती जवळ जवळ नव्हतीच. रानडे यांच्यामध्यें मात्र ती पूर्णत्वानें होती.

स्वराज्यपूर्वकाळीं राजकीय क्षेत्रांत यशस्वीपणें कार्य करणाऱ्या व्यक्तींमध्यें जी विशिष्ट धडाडी लागे त्यामुळें कांहींशी न कळत ही असहिष्णुता बळावली. गोखले-टिळकांनंतर म्हणजे गांधीजींचें नेतृत्व आल्यानंतर त्यांच्यादेखील कार्यपद्धतीचें मर्मच अनेकांना, बहुसंख्य काँग्रेस-जनांनाहि, न समजल्यानें महाराष्ट्रीय काँग्रेस कार्यकर्त्यांसहि ही परिस्थिति फारशी सुधारतां आली नाहीं. परंतु आतां तरी रानडे व गांधी या दोघांनीं आपापल्या प्रकारें ज्या खऱ्या प्रागतिकत्वाची व सर्वांगीण समाज-सुधारणेची कांस धरली त्याचें प्रामाणिक आचरण झालें तर स्वराज्यांतील जीवन पुष्कळ सुखकारक व सुसंस्कृत होईल. रानड्यांचा दृष्टिकोण व कार्यपद्धति बुद्धिनिष्ठ असल्यामुळें व देशकालपरिस्थितीनें त्यांच्या कार्यास साहजिकच एक विशिष्ट मर्यादा आली. सुशिक्षित व्यक्तींत या सर्व बाबतींत लक्ष घालून सुधारणा घडवून आणणें आवश्यक आहे, इतकें पटवून देण्याइतकी विचारजागृति त्यांच्या हातून झाली. कार्याची पूर्वतयारी झाली; परंतु कार्याची प्रत्यक्ष इमारत उभारण्यास जो अदम्य कार्योत्साह, खटपट, चिकाटी, धडाडी लागते ती पुरेशी उपलब्ध झाली नाहीं.

प्रागतिकत्वाचीं जीं मुख्य लक्षणें —विधायकवृत्ति, संयम व सहिष्णुता —तीं तीनही रानड्यांची कार्यपद्धति व त्यांचें जीवन यांत प्रामुख्यानें दिसतात. व्यक्तीची किंवा समाजाची सतत व हितकारक उत्क्रान्ति करावयाची असली तर कार्यकर्त्यांनीं हे गुण अंगीं बाणविले पाहिजेत. स्वराज्य-पूर्वकाळाइतकीच किंबहुना त्याहूनहि अधिक या गुणविशेषांची आज जरुरी आहे. अनत्याचार, सत्य, विरोधकाशीं शिष्टाचार (Non-violence, Truth, Courtesy to opponents) व सत्याग्रहीची तडजोडीची वृत्ति ह्या गोष्टींचा गांधीजींच्या राजकीय अमदानींत अनेक वेळां निर्देश झाला. त्याची तात्त्विक भूमिका वरील प्रकारच्या प्रागतिकत्वांत आहे. परंतु मौज अशी दिसते कीं, हें उभयतांतील साम्य गांधीजींच्या अनुयायांसहि दिसलें नाहीं व रानडे यांच्या अनुयायांच्याहि लक्षांत आलें नाहीं. व दोघांच्याहि

चुकांमुळे देशांतील प्रागतिकत्व (Liberalism) नाममात्र राहिलें. प्रतिपक्षी मग तो सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतील सनातनी असो, राजकारणांतील जहाल असो, औद्योगिक व आर्थिक क्षेत्रांतील कृपण सावकारी वृत्तीची व्यक्ति असो, त्याबद्दल असहिष्णुता रानड्यांनीं दाखविली नाहीं. गांधीजींचेंहि परमतसहिष्णुत्व हें ब्रीदवाक्य होतें तरी स्वतः गांधीजींनाहि त्याचें राजकीय चळवळींत पूर्णपणें पालन करितां आलें नाहीं. परंतु दोघांच्याहि अनुयायांनीं निरनिराळ्या प्रकारें या सहिष्णुतेकडे दुर्लक्ष केलें. हें सहिष्णु प्रागतिकत्व अंगीं बाणणें अर्थात् सोपें नाहीं. त्यानें एकदम डोळ्यांत भरणारी प्रगति होणार नाहीं; पण होईल ती टिकाऊ होईल.

रानडे यांच्या वृत्तींत असलेल्या व या प्रागतिकत्वाचें अधिष्ठान असलेल्या धार्मिकतेचा (Piety) आतां कांहींसा विचार करूं. 'राजकारणांत अध्यात्म आणलें पाहिजे' (Politics should be spiritualized); 'सत्यअहिंसेशिवाय मिळालेलें माझ्या देशाचें स्वातंत्र्यहि मला नको'; 'साधनशुद्धतेशिवाय साध्य शुद्ध असूं शकत नाहीं,' इत्यादि गांधीजींचीं ब्रीदवाक्यें सर्वश्रुत आहेत. प्रत्यक्ष आपल्या राजकीय कारकीर्दींत हीं तत्त्वें सार्वजनिक पातळीवर पूर्णतः पार पाडणें गांधीजींना जमलें नाहीं. व्यक्तिशः निःसंशय त्यांनीं तीं तत्त्वें आचरणांत आणलीं; परंतु त्यांच्या नेतृत्वाखालीं ज्या चळवळी म्हणून झाल्या त्या नैतिक पातळींत इतर कोणत्याहि राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यापेक्षां निःसंशय वरच्या पातळीवरील होत्याच असें म्हणणें कठीण आहे. रानडे यांचें राजकीय क्षेत्रांतील कार्य गांधीजींपेक्षां पुष्कळच भिन्न होतें. गांधीजींनीं लो. टिळकांप्रमाणें तमाम जनतेंत ब्रिटिश राजवटीबद्दल असंतोष निर्माण केला व राष्ट्रीय चळवळीस अनेकविध सक्रियता आणली; तर रानडे यांनीं परराज्यांतील स्वकीय कर्तव्यांची पहिली जाणीव विचारवंतांस करविली. म्हणून एका अर्थीं गांधीजींस राजकारणाचें अध्यात्मीकरण (Spiritualization) करणें दुरापास्त असणें स्वाभाविक होतें. तरी पण धर्म व ईश्वरश्रद्धा ज्याचें मूळ आहे असें सात्त्विक, ऋजु, सौम्य, सहनशील, वैयक्तिक व सामाजिक जीवन जगणें हा रानड्यांचा जितका व जसा मूळ स्वभाव व एकमेव ध्येय होतें तितकें युयुत्सु असलेल्या गांधीजींचें होतें, असें म्हणतां येईलसें वाटत नाहीं.

असहिष्णुता आली आहे. त्याचें एक कारण या निरनिराळ्या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांस आपण एकाच राष्ट्रीय जीवनाच्या प्रगतीकरितां विविध कार्यें करतों, याची योग्य जाणीव नव्हती, व त्यांच्या सामान्य अनुयायांस ती जवळ जवळ नव्हतीच. रानडे यांच्यामध्यें मात्र ती पूर्णत्वानें होती.

स्वराज्यपूर्वकाळीं राजकीय क्षेत्रांत यशस्वीपणें कार्य करणाऱ्या व्यक्तींमध्यें जी विशिष्ट धडाडी लागे त्यामुळें कांहींशी न कळत ही असहिष्णुता बळावली. गोखले-टिळकांनंतर म्हणजे गांधीजींचें नेतृत्व आल्यानंतर त्यांच्यादेखील कार्यपद्धतीचें मर्मच अनेकांना, बहुसंख्य काँग्रेस-जनांनाहि, न समजल्यानें महाराष्ट्रीय काँग्रेस कार्यकर्त्यांसहि ही परिस्थिति फारशी सुधारतां आली नाहीं. परंतु आतां तरी रानडे व गांधी या दोघांनीं आपापल्या प्रकारें ज्या खऱ्या प्रागतिकत्वाची व सर्वांगीण समाज-सुधारणेची कांस धरली त्याचें प्रामाणिक आचरण झालें तर स्वराज्यांतील जीवन पुष्कळ सुखकारक व सुसंस्कृत होईल. रानड्यांचा दृष्टिकोण व कार्यपद्धत वृद्धानष्ठ असल्यामुळें व देशकालपरिस्थितीनें त्यांच्या कार्यास साहजिकच एक विशिष्ट मर्यादा आली. सुशिक्षित व्यक्तींत या सर्व बाबतींत लक्ष घालून सुधारणा घडवून आणणें आवश्यक आहे, इतकें पटवून देण्याइतकी विचारजागृति त्यांच्या हातून झाली. कार्याची पूर्वतयारी झाली; परंतु कार्याची प्रत्यक्ष इमारत उभारण्यास जो अदम्य कार्योत्साह, खटपट, चिकाटी, धडाडी लागते ती पुरेशी उपलब्ध झाली नाहीं.

प्रागतिकत्वाचीं जीं मुख्य लक्षणें—विधायकवृत्ति, संयम व सहिष्णुता—तीं तीनही रानड्यांची कार्यपद्धति व त्यांचें जीवन यांत प्रामुख्यानें दिसतात. व्यक्तीची किंवा समाजाची सतत व हितकारक उत्क्रान्ति करावयाची असली तर कार्यकर्त्यांनीं हे गुण अंगीं बाणविले पाहिजेत. स्वराज्य-पूर्वकाळाइतकीच किंबहुना त्याहूनहि अधिक या गुणविशेषांची आज जरुरी आहे. अनत्याचार, सत्य, विरोधकाशीं शिष्टाचार (Non-violence, Truth, Courtesy to opponents) व सत्याग्रहीची तडजोडीची वृत्ति ह्या गोष्टींचा गांधीजींच्या राजकीय अमदानींत अनेक वेळां निर्देश झाला. त्याची तात्त्विक भूमिका वरील प्रकारच्या प्रागतिकत्वांत आहे. परंतु मौज अशी दिसते कीं, हें उभयतांतील साम्य गांधीजींच्या अनुयायांसहि दिसलें नाहीं व रानडे यांच्या अनुयायांच्याहि लक्षांत आलें नाहीं. व दोघांच्याहि

वरील कांहींसा वादग्रस्त प्रश्न सोडून दिला तरी ह्यावर प्रत्यक्षा-प्रत्यक्ष प्रकाश पाडणाऱ्या रानड्यांच्या वैयक्तिक जीवनांतील धर्मात्मतेचें मनन करणें फार स्फूर्तिदायक व बोधप्रद होईल. कुटुंबांतील व समाजांतील व जुन्या समजुतींच्या माणसांस त्यांनीं शक्यतों कधीं दुखवलें नाहीं; याबद्दल त्यांना इतरांनींच नव्हे, तर कारणपरत्वें त्यांच्या पत्नी रमाबाई यांनींहि दोष दिला. दुसरें लग्न करण्याची वेळ आली तर पुनर्विवाह केला पाहिजे, किंवा स्त्रियांनीं शिकणें व सामाजिक जीवनांत मोकळेपणें भाग घेणें हें योग्यच नव्हे तर इष्ट आहे हें रानड्यांस इतरांइतकेंच पटलें होतें व त्याकरितां त्यांनीं शक्य ते सर्व प्रयत्न केले. परंतु वडिलांस प्राणांतिक दुःख देऊन व कुटुंबाचें स्वास्थ्य नाहींसें करून पुनर्विवाह त्यांनीं केला नाहीं. पत्नीस शिकविलें व समाजांत वावरण्यास उत्तेजन दिलें तेहि घरांतील वडील स्त्रियांस कमींतकमी दुखवून. आपणा स्वतःस कोणत्याहि प्रकारें जरूर नसतां व आपण प्रायश्चित्त घेण्यानें अनेक स्नेह्यांचा रोष ओढवेल, हें माहीत असून, एका स्नेह्याची अडचण ओळखून त्याच्या कुटुंबांतील स्वास्थ्याकरितां त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें. उलट न्यायदानाच्या बाबतींत पक्षपातित्व होईल अशी परिस्थिति निर्माण होण्याचा संभव आल्याबरोबर, प्रेमानें, नम्रपणें पण निकरानें मला येथून बदली करून घ्यावी लागेल, असें त्यांनीं वडिलांस सुचविलें. म्हणजे प्रत्यक्ष अनिष्ट गोष्ट न करतां वडील माणसांस जितकें सांभाळतां येईल तितकें सांभाळावें अशी त्यांची वृत्ति व वागणूक होती.

सरकाराच्या अवकृपेनें बदली झाली तर मला नोकरी करावयाची आहे तोंपर्यंत मी बदली फिरविण्याचा विनंती-अर्ज करणार नाहीं. माझ्या समजुतीप्रमाणें योग्य वागत असतां कोणी माझी सत्त्वपरीक्षा पाहील तर त्यास पाठ फिरवणार नाहीं, असें त्यांनीं आपल्या स्नेह्यांस बजाविलें. सामाजिक परिषदेचा मंडप जाळणारे सनातन्यांतील विघ्नसंतोषी असोत, अवमान करणारा एखादा तरुण युरोपियन अंमलदार असो, किंवा टिळकां-सारखा धुरंधर पण कडवा प्रतिस्पर्धी असो, कोणाच्याहि कसल्याहि मर्यादातिक्रमानें आपलें स्थैर्य, आपली शांति व दुसऱ्याच्या भूमिकेंतील सत्य समजून घेण्याची वृत्ति त्यांनीं चळूं दिली नाहीं. आपले मित्र,

नोकरचाकर, इतर लोक व निंदकहि यांबद्दल नेहमीं न्यायबुद्धि व कनवाळूपणा त्यांनीं दाखविला व हें सर्व गाजावाजा न करतां व जणूं कांहीं आपण विशेष कांहीं करीतच नाहीं, अशा प्रकारें केलें. रानड्यांची ऋजुता व न्यायबुद्धि ही इतकी साहजिक होती कीं लहानपणीं खेळतांना गैरहजर भिडूच्याकडून ते डाव हरले होते व आपल्यास दिलेला मोठा खाऊचा तुकडा साहजिकच मोलकरणीच्या मुलास त्यांनीं दिला होता, असें सांगतात. हीच साधुवृत्ति योग्य प्रकारें व समंजसपणें त्यांनीं जोपासली व म्हणून त्यांनीं आपल्या जीवनानें सॉक्रेटिसाचें शहाणपण व एकनाथांचें सौजन्य यांची आठवण लोकांस करून दिली.

या अनुरोधानें कांहीं सुप्रसिद्ध भारतीय नेत्यांशीं रानड्यांचें साम्य-वैधर्म्य दर्शविलें तर उपयुक्त होईल. सामान्यतः रानडे व टिळक हे बुद्धिवादी तर गोखले व गांधीजी हे भावनात्मक प्रवृत्तीचे होते. टिळक व गोखले दोघेहि राजकारणास प्रधान कार्यक्षेत्र मानीत. रानडे निःसंशय व गांधीजीहि मनानें बहुधा राजकारणास तितकें महत्त्व देत नसत. रानडे व गांधी दोघेहि सर्व जीवनाला व्यापणारी धर्मभावना इतर सर्व गोष्टींपेक्षां महत्त्वाची मानीत. टिळक व गोखले सामान्य व्यवहारांत तीं बाजूला ठेवीत. टिळक व गांधी वृत्तीनें योद्धे होते. रानडे तसे नव्हतेच व गोखलेहि तितके नसावे. टिळक, गोखले व गांधी तिघेहि प्रत्यक्ष कार्यावर भर देणारे, तर रानडे तत्पूर्वतयारीवर भर देणारे होते. टिळकांत प्रखर बुद्धिमत्ता व गोखले यांच्यांत निष्ठावंत, निरलस उद्योग यांचा प्रकर्षानें वास होता. बुद्धीचा प्रकर्ष टिळक व रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वांत व जीवनांत दिसतो. गांधीजी व गोखले यांच्यांत भावनेचा, गांधी व टिळक यांच्यांत क्रियाशक्तीचा प्रकर्ष दिसतो. बुद्धि व क्रियाशक्ति यांचा समन्वय टिळकांत तर बुद्धि व भावना यांचा समन्वय रानडे यांच्या जीवनांत प्रत्ययास येतो. टिळक व गांधी हे सामान्य जनतेचे तर गोखले-रानडे हे सुशिक्षितांचे नेते होत. अतिशय मोठे असूनहि रानडे व गांधी एका विशिष्ट अर्थीं समाजांतील सामान्य व्यक्तींशीं फार निकट होते. तुलना या शब्दाचा सामान्य अर्थ—लहानमोठेपणाचा निवाडा करणें त्या अर्थीं वरील तुलना केल्या नसून स्वभावभिन्नता दर्शविण्यापुरता या

तुलनेचा उपयोग आहे. या सर्वच व्यक्ति इतक्या थोर आहेत कीं, त्यांतील कोणासहि अनुयायांच्या उत्साहपूर्ण स्तुतीची आवश्यकता नाहीं, व इतक्या असामान्य आहेत कीं, त्यांपैकी कोणासहि निंदक आपल्या निंदेनें सामान्य बनवूं शकणार नाहीं.

समाजांतील आपल्या स्थानीं समाधानानें राहून जें जें समाजकार्य करतां येईल तें तें करणें व इतरांस करावयास मदत करणें या वृत्तीमुळें रानड्यांच्या कर्तबगारीस अनेक मर्यादा आल्या व निरनिराळ्या क्षेत्रांत निरनिराळ्या व्यक्ति अधिक प्रभावी ठरल्या. त्यांनीं सरकारी नोकरी केली दुसरा विवाह करण्याचा प्रसंग येऊन विधवाविवाह केला नाहीं, ग्रामण्य प्रकरणांत प्रायश्चित्त घेतलें, प्रार्थनासमाजाच्या तत्त्वांचा फैलाव होण्यासाठीं फकिरी वृत्तीचे भागवत ते झाले नाहींत; इतिहास, अर्थशास्त्र, वाङ्मय यांतील कशाकरितांहि आत्यंतिक निष्ठा दाखवून त्यांनीं अलौकिक निर्मिति केली नाहीं; अशा तऱ्हेची टीका रानड्यांवर झाली व होऊं शकेल. पण ती करणाऱ्यांस रानड्यांच्या मोठेपणाचें मर्मच समजलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. माझ्या मतें रानड्यांच्या मोठेपणाचा स्वभावच असा कीं, मोठेपणाची हाव नसणें. तत्त्वज्ञानाचा खरा अनुयायी एका अर्थीं प्रत्यक्ष कार्याबद्दल अनुत्साही असतो असें म्हणतात व तसा अंशतः असला पाहिजे असें मला वाटतें. त्याचें कारण असें कीं, जीवनाच्या सर्व क्षेत्रांबद्दल त्यांस आस्था असल्यानें कोणत्याहि एका क्षेत्रांत तो फार जोरानें क्रियाशील होऊं शकत नाहीं. अशीच कांहीशी खऱ्या धर्मनिष्ठ व्यक्तीची स्थिति आहे. धार्मिक व्यक्ति ह्या या दृष्टीनें क्रान्तिकारक (Revolutionary) किंवा आग्रही नसतात. महाराष्ट्रीय संतांपैकीं अनेक प्रतिभावान् व ओजस्वी होते; पण शांति व समाधान हा भागवतधर्माचा स्थायीभाव असल्यामुळें राजकीय, बौद्धिक किंवा केवळ नैतिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या कर्मी कर्तबगारीच्या व्यक्तीइतकें प्रत्यक्ष कार्य त्यांच्यापैकीं अनेकांकडून झालें नाहीं. या देवाघरच्या व्यक्तींचें असामान्यत्व हेंच कीं, वैयक्तिक व सामाजिक संसारांतील सुखदुःख, प्रगति, अवनति या स्थित्यंतरांतून अचलित श्रद्धेनें परंतु सर्वांशीं सभ्यतेनें व नम्रपणानें वागून विरोधकांसहि स्नेहबुद्धीनें वागवीत. सत्य, शिवसुंदर असें जें जें असेल त्याची जोपासना करीत राहणें. आपल्या कर्तबगारीनें व बुद्धिवैभवानें

रानडे जसे नेत्यांचे नेते होते तसे वरील अर्थी धार्मिक वृत्तीचे असल्यामुळें समाजांतील सामान्य वाटावे तितके साधे, निगर्वी होते. एका अर्थी त्यांचें कार्य इतकें व्यापक व महत्त्वाचें आहे कीं, तेव्हांपासून निदान आतांपर्यंत टिळक-गांधीजी वगळल्यास त्या आवांक्याची व्यक्ति महाराष्ट्रांतच नव्हे तर हिंदुस्थानांतहि झाली नाहीं. परंतु त्यांची विवेकी वृत्ति, सहिष्णुता, सौजन्य, रचनात्मकता, प्रामाणिकपणा हे गुण मनांत आणल्यास आपणा सर्वांनाच कमीअधिक प्रमाणांत ते आचरतां येतील.

न्या. मू. महादेव गोविंद रानडे (पुण्यस्मरण)

श्रेष्ठ ग्रंथाप्रमाणेंच श्रेष्ठ व्यक्तीचेंहि असें असतें कीं, प्रामाणिक अभ्यासकाला त्यांच्या चरित्राच्या मननानें नवनवा बोध व संतोष होत राहतो. त्याच दृष्टीनें न्या. रानडे यांच्या जीवनकार्याचें पुण्यस्मरण करण्याचें येथें योजिलें आहे.

खरे नेमस्त (Moderation किंवा प्राचीन ग्रीक आदर्शाप्रमाणें Temperance हा सद्‌गुण असलेली व्यक्ति), खरे "प्रागतिक" (Liberal जीवनाच्या सर्व प्रांतांत सुधारणा कशी करतां येईल, याचा विचार करून ती घडवून आणण्याचा प्रयत्न करणारे) व खरे 'पारमार्थिक' (High Piety या गुणानें युक्त), असें ज्यांचें थोडक्यांत गुणवर्णन करतां येईल असे न्या. रानडे यांची श्राद्धतिथि १६ जानेवारीस येत आहे. त्या निमित्तानें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें ओझरतें दर्शन आपल्या हल्लींच्या परिस्थितींत उद्‌बोधक ठरेल.

न्या. रानडे यांच्या जन्मदिनास १९४२ सालीं शंभर वर्षें पुरीं झालीं. त्या वेळींच अनेक सभांमध्यें व अनेक लेखांमधून त्यांच्या विविध कार्याचें दिग्दर्शन झालें व त्यांच्या अनेक बहुमोल गुणांबद्दल चर्चा केली गेली. त्याच्या आधीं व नंतर अनेक वृत्तपत्रांतून व मासिकांतून न्यायमूर्तींच्या व्यक्तिमत्त्वाचें गुणग्रहण केलें गेलें आहेच. श्री. रमाबाई यांचें "आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी", तसेंच प्रा. न. र. फाटक यांनीं व इतरांनीं लिहिलेलीं चरित्रें, इंग्रजीतील प्रा. कर्वे यांचा Ranade, the Prophet of Modern India हा प्रबंध इत्यादि स्थळीं न्या. रानडे यांच्या गोठेपणाचें विवरण केलेलें आढळतें. तरीहि एक गोष्ट खरी कीं, रानडे यांना लोकमान्य टिळकांप्रमाणें चतुरस्र, कर्तबगार, निकटानुयायी व कुशल लेखक

असा चरित्रकार अद्यापि मिळाला नाहीं. त्यामुळें जिवंत व आदरपूर्ण सहानुभूति व जिव्हाळा यांच्या योगानें त्यांचें जें व्यक्तिदर्शन होण्यासारखें आहे त्यास महाराष्ट्र व हिंदुस्थान मुकला आहे. ना. गो. कृ. गोखले यांच्या कार्यव्यापृत्वामुळें व अल्पायुष्यामुळें त्यांच्या हातून हें चरित्र लिहून झालें नाहीं व त्यांच्यानंतर रानड्यांचा सर्वांगीण मोठेपणा समजून तो जिव्हाळ्यानें, जोमानें व आत्मविश्वासानें लोकांस समजावून देईल, अशी व्यक्ति महाराष्ट्रांत तरी झाली नाहीं. कारण, एका अर्थीं रानडे यांचें असामान्य व चतुरस्र श्रेष्ठत्व असें होतें कीं, विवेचक दृष्टीशिवाय त्याचें रहस्य कळणें कठिण आहे. रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे राष्ट्रभक्त व ईश्वरभक्त असे दोन अंश कल्पिले तर त्यांच्या विशिष्ट राष्ट्रभक्तीची व विशिष्ट ईश्वरभक्तीची पताका उत्साहानें, विश्वासानें व धैर्यानें मिरवणारी व्यक्ति निदान गोखल्यांनंतर कोणी झालीच नाहीं, असें म्हणावेंसें वाटतें. रानडे व गोखले यांच्याबद्दलचा आदर व त्यांच्या मोठेपणाबद्दलची समजूत अलीकडे थोडी वाढत आहे, हें खरें; परंतु देशाला त्यांच्या चारित्र्यांतून व कार्यपद्धतींतून बोध घेणें किती अवश्य आहे, याचा विचार केल्यास यापेक्षां फार उत्साहानें, निष्ठेनें व प्रामाणिकपणें तें व्हावयाला पाहिजे आहे. माझ्या मतें याचा मुख्य दोष या महान् नेत्यांच्या अनुयायांचा आहे.

तो दोष दोन प्रकारें दृष्टोत्पत्तीस येतो. प्रथम कांहीं दिवस त्यांच्या अनुयायांच्या कार्याचें स्वरूप, इतर मतें व संप्रदाय यांवर (महाराष्ट्रांत टिळक पक्षीयांवर) टीका, हें होतें. परंतु अलीकडे त्या कार्याचें स्वरूप निव्वळ निष्क्रियता असें झालें आहे. आणखी एक चूक या नेत्यांच्या अनुयायांकडून झाली असें वाटतें. ती ही कीं, त्यांच्या शिकवणुकीशीं अगदीं विसंगत अशी एक प्रकारची विभूतिपूजा त्यांनीं सुरू केली. तिचें स्वरूप असें कीं, रानडे किंवा गोखले यांच्या भूमिकेचें मर्म समजावून घेऊन त्यांचें तात्त्विक व डोळस पालन न करतां, त्यांचीं विशिष्ट मतें व भूमिका अक्षरशः प्रमाण आहेत, असें समजलें गेलें. अशा अनेक कारणांमुळें देशाच्या सर्वांगीण उन्नतीला या थोर नेत्यांच्या पश्चात् उपयोग होण्यासारखा होता

तसा झाला नाहीं. खरोखरीं देशाला रानड्यांच्या उदारमतवादा (Liberalism) ची आजच्या इतकी केव्हांहि गरज नव्हती. असें असतांना त्याचा पुरस्कार करणारे प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्ते नाहींत. न्या. रानडे यांच्या जीवनक्रमांतील ठळक घटना वाचकांस माहीत आहेत, असें गृहीत धरून त्यांचें जें व्यक्तिदर्शन प्रस्तुत लेखांत करण्याचें योजिलें आहे, त्यावरून वरील परिस्थिति स्पष्ट होईल.

न्यायमूर्ति यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा म्हणजे High Piety किंवा 'उच्च धार्मिकवृत्ति' असें म्हणतां येईल. त्याबरोबर असामान्य बुद्धिमत्ता व अविरत उद्योगशीलता त्यांच्या ठायीं असल्यामुळें अनेक क्षेत्रांत समाजोपयोगी रचनात्मक कार्याचा पाया त्यांनीं घातला, व कार्याची दिशा दाखविली. प्रथम त्यांच्या धार्मिक वृत्तीचें विवेचन करूं. "धार्मिक वृत्ति" हे शब्द पुष्कळ आधुनिक लोकांना चमत्कारिक व मागसलेल्या दृष्टिकोणाचे वाटतील. तसे ते नाहींत व निदानपक्षीं न्यायमूर्तींना ते तसे वाटत नव्हते. हा सर्व संसार, वैयक्तिक व सामाजिक जीवन, हें ईश्वरप्रणीत आहे, त्यांत कांहीं कल्याणमय सूत्र आहे; व आपलें सर्व आचरण, सर्व उद्योग या मूलभूत विश्वासावर आधारलेले असावेत, असें त्यांना वाटे. धार्मिक मनुष्य इतर सत्प्रवृत्त व्यक्तींच्या तुलनेनें कांहीं प्रकारें कमी आग्रही असतो व वरवर पाहाणारास तें त्याचें दौर्बल्य वाटतें. वस्तुस्थिति मात्र उलट असते. ध्येयवाद ही गोष्टसुद्धां अहंभावाचें उदाहरण होऊं शकते व म्हणून नेहमीं "असें असेंच झालें पाहिजे" हा आत्यंतिक आग्रह कोणाहि ईश्वरपरायण व्यक्तीला योग्य नव्हे. धार्मिक वृत्तीला बुद्धिनिष्ठ समजुतदारपणाची जोड मिळाल्यानें रानडे यांचें वर्तन बुद्धया 'नेमस्त' असे व त्यामुळें अनेकांची त्यांजवर इतराजी होई. रानडे यांनीं सरकारी नोकरी न धरतां चिपळूणकर, आगरकर, टिळक, गोखले यांच्याप्रमाणें देशसेवा केली असती तर त्यांचें कार्य कांहीं अर्थीं साहजिकच अधिक परिणामकारक झालें असतें. परंतु एकनाथांनीं उत्तम संसार केला, सॉक्रेटीस, तुकाराम, यांनींहि संसार सोडला नाहीं, याचें मर्म लक्षांत घेतलें तर रानडे यांनीं नोकरी कां सोडली नाहीं याचें मर्म कळतें. रानडे यांच्या काळांत जी परिस्थिति होती ती नंतरच्या परिस्थितीच्या मानानें वेगळी

होती. रानडे यांनींच नव्हे, तर लोकहितवादी, जांभेकर, यांच्यासारख्या इतरहि अनेक देशहिताकांक्षी व्यक्तींनीं नोकरीत राहूनच देशसेवा केली. परंतु रानडे यांचा स्वभाव व वृत्ति लक्षांत घेतली तर प्राप्त परिस्थितीमध्यें कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणें, आई-वडिलांना व इतर आप्तांना सुख देणें, त्याबरोबर होईल ती समाजसेवा करणें, अशी त्यांची भूमिका असणार. विधवा-विवाह मान्य असून वडिलांच्याकरितां कुमारिकेशीं लग्नास कबूल होणें, स्वतःचा प्रत्यक्ष संबंध नसतां मित्राकरितां प्रायश्चित्त घेणें, या व अशा गोष्टी त्यांनीं कमकुवतपणामुळें केल्या नसून बुद्धिपूर्वक केल्या. एका अर्थी सुधारणेच्या नेत्याला या शोभण्यासारख्या नाहींत, हें खरें; परंतु नेता होऊं शकलों नाहीं तरी चालेल; पण सुधारणेच्या कार्याला आपल्या परिस्थितींत योग्य व शक्य ती मदत करूं, असा विनयपूर्ण निश्चय कोणी घेतला तर त्यास कमी धैर्य किंवा स्वार्थत्याग लागतो, असें नव्हे.

हा संसार, सर्व मानवी इतिहास, 'ईश्वरप्रेरणे नें घडत असतो असा रानड्यांचा विश्वास, ब्रिटिश राजवटीनें ब्रिटिशांशीं आलेला हिंदुस्थानचा संबंध हें एक 'ईश्वरी देणें' (Divine Dispensation) आहे असें ते म्हणत, यावरून स्पष्ट होतो. त्यांच्या म्हणण्याचा योग्य अर्थ मात्र फारच थोड्यांना समजला, असें दिसतें. हिंदुस्थानसारख्या प्राचीन संस्कृतीच्या देशाचा एका दूरच्या पाश्चात्य राष्ट्राशीं जित आणि जेते असा जो निकट व दुःखदायक संबंध आला, त्यास हिंदी जनतेची शास्त्रीय ज्ञानाविषयीं अनास्था इत्यादि अनेक दोष कारणीभूत होतेच. परंतु त्याबरोबरच या उत्पन्न झालेल्या परिस्थितींत विचारपूर्वक वागल्यास, इंग्लंडसारख्या लोकशाही, समजूतदार, नेकीच्या, राष्ट्राशीं संबंध येणें या घटनेंतून सर्वांगीण लाभहि होण्यासारखा होता. पूर्वेचें व पश्चिमेचें जग एकत्र झालें आहे. म्हणून दोघांनीं एकमेकांपासून शिकावें व आपल्या जीवनास परस्परांच्या सहकार्यानें पूर्णता आणावी, हा टागोरांचा संदेश अंतर्मुख कविमनाच्या भूमिकेवरून दिला गेला. रानड्यांनीं ऐतिहासिक, व्यावहारिक व बुद्धिनिष्ठ त्याचबरोबर ईश्वरनिष्ठ व अंतर्मुख अशा दृष्टिकोणांतून यासंबंधीचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणे

लावला. त्यात ब्रिटिशांची अवास्तव स्तुति ही अभिप्रेत नव्हती व प्राप्त परिस्थिति उत्तम आहे, यावच्चंद्रदिवाकरौ ती कायम राहावी असें त्यांचें प्रतिपादन नव्हतें. उलट, विचारवंतांनासुद्धां ब्रिटिशांच्या लष्करी सामर्थ्याच्या व राजकारणपटुत्वाच्या तुलनेनें आपले दोष व मागासलेली स्थिति पाहून जी निराशा वाटेल तिचें त्यांत निराकरण करावयाचा एक मार्ग रानड्यांनीं दाखविला होता. विपत्कालीं जो चित्ताचें समाधान राखूं शकतो, तोच हातपाय हालवूं शकतो. असें समाधान वस्तुस्थितीकडे भावनावशतेनें पाठ फिरवून नव्हे, तर खंबीर बुद्धीनें वस्तुस्थितीला तोंड देऊन मिळविण्यास खरी प्रतिभा लागत असते. ही अमूल्य उच्च प्रतिभा ईश्वरनिष्ठेंतून उगम पावते. अशा प्रकारची ईश्वरनिष्ठा आणि प्रतिभा रानड्यांना लाभलेली होती.

टिळकांनीं रानड्यांवरील मृत्युलेखांत वर्णन केल्याप्रमाणें निर्जीव थंडगार होऊन पडलेल्या आपल्या देशाला ऊब आणून चेतनायुक्त व कार्य-प्रवृत्त करण्याचें थोर कार्य रानड्यांनीं केलें. त्यांच्या कार्याची रूपरेषा सर्वव्यापी होती. अलीकडे गांधीजींनीं राजकारणाचा जसा व्यापक अर्थ केला तसा निराळ्या अर्थानें रानड्यांनीं केला. त्या दोघांत मुख्य फरक असा कीं, रानडे यांचा पिंड विद्वत्तेचा व बुद्धिमंताचा होता. गांधीजी कार्यप्रवण होते. गांधी स्वतः नीति व धर्म यांमधून राजकारणाकडे वळले. परंतु व्यक्ति म्हणून गांधीजी जरी धार्मिक असले तरी त्यांचें राजकारण धर्मनिष्ठ होतें, असें दिसत नाहीं. रानडे यांची धर्माची व्याख्या व्यापक होती. त्यांचें सर्वच सामाजिक कार्य खऱ्या अर्थी धार्मिक होतें. गांधीजींना जसें राजकारण करावयास पाहिजे होतें तसें रानडे प्रत्यक्ष करीत. समाजसुधारणा, धर्मसुधारणा, राजकीय सुधारणा, आर्थिक जीवनांतील प्रगति, सर्वच त्यांनीं आरंभिल्या व त्या सर्व एका समाजजीवनाचे परस्परनिगडित भाग म्हणून. ना. गोखल्यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा निरोप घेतांना केलेल्या भाषणांत, ('Farewell to D. E. Society') डी. ई. सोसायटीचे किंवा पुढें निघालेल्या 'भारत सेवक समाजा'चे कार्यकर्ते हे धर्मनिरपेक्ष (Secular) ध्येयाकरितां मिशनरी वृत्तीनें काम करतात, असें म्हटलें. ती भूमिकाहि रानड्यांना अभिप्रेत नव्हती. कारण, ऐहिक

किंवा धर्मनिरपेक्ष (Secular) व आध्यात्मिक (Spiritual) असे जीवनाचे दोन विलग भाग होऊं शकत नाहींत. हा नैतिक व धार्मिक तत्त्वज्ञान्यांचा मुख्य सिद्धान्त त्यांनीं आत्मसात् केला होता.


रानड्यांनीं समाजकारण, राजकारण, अर्थकारण व इतिहास, यांविषयीं अभ्यासपूर्वक प्रकट केलेल्या विचारांचा एकत्र विचार करण्यासारखा आहे. त्यांच्या समाजसुधारणाकार्याचें वैशिष्ट्य, त्यांची खरी सहिष्णुता व सामोपचारबुद्धि, यांत आहे. आगरकरांसारख्या प्रामाणिक व आग्रही समाजसुधारकाची रानड्यांच्या (रानडे त्यावेळीं सर्व महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांचे मान्यवर नेते होते.) या दृष्टिकोणानें कुचंबणा होई व क्वचित् ते आपलें असमाधान व्यक्तहि करीत. परंतु रानड्यांचा मार्ग थोडा कंटाळवाणा वाटला तरी अधिक श्रेयस्कर होता. ज्या समाजाला आपणांस वळण लावावयाचें आहे, त्याला बरोबर घेऊन अधिकांत अधिक कार्य केल्यास तें टिकतें व त्याचा फैलाव होतो; समाज कार्यकर्त्याकडे सहानुभूतीनें व आपलेपणानें बघूं लागतो. म्हणून अगदीं नाइलाज नसेल तर दोरी न तुटेल अशीच जुन्या आचाराशीं रस्सीखेंच करावयाची, अशी रानड्यांची कार्यपद्धति होती. पंच हौद मिशनमधील व्याख्यानाच्या वेळीं चहा घेतल्याच्या आरोपावद्दल शंकराचार्यांपुढें जी चौकशी झाली, त्यांत रानड्यांनीं भाग घेणें व कैफियत देणें (विशेषतः टिळकांसारख्या चाणाक्ष प्रतिपक्ष्याबरोबर) हें पुष्कळांना आवडलें नाहीं. व त्यांत गुंतलेल्या आपल्या स्नेह्याच्या खातर प्रायश्चित्त घेणें यामुळें तर रमाबाईंनासुद्धां धक्का बसला. परंतु विचार केला तर रानड्यांनीं घेतलेली भूमिकाच त्यांच्या स्वतःच्या वैयक्तिक दृष्टीनेंच नव्हे तर समाजसुधारणेच्या कार्याच्या यशाच्या दृष्टीनेंहि योग्य होती, हें लक्षांत येण्यासारखें आहे. आपल्या समाजांतील सुधारणेचें कार्य तितकें समाधानकारक झालें नाहीं. याचीं दोन कारणें दिसतात. पहिलें व जें सर्वांना समजण्यासारखें आहे तें असें कीं, प्रामाणिक समाजसुधारक फार थोडे झाले आहेत. बोलणें फार, करणें थोडें; अशी बहुधा स्थिति होती व आहे. दुसरें कारण असें कीं, जे थोडे प्रामाणिक कार्यकर्ते होते त्यांत अनेक लोक "असहिष्णु" होते व आहेत. त्यांनीं समाजांतील सर्वसाधारण व्यक्तींचा आपलेपणा गमाविला व त्यामुळें

सुधारणेस असलेला विरोध बळकट झाला. टिळकांच्या समाजसुधारणे-विषयींच्या वरवर दिसणाऱ्या प्रतिकूल भूमिकेंत सत्याचा अंश होता तो हाच. रानड्यांचा मोठेपणा हा कीं, त्यांची कार्यपद्धति इतकी सौजन्यपूर्ण व सहिष्णु होती कीं, वैरी देखील मित्र व्हावा. जुना सनातनी समाज हा सुधारक कार्यकर्त्यांचा वैरी नसून तोच सुधारक कार्यकर्त्यांचें कार्यक्षेत्र व अंती सामर्थ्यहि आहे, हें रानडे ओळखीत व तसें वागत. समाज-सुधारणेच्या कार्यांत परकीय सरकारला हात घालूं देऊं नये, ही टिळकांची भूमिका रानड्यांस मान्य नव्हती. ही बाब वादग्रस्त आहे व प्रस्तुत स्थलीं तिचा विचार करणें अवश्यहि नाहीं.

आपल्या व इतर देशांच्या इतिहासाचें मार्मिक व निःपक्षपाती परंतु सहृदय अवलोकन; राजकीय सत्तेचा मुख्य उपयोग म्हणजे सामान्य नागरिकाचें आर्थिक जीवन सुधारणें व त्यास स्वावलंबी व कार्यप्रवृत्त करणें, ही जाणीव; व राजकीय चळवळींत शाब्दिक कलहांत वेळ व शक्ति न घालवणें; या तीन गोष्टी रानड्यांनीं मनांत बाळगल्या व त्या लोकांस शिकविण्याचा प्रयत्न केला. स्वराज्य म्हणजे काय, तें कशाकरितां मिळवावयाचें व तें मिळाल्यास टिकविण्याकरितां काय तयारी करावयास पाहिजे, हें रानडे, गोखले, यांच्या राजकारणावरून कळतें व तें नीट न शिकल्यामुळेंच स्वराज्यानंतरहि हिंदी जनता व तिचे नेते इतके भांबावून गेले आहेत. राजकीय कार्याबद्दल टिळक, रानडे व गोखले यांचे मूलभूत भेद नव्हते. त्यावेळचे दोन्हीहि पक्ष सनदशीर मार्गानें जाणारे (Constitutional) होते. त्यांत तरतमभाव लागण्यासारखा असला तरी तो लावण्यानें आतां विशेष उपयोग नाहीं. रानड्यांच्या राजकारणविषयक कार्यपद्धतीचा एक मुख्य विशेष असा कीं, कोठल्याहि राजकीय प्रश्नांसंबंधीं मतप्रदर्शन, जागृति किंवा चळवळ करण्यापूर्वी त्याबद्दल पूर्ण माहिती मिळवून त्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करणें. ना. गोखले यांनीं आपल्या अमदानींत निरनिराळ्या प्रश्नांवर या देशांतील वरिष्ठ विधिमंडळांत व परदेशांत जीं भाषणें केलीं, जें लेखन केलें, तीं वाचलीं असतां देशाभिमानाची चळवळ भावनावशतेनें व आत्यंतिक शब्दांत न करतां सभ्य, सौजन्यपूर्ण व पूर्ण माहितीवर आधारलेल्या शब्दांत त्यांनीं कशी केली, हें

दिसतें. गोखल्यांस ही शिकवण न्यायमूर्तींकडून मिळाली. रानडे यांचे लेख व भाषणें वाचलीं तर आपण अतिशय तात्त्विक व शास्त्रीय परंतु सहृदय मनाच्या दृष्टिकोणांतून त्या त्या प्रश्नाचा विचार करूं लागतों. आर्थिक व औद्योगिक परिषदा, सार्वजनिक सभेचें नियत-कालिक, यांतून महाराष्ट्रीयांचा इतिहास, वाङ्मय व धर्म यांवरील त्यॉचें लिखाण व भाषणें गंभीर भावनेनें भारावलेलीं असूनहि समतोल आणि माहितीपूर्ण आहेत. टिळकहि आपल्या परीनें व प्रकारें याच पद्धतीचा अवलंब करीत हें त्यांचें व केळकर, खाडिलकर, यांचें लिखाण पाहिलें तर स्पष्ट दिसेल. गांधीयुगांत ही पद्धत मागें पडली व त्याचे परिणाम स्वराज्यांत भोगावे लागत आहेत.

रानड्यांच्या धर्मविषयक कार्याचा थोडा विचार केल्यास त्यांच्या कामगिरीचें व व्यक्तिमत्त्वाचें वैशिष्टय अधिक लक्षांत येईल. ब्रिटिश अमदानीच्या प्रारंभीं हिंदी समाज अनेक प्रकारें निकृष्टावस्थेंत होता. रानडेप्रभृति विचारवंत नेत्यांच्या लक्षांत आलें कीं, अत्यंत प्राचीन संस्कृति व धर्मजीवन असलेला हा समाज आज त्या क्षेत्रांतहि फार मागासलेला आहे. म्हणून खऱ्या धर्माचें जीवन कसें जगावें, याचें उदाहरण घालून देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला व ती शिकवण लोकांस दिली. अंधश्रद्धा, मतामतांचा गलबला, अप्रामाणिकपणा, या दोषांनीं आपलें धार्मिक जीवन अत्यंत गढूळ झालें होतें. म्हणून ते दोष काढून टाकून ईश्वरभक्ति कशी करावी, याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें. ब्राह्मसमाज हा हिंदुधर्माचेंच सुधारलेलें स्वरूप म्हणून उदयास आला व महाराष्ट्रांत रानडे, भांडारकर, चंदावरकर, यांसारख्या लोकाग्रणींनीं ब्राह्मसमाजाची (प्रार्थना-समाजाची) स्थापना केली व तो निष्ठेनें चालविला. त्या कार्याला प्रत्यक्ष फळ फारच थोडें आलें असें दिसतें. त्या समाजाचे सभासद मुंबई-पुणें यांसारख्या शहरांच्या बाहेर तर नाहींतच; पण तेथेंहि फार थोडे आहेत. साहजिकच, साप्ताहिक उपासना व वार्षिक उत्सव यांपलीकडे धर्मजागृतीचें काम त्यांच्या करवीं फारसें होत नाहीं. तरीपण आपला समाज खरोखर प्रगतिपर व्हावयाचा असेल तर ब्राह्मसमाजाकडे किंवा तत्सम हिंदुधर्माच्या तत्त्वा अवतारांकडे अधिक लक्ष दिल्याशिवाय चालावयाचें नाहीं. माणसाचें सर्व व्यवहारांतील



यश त्याच्या आचरणावर, त्याच्या बुद्धि-शक्तींवर व श्रद्धेवर अवलंबून असतें. व तें शील किंवा श्रद्धा घडविण्यास धर्माइतकें प्रभावी साधन दुसरें कोणतेंहि नाहीं.

रानडेप्रभृति नेत्यांच्या या क्षेत्रांतील अनुयायांनीं रानड्यांनीं स्थापिलेल्या या धर्मजागृतीच्या संस्थेच्या कार्यास जोर येईल असें काय केलें आहे, याबद्दल विचार करण्यासारखा आहे. मुख्य गोष्ट अशी दिसते कीं, रानडे यांनीं दाखवून दिलेल्या इतर दिशांप्रमाणें याहि दिशेस सर्वस्वीं वाहून घेतलेले कार्यकर्ते हवेत. पाश्चात्य समाजांत चर्चचे सेवक ज्याप्रमाणें व ज्या प्रकारें काम करतात त्या निष्ठेनें कार्य केल्याशिवाय खऱ्या धर्माचें पुनरुज्जीवन होणार नाहीं. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी कीं, रानडेप्रभृतींनीं ही सुधारणा आरंभिली तेव्हां साहजिक त्यांना समाजांतील प्रचलित अंधसमजुतींशीं आपला मतभेद स्पष्टपणें दाखवावा लागला. परंतु त्यांतहि रानड्यांनीं संग्राहक व सामोपचारी वृत्ति दाखविली. हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन असा जर ब्राह्मसमाज आहे तर सामान्य हिंदुजनतेला अनोळखी वाटणार नाहीं, अशा रीतिरिवाजांचा उपयोग करून सुधारणा केली पाहिजे. राजकारणाप्रमाणेंच धर्मकारणहि नेत्यांचें किंवा नेत्यांकरितां नसून समाजाकरितां असतें. त्यांतच खरी प्रगति आहे. शाब्दिक मतभेदांकडे दुर्लक्ष करून अजूनहि पंढरीच्या वारींत जाणाऱ्या लक्षावधि लोकांची धार्मिक भावना नव्या भागवत-धर्माकरितां उपयोगी आणण्याला कल्पनाशक्ति व सहृदयता पाहिजे. हे गुण व ही निष्ठा असल्यास समाजाच्या कार्यास अजूनहि तेज येईल व राष्ट्राच्या हिताची फार मोठी कामगिरी त्यांच्याकडून होऊं शकेल.

रानड्यांचें राजकारण गोखल्यांनीं उत्तम चालविलें; परंतु गोखल्यांनंतर महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल हिंदुस्थानांत त्यांच्या निष्ठेचा, कर्तबगारीचा ध्येयवादी पुढारी प्रागतिक (Liberal) पक्षास मिळाला नाहीं. काँग्रेस पक्षापेक्षां या पक्षांत स्वार्थत्याग कमी लागे. सरकारच्या इतराजीची भीति कमी. म्हणून पुष्कळ लोक आपल्यास या पक्षाचे अनुयायी म्हणवीत असत; परंतु देशाच्या कल्याणाची काळजी क्षणोक्षणीं वाहून त्याकरितां अविरत श्रम करणें, याला खरें धैर्य व त्याग लागत असतो. त्यांत प्रागतिक

पक्ष इतर कोणा पक्षापेक्षां कमी असूं शकत नाहीं, याची जाणीव त्या पक्षांच्या नेत्यांनाहि पुरेशी दिसली नाहीं. स्वार्थत्यागाच्या भूमिकेवरून चालविलेल्या व म्हणून गाजलेल्या डी. ई. सोसायटीपेक्षांहि कडक स्वार्थत्याग गोखल्यांनीं काढलेल्या 'भारतसेवक समाजा'चे सभासद करतात व म्हणूनच ना. शास्त्री, कुंझरू, ना. म. जोशी, यांचीं नांवें विरोधी पक्षांतहि नेहमीं आदरणीय वाटत आलीं आहेत. पण 'भारतसेवक समाजा'च्या बाहेर प्रागतिक पक्षाचे नेते व अनुयायी यांनीं पक्षाच्या मोठेपणांत भर पडेल, अशी खबरदारी घेतली नाहीं, असेंच म्हणणें भाग आहे. या पक्षाच्या स्वार्थत्यागी नेत्यांनींहि एका महत्त्वाच्या बाबतींत प्रायः चुकीचें धोरण ठेवलें असें वाटतें. ती बाब म्हणजे रानडे-गोखल्यांपासून आतांपर्यंत कालमान व परिस्थिति बदलली आहे, हें लक्षांत घेऊन त्यांच्या राजकारणाचीं तत्त्वें अबाधित ठेवून तपशिलांत योग्य बदल केला पाहिजे, हें लक्षांत ठेवलें नाहीं. तसें झालें असतें तर मजूर-चळवळीचा योग्य पुढाकार त्यांना घेतां आला असता. ना. म. जोश्यांसारख्या कार्यकर्त्यास सोसायटीच्या बाहेर जावें लागलें नसतें व आजचे सोशॅलिस्ट व लिबरल यांचा मिळून एक महत्त्वाचा पक्ष निर्माण होऊन काँग्रेसच्या राजवटींत होत असलेल्या अनेक दोषांचा आविष्कार व परिमार्जन करण्यास तो समर्थ झाला असता.

रानड्यांच्या वैयक्तिक जीवनाचा जर थोडा विचार केला तर त्यांच्या मोठेपणाचें बीज कशांत होतें हें लक्षांत येईल. आपल्या वडिलांच्याबद्दल त्यांचा असलेला आदर व प्रसंगीं आपणांस थोडा कमीपणा आला तरी त्यांस न दुखविण्याची तत्परता हे रानड्यांचे गुण अनेक प्रसंगीं दिसले. याचा अर्थ रानडे यांनीं आपली भूमिका सोडली, असें नसून वडिलांस न दुखवतां जेवढी सुधारणा शक्य होती तितकी त्यांनीं केली. कोल्हापुरांत न्यायदानाच्या बाबतींत वडिलांच्या ओळखीनें कोणी आप्त खाजगी भेटीसाठीं आला, तेव्हां त्याला त्यावेळीं न दुखवितां, नंतर मात्र वडिलांस त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, अशानें मला कोल्हापुराहून बदली करून घ्यावी लागेल. रमाबाईंच्या 'आठवणीं'त लग्नानंतर त्यांच्या शिक्षणाचा प्रारंभ कसा झाला व त्या कामीं रानडे यांनीं आपल्या भगिनीचें मन संभाळूनहि रमाबाई यांस कशी अहर्निश मदत केली व सुविद्य आणि सुसंस्कृत होण्यास

कसें शिकविलें, याचे जागोजागीं उल्लेख आहेत. वडिलांना न दुखवितां आपल्या सहधर्मचारिणीबद्दलचें सर्व कर्तव्य त्यांनीं किती कसोशीनें पाळलें व पत्नीस कसें सुख दिलें, हें 'आठवणी' पदोपदीं सांगतात. कुटुंबांतील ज्येष्ठ माणसांचा संतोष ही व्यक्तीच्या खऱ्या यशाची व ध्येयवादित्वाची महत्त्वाची कसोटी होय, हें रानडे नेहमीं समजत व आचरीत. आपल्या कुटुंबियांप्रमाणें आपल्या स्नेह्यांबद्दलहि ते फार कनवाळू होते. श्री. शं. पां. पंडित यांचा त्यांचा स्नेह व एका गृहस्थाकरितां सर्वांचा रोष पत्करून त्यांनीं 'पंचहौद' मिशन प्रकरणीं शेवटीं प्रायश्चित्त घेतलें ही गोष्ट—हीं दोन उदाहरणें हेंच दाखवितात की, खरा मोठा मनुष्य सर्वच बाबतींत थोर असतो. कुटुंबांतील नोकरांबद्दलहि त्यांस किती ममता वाटे, त्यांचीं दुःखें किती सहानुभूतीनें ते स्वतः अनुभवीत, याचेंहि वर्णन 'आठवणीं'त सांपडतें. तात्पर्य, 'प्रपंच करावा नेटका' या उक्तीचें उत्तम उदाहरण रानड्यांच्या जीवनांत सांपडतें. अशा प्रपंचावरच खरा परमार्थ उभारतां येतो, हें त्यांनीं आपल्या आचरणानें दाखविलें.

रानड्यांच्या कार्याचें आणखी एक महत्त्वाचें क्षेत्र न्यायदानाचें होय. मुंबई हायकोर्टांत जे पहिले दोन-तीन हिंदी न्यायाधीश नेमले गेले त्यांतील एक रानडे होत. केवळ आपल्या कर्तबगारीनें सरकारदरबारीं त्यांच्या सार्वजनिक कार्यामुळें कांहींसा रोष असतांहि, ते या उच्चपदीं चढले. न्यायाधीश म्हणून विद्वत्ता, सखोल विचार, निरलसता व निःपक्षपातित्व यांबद्दल त्यांची ख्याति होती. त्यावेळच्या सरन्यायाधीशांस व इतर इंग्लिश व हिंदी सहकारी न्यायाधीशांस त्यांच्याबद्दल फार आदर असे. आपल्या क्रमप्राप्त सहज अशा कौटुंबिक कर्तव्याप्रमाणेंच स्वीकृत न्यायदानाचें कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडूनहि ते सार्वजनिक कार्यांत भाग घेत असा हा थोर पुरुष आपल्या देशाच्या निकृष्टावस्थेंतहि आपणामध्यें होऊन गेला, हें आपलें भाग्य होय. महाराष्ट्रीयांना चिरकाल अभिमान वाटण्यासारखी गोष्ट ही कीं, आधुनिक हिंदुस्थानचे प्रणेते म्हणतां येतील असे तीन पुरुष तरी महाराष्ट्रीय होते. ते म्हणजे रानडे, टिळक व गोखले. इतरहि अनेक थोर पुरुष निरनिराळ्या क्षेत्रांत झाले; परंतु या तीन व्यक्तींनीं सुशिक्षित महाराष्ट्रावर जे उपकार केले, त्यांस सीमा नाहीं. रानड्यांचें खरें पुण्यस्मरण हेंच कीं, आजच्या

काळांत महाराष्ट्र देशोद्धाराच्या कामीं पुन्हां नेतृत्व कसें मिळवूं शकेल याचा विचार व प्रयत्न करणें. स्वराज्य म्हणजे काय, तें कां मिळवावें व टिकवावें कसें, याचा विचार या थोर नेत्यांनीं उत्तम केला होता. तो लक्षांत घेऊन पाऊल टाकल्यास महाराष्ट्र पुनः निर्विवाद अग्रभागीं येईल.

टिळक व रानडे या दोन थोर व्यक्तींची तुलना केली तर असें लक्षांत येतें कीं, टिळक व रानडे यांची बुद्धिमत्ता व कर्तबगारी असामान्य होती. ज्यांना अवतारी पुरुष म्हणतात असे ते होते. त्यांचीं कार्य-द्धति भिन्न होती. पण असामान्यत्व सारखें होतें. त्या दोघांनाहि एकमेकांच्या मोठेपणाची जाणीव होती. रानडे हे आपल्या अनुयायांची टीका सोसूनहि टिळकांबद्दल आपलेपणा व आदर दाखवीत. टिळक रानड्यांबद्दल सकृद्दर्शनीं अमर्यादेचे उद्‌गार काढीत; तरीपण मनांत त्यांना फार मानीत. टिळकांनीं रानड्यांवर लिहिलेल्या मृत्युलेखांत जशी त्यांची थोरवी वर्णन केली आहे, तशी रानड्यांच्या अनुयायांनाहि प्रायः करतां आली नाहीं.

वरील विधानाला एकाच अनुयायाचा अपवाद करावयास हवा. तो म्हणजे रानडे यांचे प्रिय शिष्य व प्रागतिक पक्षाचे अभूतपूर्व नेते गोखले यांचा होय. गोखले स्वभावानें व वृत्तीनें गांधीजींना जवळ, बुद्धिमान् परंतु भावनानिष्ठ. रानड्यांच्या व्यक्तिमत्त्वापैकीं तात्त्विक व धार्मिक भागांचा गोखल्यांवर तितका पगडा बसला नाहीं. ते विशेषतः राजकारणी होते; व त्यांत टिळकांसारखे होते; पण राजकारणाची पद्धत ते रानड्यांपासून शिकले. रानडे-गोखले ही गुरु-शिष्यांची जोडी अर्वाचीन भारतीय सार्वजनिक जीवनांत अपूर्व अशी व प्राचीन भारतांतील गुरु-शिष्यांच्या आठवणींस उजळा देण्यासारखी होती. टिळक-केळकर, गांधीजी-नेहरू यांपेक्षांहि रानडे-गोखले हा गुरुशिष्य-संबंध अधिक अन्वर्थक आहे. रामकृष्ण-विवेकानंद या पारमार्थिक गुरुशिष्य-संबंधाशीं रानडे-गोखले यांच्या लौकिक गुरुशिष्यत्वाची तुलना करण्यासारखी आहे. टिळक व गोखले यांचे मतभेद प्रसिद्ध आहेत. गोखले हळवे असल्यानें टिळकांची तीक्ष्ण टीका त्यांना फार दुखत्री; परंतु टिळक-गोखले यांनाहि एकमेकांच्या कर्तबगारीची योग्य जाणीव होती. 'Born a few centuries ago he would have carved out an empire for himself.' असें गोखले टिळकांविषयीं म्हणत. 'सार्वजनिक

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. ग्रंथालय.
क्रमांक ७४९३८ दि. ७४९३८
१९६८ ७१३८५

जीवनाची ओढ मला टिळकांनींच लावली' असेंहि ते म्हणत. गोखल्यांवरील भाषणांत टिळक म्हणतात—"वैभव व यश आपण सहज मिळवूं, अशी उमेद असूनहि त्यांच्याकडे पाठ फिरवून देशसेवेचें कठिण व्रत अंगीकारणें व त्याकरितां अविरत श्रम करणें यांतच गोपाळरावजींचें मोठेपण आहे." टिळक लोकोत्तर नेते तर गोखले आदर्श शिष्य आणि रानडे द्रष्टे ऋषि असें या थोर व्यक्तींचें वैशिष्ट्य वर्णन करतां येईल.

टिळक, रानडे व गोखले यांचे अनुयायी म्हणविणारांनीं आपापलीं मतें न सोडतां सहकार्य करणें शक्य व आवश्यक आहे. आजच्या परिस्थितींत त्यांचे मतभेद क्षुल्लक असून त्यांचें साम्य पुष्कळ अधिक आहे, हें लक्षांत यावें. इतकेंच नव्हे तर गांधीजींचे जे खरे अनुयायी असतील त्यांच्याशींहि त्यांना पुष्कळ सहकार्य करतां येईल व तें करण्याची आवश्यकता आहे. या सर्व थोर राष्ट्रपुरुषांचें योग्य अनुकरण करून राष्ट्रकार्यास मदत केली तरच आजचे बिकट प्रश्न सुटतील.

लो. बाळ गंगाधर टिळक : व्यक्तिमत्त्व व कार्य

प्रस्तुत लेखांत टिळकचरित्रांतील मुख्य घटना वाचकांस माहीत आहेत असें गृहीत धरून त्यांच्यावरून टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचीं व मोठेपणाचीं वैशिष्ट्यें काय, त्यांवरून आपणांस आज काय बोध घेतां येईल, याची चर्चा करण्याचा विचार आहे. लेखकाच्या मतें सर्व महत्त्वाच्या बाबतींत टिळकांचें नेतृत्व व त्यांनीं घेतलेल्या भूमिका निर्दोष होत्या. बुद्धि व नीतिमत्ता यांचा इतका अलौकिक उत्कर्ष व्यक्तींत शतकांतून एकाद्याच वेळीं होत असेल. नेत्यामध्यें अवश्य असलेली प्रतिभा, तत्त्वनिष्ठा, अभंग सच्छील, व्यवहारकुशलता व अनुयायांबद्दलची आपुलकी हे गुण त्यांच्या ठिकाणीं पूर्णपणें होते व खऱ्या कर्मयोग्याची स्थितप्रज्ञता व नित्यानित्यविवेक अंगीं असल्यामुळें यशस्वी राजकारण व उच्च धर्मकारण या दोन्हींचा त्यांच्या खाजगी व सार्वजनिक जीवनांत उत्तम मिलाफ झाला होता.

अवतारी व्यक्तींच्या लक्षणांपैकीं भाग्य हें लक्षणहि टिळकांच्या जीवनांत प्रतीत होतें. आपल्या यशाच्या शिखरावर असतांना त्यांना मृत्यु आला. पूर्वायुष्यांतील वाद, मतभेद, संकटें, या सर्वांवर आपल्या प्रयत्नानें मात करून केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर हिंदुस्थानच्या नेत्यांत निरपवाद असें अग्रेसरत्व सिद्ध करून टिळकांनीं आपली जीवनयात्रा संपविली. परंतु शेवटलीं तीन-चार वर्षें सोडलीं तर त्यांचें सर्व जीवन नानाप्रकारचे मतभेद, भांडणें, वाद, गैरसमज, अडचणी, यांतच गेलें. आज त्यांच्या निधनानंतर बराच काळ लोटला असल्यानें त्या वादांचें कटुत्व कमी होऊन त्यांची निरपवाद थोरवी सर्वजण अधिक समजूं शकतात. हें खरें असलें तरी टिळकांच्या कार्याचें व व्यक्तिमत्त्वाचें स्वरूप पूर्णपणें कळण्यास त्या वादांचें पुनःस्मरण केलें पाहिजे व त्यांतील टिळकांची भूमिका काय होती, ती तशी कां होती व प्रायः निरपवाद कशी होती हें समजून घेतलें पाहिजे.

डे. ए. सोसायटीचा टिळकांनीं दिलेला राजीनामा हा त्यांतील पहिला वादप्रसंग होय. या बाबतींत नेमस्त पक्षांतील व शिक्षणक्षेत्रांतील तत्सम अनेकांनीं टिळकांस दोष दिला आहे व अजूनहि तितक्या जोमानें नसली तरी हीच वृत्ति कोठें कोठें दिसून येते. आगरकर-चरित्रकार रा. अळतेकर यांनीं आगरकरांचें विस्तृत चरित्र लिहिलें आहे. त्यांत यानिमित्त टिळकांवर आग पाखडली आहे. डी. ई. सोसायटीच्या सुवर्णमहोत्सव-ग्रंथांत जो वृत्तान्त आहे त्यांतहि प्रायः तोच सूर आहे. इतरहि कांहीं ठिकाणीं तो दृष्टोत्पत्तीस येतो. माझ्या मतें याचें मुख्य कारण हें कीं, टिळकांचे दोष दाखविल्याशिवाय गोखले, आगरकर, भांडारकर, रानडे यांचा मोठेपणा सिद्ध होत नाहीं असें या मंडळीस वाटतें. वस्तुस्थिति तशी नाहीं. दुसरें असें कीं, टिळक व त्यांचे प्रतिपक्षी यांच्यामध्यें सामान्य व्यवहारांत अधिक औजन्यपूर्ण कोण होते, अधिक शांत कोण होते, अधिक गोड बोलणारे, कष्टाळू, वक्तशीर कोण होते, हा प्रश्न नसून ज्या तत्त्वांकरितां ते प्रतिपक्षी झाले त्यांतील खरा तर-तम-भाव काय आहे, हा आहे. डे. ए. सोसायटीचा टिळकांनी राजीनामा दिला त्यांत केलेलीं विधानें असत्य आहेत असें सिद्ध झालें नाहीं. व त्यांत टिळकांनीं घेतलेल्या तात्त्विक भूमिकेकडे दुर्लक्ष झाल्यामुळें उच्च शिक्षणाची अपरंपार हानि प्रथम त्या संस्थेकडून व नंतर तिच्या अनुकरणानें इतर अनेक संस्थांकडून झाली आहे हेंही निर्विवाद. त्या भूमिकेचा मुख्य आशय असा : सरकारी शिक्षणसंस्थांकरवीं आमचें शिक्षणविषयक राष्ट्रकार्य समाधानकारक होत नाहीं व तें आमचें आम्हीं अधिक चांगलें करूं शकतों, अशा भावनेनें काढलेल्या संस्था 'मिशनरी' निष्ठेनें चालविल्या पाहिजेत. सभासदांनीं आपला संपूर्ण वेळ व शक्ति त्यांतच वेंचिली पाहिजे. दुसऱ्या कोठल्याही—विशेषतः अर्थोत्पादक—उद्योगांत भाग घेतां कामा नये. सोसायटीच्या सभासदांनीं अर्धपोटीं राहावें किंवा हाल करून घ्यावे किंवा आपल्या सहकाऱ्यांना कौटुंबिक अडचणींत मदत देऊं नये किंवा त्यांना ती दिल्यास त्यांची मानहानि करावी, इतक्या क्षुद्र, विवेकशून्य विचारसरणीचे टिळक नव्हते, हें त्यांचें पुढील सर्व जीवन सांगतें. 'माझ्या संसर्गाच्या शंकेनें तुमचीं वतनें जातील, तुम्हांस नोकरींत त्रास होईल, माझ्याशीं संघटन ठेवूं नका,' असें परक्या मंडळीस बजावणारे,

सरकारी नोकरांनाही त्यांच्या संकटांत कष्ट सोसून उपयोगीं पडणारे, टिळक आपल्या सहकारी स्नेह्यांबद्दल इतके क्षुद्रबुद्धि असतील असें मानणें, किंवा अर्धपोटीं राहण्यानें बौद्धिक प्रगतीही थांबते, इतकी शाळकरी मुलांबाळांना समजण्यासारखी गोष्ट त्यांना समजत नव्हती असें कल्पिणें व त्या कल्पनेवर आधारलेलीं तर्कटें रचणें हें अत्यंत असमंजस आहे. डे. ए. सोसायटीच्या प्राध्यापकांनीं विश्रांतीकरितां, संशोधनाकरितां, तत्त्वचिंतनाकरतां, सिंहगडावर जाऊन राहावें, असें ते म्हणत. त्यांना पैशाची किंमत कळत नव्हती, किंवा शें-दोनशें रुपयांच्या स्वार्थाला आगरकर बळी पडतील, असें त्यांना वाटलें असेल हें असंभवनीय आहे. गोखले व आगरकर यांवरील मृत्युलेखांत, त्यांचा मोठेपणा स्वार्थत्यागतत्परतेंत आहे, असें टिळकांनीं किती स्वाभाविक कळवळ्यानें म्हटलें आहे, तें ज्यानें वाचलें असेल, त्याला तशी शंकाहि येणार नाहीं. अनियमितपणा, कडवटपणा, तुसडेपणा, बेगुमान वृत्ति हे दोष तरुणपणीं टिळकांच्या आचरणांत असण्याचा संभव आहे. परंतु क्षुद्रबुद्धि व वस्तुस्थितीचें अज्ञान हीं त्यांच्या आसपास कधीं वावरूं शकलीं असतील असें वाटत नाहीं. म्हणून टिळक ज्या तत्त्वाकरितां भांडले व शेवटीं राजीनामा देऊन बाहेर पडले तीं तत्त्वें बरोबर आहेत कीं नाहींत, इतकाच प्रश्न विचारांत घेण्यासारखा आहे. अर्थात् निराळ्या कारणाकरितां, म्हणजे विस्तृत सार्वजनिक जीवन व राजकीय धुरीणत्व यांच्या आड सोसायटींतील सभासदत्व येत असल्यामुळें गोखल्यांप्रमाणेंच टिळकांनींही सोसायटी प्रत्यक्ष सोडणें हें क्रमप्राप्तच होतें; परंतु तो भाग वेगळा. त्याबद्दल गोखल्यांनाही कोणी दोष देत नाहीं. सोसायटीचा तोटा, तो देशाचा महालाभच ठरला. टिळकांनीं राजीनाम्यांत पुरस्कारिलेलीं तत्त्वें माझ्या मतें निरपवाद आहेत. त्यांकडे प्रथम गोखले-आगरकरांसारख्या महाभागांकरितां जें दुर्लक्ष केलें गेलें तें पुढें अत्यंत हानिकारक ठरलें आहे.

प्राध्यापक-वर्गातील विद्वत्तेची लालसा, ध्येयावरील निष्ठा व स्वार्थत्यागाची तयारी, हीं आजच्याइतकीं निकृष्टावस्थेस क्वचितच गेलीं असतील ! विद्यापीठांतील लहानसहान द्रव्यलाभाची हाव ज्यांना अनावर

होते, विद्यापीठीय निवडणुकीत उमेदवारांच्या लायकीपेक्षां त्यांची ओळख किती उपयुक्त, याचें महत्त्व ज्या मतदारांस अधिक वाटतें, टिप्पणी-पुस्तकें लिहिणें व कोचिंग क्लासेस चालविणें यांत ज्यांची अहमहमिका चाललेली असते ते आम्ही टिळक, आगरकर, गोखले यांच्याप्रमाणेंच राष्ट्रोद्धाराचें साधन म्हणून शिक्षणकार्य करीत आहों, असें आपणांपैकीं कितीजण प्रामाणिकपणें म्हणूं शकतील, याचा ज्याचा त्यानें विचार करावा. या वस्तुस्थितीस परिस्थितिजन्य इतर अनेक कारणें असलीं, तरी फर्ग्युसन कॉलेजच्या चालकांनीं पन्नास वर्षांपूर्वी केलेला टिळकांच्या तात्त्विक भूमिकेचा अव्हेर हें एक त्यांतील महत्त्वाचें कारण होय. कोठल्याहि वैयक्तिक कारणपरंपरेनें व प्रासंगिक अडचणीमुळें ही तत्त्वच्युति झाली असली व ती तत्त्वच्युति आहे हें तेव्हां समजलें नसलें, तरी कार्यकारणाचा निसर्ग-नियम हा निरपवाद आहे व तो आपली सत्ता सर्वांवर चालवितो.

सामाजिक सुधारणेची टिळकांनीं उपेक्षा केली व कांहीं अर्थी दुटप्पी-पणा व अप्रामाणिकपणा प्रदर्शित केला, हा एक टिळकांच्या कार्याबद्दल मोठा आक्षेप आहे. त्यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं. गांधीजी किंवा न्या. रानडे यांनीं ज्या पद्धतीनें राष्ट्र-जागृतीचें कार्य केलें त्यापेक्षां टिळकांची पद्धत वेगळी, कांहींशी मर्यादित होती. 'राजकारण' हेंच आपलें कार्याचें मुख्य क्षेत्र त्यांनीं स्पष्टपणें मानलें व आपली सर्व शक्ति त्यांतच एकवटली. तसें न करतां राजकारणाबरोबरच समाजकारणाचा गाडाही सुरळीत चालविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला असता व त्यांत त्यांना यश आलें असतें तर अधिक चांगलें झालें असतें असें म्हणतां येईल. टिळकांसारख्यांनीं समाजसुधारणेचें कार्य हातीं घेतलें असतें तर त्या कार्याला जोम आला असता. प्रश्न इतकाच कीं, टिळक मोठे झाले तरी त्यांच्याहि कर्तबगारीला मर्यादा होती, व परस्परभिन्न परिस्थितीमुळें व कांहीं अंशीं विरोधी अशा दोन कार्यक्षेत्रांत काम करण्याचा प्रयत्न करण्यानें बहुधा दोन्ही ठिकाणीं विशेष प्रगति न होण्याचा संभव होता. असें असतां टिळकांपुढें प्रश्न इतकाच होता कीं, यांतील कोठलें कार्य अधिक निकडीचें समजावें? राजकारण सर्वांत अधिक निकडीचें कार्यक्षेत्र असें टिळक व गोखले दोघेहि मानीत आणि स्वभावभेद सोडल्यास त्या दोघांनींहि इतर कार्यक्षेत्रांकडे

मुद्दाम सारखीच पाठ फिरविली, असें दिसून येईल. मग गोखले मात्र बरोबर व टिळक चूक असें कां ? गांधीजी किंवा रानडे यांचा वर उल्लेख केलाच आहे. त्यांच्या कार्याचाही पूर्ण विचार केल्यास, दोन्ही कार्यक्षेत्रांत कार्य करण्याचा प्रयत्न केल्यास दोहोंतही विशेष प्रगति होणार नाहीं, अशी टिळक व गोखले यांना वाटणारी भीति निराधार नव्हती, असें दिसून येईल.

याविषयीं आणखीं एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तो असा कीं, सामाजिक सुधारणा पाहिजे, हें मान्य केलें तरी ती घडवून आणण्याचा आपल्या देशाच्या परिस्थितींत योग्य मार्ग कोणता, याविषयीं मतभेद होणें शक्य आहे. टिळकांचें आचरण व त्यांनीं व्यक्त केलेलीं मतें, यांचा साकल्यानें विचार केल्यास आंधळेपणानें देशकालाकडे लक्ष न देतां जुन्या चाली चालू ठेवाव्या, असें त्यांचें मत नव्हतें व असणें शक्य नाहीं. परंतु सामाजिक सुधारणा या प्रायः शिक्षणानें, विचारानें, समाजाचें मत-परिवर्तन करून, घडवून आणणें श्रेयस्कर असतें. कायद्याच्या किंवा इतर प्रकारच्या बाहेरील दडपणानें तशा त्या घडवून आणल्यास टिकाऊ ठरत नाहींत, याची टिळकांना जाणीव होती. आमचे जुने रिवाज देशकाल-परिस्थितीप्रमाणें आमचे आम्हीं विचारपूर्वक सुधारावे व समाजधारणेकरितां व उन्नतीकरितां त्यांचा उपयोग करावा, अशा मताचे टिळक होते. म्हणून सनातनी समाजाला उठतांबसतां शिव्या देण्यापेक्षां प्रामाणिकपणानें, आवश्यक व योग्य वाटतील ते फेरबदल उदाहरणानें करावे, नसता गवगवा करूं नये व आधींच डोईजड झालेल्या परकी सरकारला या बाबतींत हात घालावयाला निमंत्रण देऊं नये असें टिळकांस वाटे. आज स्वराज्यांतहि कित्येक विचारी सुशिक्षितांचें व कायदेपंडितांचें असें मत आहे कीं, सरकार सामाजिक कायदे जरा अधिक विचारपूर्वक व सावकाशीनें करील तर तें इष्ट होईल. कोठल्याहि एखाद्या-दुसऱ्या सामाजिक चालीरीतींत फरक करावयाचा तर त्याचा संबंध जीवनावर परिणाम काय होईल, याचा विचार करून तो करणें जरुरीचें असतें. तसेंच जनतेच्या मताची बहुतांशीं तयारी अगोदर शिक्षणानें व प्रत्यक्ष उदाहरणानें करून मग प्रायः अनुज्ञापक विधींच्या साहाय्यानें नव्या रिवाजाच्या मार्गांतील अडचणी दूर करणें इतकेंच सामान्यतः इष्ट असतें. प्रचंड राष्ट्रीय किंवा धार्मिक आंदोलनांत किंवा महत्त्वाचे औद्योगिक

व आर्थिक फेरबदल होत असतां, व शिक्षणाच्या प्रसारामुळें आलेल्या विवेक-वृत्तीमुळें जी सुधारणा होते तीच टिकाऊ व विधायक, व म्हणून खरोखरी समाजोपयोगी असते. शिवाय आपल्या समाजाच्या इतिहासाकडे लक्ष न देतां अगदीं वेगळ्या दृष्टिकोणांतून सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणें अनिष्ट असतें व प्रायः व्यर्थ ठरतें. कारण अशा चळवळीस समाजाच्या प्रकृतींत स्थान नसतें. सर्वांत महत्त्वाचीं गोष्ट म्हणजे खरा सुधारक बोलका कमी व क्रियावान् अधिक असावा लागतो. तसा तो असेल तर सहसा तो असहिष्णु नसतो. प्रत्यक्ष कृति करतांना व्यक्तीला जबाबदारी अधिक वाटते, आपल्या कल्पनांच्या खऱ्या मर्यादा समजतात व समाज-जीवनाचें सातत्य न विघडवितां प्रगति करून घेतां येते.

प्रत्यक्ष टिळकांच्या जीवनांत कर्मठपणा, अंधश्रद्धा नव्हती; उलट इतर कोणाही आधुनिक व सुधारणावादी नेत्याप्रमाणें व त्याहूनही अधिक मोकळेपणानें ते सर्व समाजांत वावरत, सर्वांकरितां सारखे झटत. ते विलायतेहून प्रवास करून आले, आपल्या मुलीस त्यांनीं शाळेंत शिकविलें व त्या वेळच्या मानानें तिचें उशिरा लग्न केलें मिशन हाऊसमधील चहाप्रकरणीं सनातनी मंडळींबरोबर सामना केला. 'अस्पृश्यता मानणारा ईश्वरही मी मान्य करणार नाहीं' अशा अर्थाचे उद्‌गार त्यांनीं काढले. या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे टिळकांवरील दुर्धारकत्वाचा आरोप न्याय्य नाहीं असें लक्षांत येतें. टिळकांपेक्षां अधिक कर्तबगार व्यक्ति कदाचित् याहीपेक्षां निर्दोष वागूं शकली असती, असें कोणी म्हणूं शकेल; परंतु व्यक्तीच्या कर्तृत्वास मर्यादा ह्या असतातच. ही गोष्ट लक्षांत ठेविली तर देशाच्या त्या परिस्थितींत टिळकांनीं आपल्या शक्तीचा उपयोग केला, त्याहून वेगळा करणें श्रेयस्कर झालें नसतें, असाच निर्णय कोणीहि निःपक्षपाती अभ्यासक देईल.

सुरतेच्या काँग्रेसमध्यें झालेल्या दुफळीबद्दल टिळकांना दोष देण्याची प्रवृत्ति अलीकडे प्रायः नष्ट झाली आहे. तरीपण त्या प्रसगाच्या निमित्तानें नेमस्त पक्षाचें व राष्ट्रीय पक्षाचें राजकारण, तद्विषयक टिळकांची भूमिका यांचा विचार करणें, टिळकांचें व्यक्तिमत्त्व व कार्य समजण्याकरितां, आवश्यक आहे. माझ्या मतें या बाबतींत टिळकांची भूमिका खरोरखच

अत्यंत समंजस, विचारी व राष्ट्रहितैक्यबुद्धि दर्शविणारी होती. गोखल्यांच्या निधनानंतर नेमस्त पक्ष स्वतःच्या कार्यशून्यतेमुळें व ध्येयवादाच्या अभावामुळें गोखल्यांबरोबर प्रायः संपला. गोखल्यांचे शिष्य म्हणविणाऱ्या गांधीजींनीं अगदीं दुसऱ्या टोंकास जाऊन सत्याग्रह, कायदेभंग व असहकार यांच्या जोरावर देशव्यापी चळवळ सुरू केली. ती करतांना त्यांनीं आपण टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाचेंच कार्य पुढें चालवीत आहों अशी ग्वाही दिली. गांधीजींची चळवळ गोखल्यांच्या व टिळकांच्या दोघांच्याहि कार्यपद्धतीशीं पुष्कळ बाबतींत जुळणारी नव्हे. परंतु जनतेंत असमाधान निर्माण करणें, ब्रिटिश रियासतीवर शक्य तें दडपण आणणें व त्याकरितां पडतील त्या हालअपेष्टा उघडपणें सोसणें हा महत्त्वाचा भाग टिळक व गांधी यांच्या कार्यांत सारखा होता व आहे. जगांतील परिस्थितीच्या कलाटणीबरोबरच विशेषतः टिळक व गांधी यांच्या प्रयत्नानें प्रज्वलित झालेली ही असमाधानाची धग न लागती, तर १९४७ च्या ऑगस्ट महिन्यांत इतकी त्वरा करून आपलें स्थान ब्रिटिश साम्राज्यशाही सोडती ना, ही गोष्ट आतां प्रायः सर्वमान्य आहे. म्हणून 'बहिष्कार' पुकारणारे व 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या मंत्राचे द्रष्टे व प्रवक्ते टिळक ह्यांचा कणखर मार्गच त्यांचे समकालीन नेमस्त पुढारी रानडे; मेथा, बॅनर्जी व गोखले यांच्या सौम्य मार्गापेक्षां इतिहासानें अधिक योग्य ठरविला आहे.

परंतु राजकीय पुढारी म्हणून टिळकांचा अनन्यसाधारण थोरपणा माझ्या मतें एका अर्थीं त्यांच्या 'सामोपचारवृत्तीं'त आहे. पुण्यांतील एका सभेंत श्री. राजाजी यांनीं टिळकांच्या या महत्त्वाच्या गुणाचा उल्लेख केला होता. सकृद्दर्शनीं टिळक सामोपचारी वृत्तीचे होते, हें खरें वाटत नाहीं. परंतु राजकारणांत जी देवघेव लागते, व जी देवघेवीची वृत्ति टिळकांच्या तथाकथित जहाल अनुयायांतच केवळ नव्हे तर गोखले, फेरोजशहा यांच्यासारख्या नेमस्त पुढाऱ्यांतहि नव्हती, ती टिळकांमध्यें होती. त्याचें मुख्य कारण टिळक खरे बुद्धिवादी व तत्त्वज्ञानाच्या चिंतनानें स्थिरचित्त झालेले होते. शिवाय त्यांचा देशाभिमान इतका

स्वार्थनिरपेक्ष होता व राजकीय घडामोडींतील गुंतागुंतीची त्यांस इतकी स्पष्ट व अचक कल्पना होती कीं, बहुमताच्या जोरावर 'माझेंच तें खरें,' असें म्हणणें किंवा आपलें बहुमत नसल्यास सवता सुभा काढणें, अशी त्यांची पद्धत नव्हती. सुरतेच्या बखेडचांत सर्वांत अधिक निंदा टिळकांची झाली व राग यावयाचा तर त्यांना यावयास हवा होता. परंतु श्रीअरविंद घोष व इतर जहाल नेते यांस टिळकांनींच थोपवून धरण्याचा प्रयत्न केला व कदाचित् टिळक १९०९ मध्यें तुरुंगांत न जाते, तर काँग्रेस नेमस्त पक्षाच्या हातीं गेली नसती. कारण काँग्रेसमध्यें राहून ती आपल्या बाजूस करावी, अशा मताचे टिळक होते. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं टिळकांनीं आपली तपश्चर्या पणाला लावली असती तर दास-टिळक या पक्षास गांधीजींविरुद्ध तात्पुरतें बहुमत मिळालें असतें! परंतु टिळकांनीं दुराग्रह दाखविला नाहीं व हा नवा तेजस्वी नेता आपणांत राहात असेल तर सुधारणाविषयक काँग्रेसचा ठराव थोडा मवाळ दिसला तरी हरकत नाहीं, अशी भूमिका त्यांनीं घेतली. पुढें लवकरच हा नेता सरकारविरुद्ध बंड करून उठला व टिळकांची (Responsive Co-operation) प्रतियोगी सहकारिता त्यांस व त्यांच्या अनुयायांस 'मिळमिळीत' वाटूं लागली, हें पुढील घटनांवरून दिसतें. त्याकडे लक्ष दिल्यास टिळकांनीं 'माझ्याप्रमाणें तुमचीं बोटें भाजलीं नाहींत व म्हणून तुम्हीं अवास्तव आशावादी आहां' असें जें गांधीजींना बजावलें तें किती खरें होतें हें समजतें! प्रस्तुत मुद्दा इतकाच कीं, टिळकांची वृत्ति ही तोडून टाकणारी, तडजोडीला प्रतिकूल (Exclusive and uncompromising) अशी नव्हती, हें या प्रसंगीं सिद्ध झालें. मुसलमान जमातीच्या आडदांड वृत्तीला टिळकांनीं नेहमीं विरोध केला; तरीहि त्यांच्याच पुरस्कारानें, आशीर्वादानें व पाठिंब्यामुळें हिंदु-मुसलमान यांतील पहिला व शेवटचा, सामोपचाराचा व ब्रिटिशांची मदत न घेतां, असा लखनौ-करार झाला, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

वरील अर्थी सामोपचार-वृत्ति हा टिळकांच्या राजकीय धोरणाचा महत्त्वाचा विशेष होता, हें पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं. उलट पक्षीं, हिंदी जनतेंत ब्रिटिश राजवटीबद्दल सतत व सर्व बाजूनीं तीव्र असंतोष निर्माण करणें

व त्याकरितां धैर्यानें व स्वार्थत्यागपूर्वक चळवळ करणें हा त्यांच्या राजकीय कार्याचा विशेष सर्वमान्य असला तरी त्याचें स्वरूप व त्याच्या पाठीमागील टिळकांची भूमिका काय, याबद्दलही स्पष्ट कल्पना असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. टिळकांना लावलेल्या अनेक विशेषणांपैकीं सर व्हॅलेन्टाईन यांनीं निंदेकरितां म्हणून लावलेलें Father of Indian Unrest 'असंतोषाचा जनक' ह्या पदानें टिळकांच्या राजकीय कामगिरीचें उत्तम मूल्यमापन होतें. मुमुक्षु हा संसारदुःखानें त्रस्त अशा मनःस्थितींत असतो व म्हणून गरूकडे जाऊन तत्त्वज्ञानाची कांस धरतो, असें आपल्या तत्त्वज्ञानशास्त्रांत सांगतात. त्याच प्रकारें ब्रिटिश राज्यसत्तेशीं असहकार करून त्यांना हा देश सोडण्यास प्रवृत्त करणारी गांधीजींची चळवळ ही, टिळकादि नेत्यांनीं ब्रिटिश अमदानीबद्दल तीव्र असंतोष दूरदृष्टीनें व स्वार्थत्यागपूर्वक प्रसृत केल्यामुळेंच शक्य झाली, हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. त्या काळीं ब्रिटिश राजवट व हिंदी-ब्रिटिश संबंध यांबद्दल तीव्र असंतोष निर्माण करणें हें कार्य अत्यंत दुर्घट होतें. न्यायमूर्ति रानडे यांनीं ज्या उदात्त अर्थानें ब्रिटिशांशीं या देशाच्या आलेल्या संबंधास (Divine dispensation) 'ईश्वरी योगायोग' म्हटलें तो पुष्कळांस समजण्यासारखा नव्हता. परंतु विपर्यस्त अर्थानें मात्र त्या वेळीं तशी भूमिका पुष्कळांची होती. तत्कालीन सामान्य हिंदी नागरिक व सुशिक्षित मंडळी ब्रिटिशांचें सामर्थ्य, कार्यकुशलता, मुत्सद्दीपणा, शास्त्रीय, प्रगति, यांनीं अक्षरशः दिपून गेली होती व स्वार्थ-बुद्धिही त्यांस ब्रिटिशांचा मोठेपणा मान्य करावयास लावीत होती. अशा वेळीं ब्रिटिशांचा व आमचा असलेला संबंध आमच्या फायद्याचा नसून तोटयाचा आहे, अपमानास्पद आहे, व ब्रिटिश लोक स्वतः कितीही चांगले असले तरी त्यांची येथील सत्ता अन्याय्य आहे, हो जाणीव व 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व मी तो मिळवीनच,' हा विश्वास व कर्तव्य-बुद्धि निर्माण करून ती जागी ठेवण्याचें दुर्घट कार्य टिळकांनीं केलें.

आपल्या राजकीय जीवनाच्या शेवटीं शेवटीं टिळकांनीं वापरलेल्या (Responsive Co-operation) या शब्दांनीं त्यांच्या कार्यपद्धतीचें मर्म समजतें. आणि आरंभापासून अखेरपर्यंत निरनिराळ्या परिस्थितींत टिळकांनीं त्याच पद्धतीचा अवलंब केला, असें त्यांच्या कार्याचें विचारपूर्वक

परीक्षण केल्यास दिसून येतें. स्वातंत्र्यप्राप्तीकरितां जनतेस आवश्यक असणारें शिक्षण देणें व प्रत्यक्ष स्वातंत्र्यप्राप्ति जवळ आणणें, दोन्हीही या कार्यपद्धतीनें साध्य होतात. तयारी व आवश्यकता असेल त्याप्रमाणें राणीसरकारकडे अर्ज करण्यापासून तों सशस्त्र बंड करण्यापर्यंत कांहींही मार्ग स्वातंत्र्यप्राप्तीकरितां अवलंबिण्यास कर्मयोग्याच्या स्थिरबुद्धीनें ते तयार होते. जसजशी जनतेची तयारी होईल व अंतर्बाह्य परिस्थिति असेल तसे पवित्रे बदलून सतत वाढती चळवळ करावयाची, मागें पाय पडूं द्यावयाचा नाहीं, जनतेचा निरुत्साह होऊं द्यावयाचा नाहीं, या धोरणानें ते वागत. टिळकांच्या प्रयत्नास प्रत्यक्ष दृश्य फल त्यांच्या हयातींत आलें नाहीं व त्यांचें आयुष्य प्रायः प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्यांतच गेलें. तरीपण टिळकांच्या आधीं व नंतर झालेला सर्व इतिहास नीट अवलोकिला तर टिळकांची भूमिका व कार्यपद्धति आम्ही नेहमींच अवलंबिली असती तर रानडे, टिळक, गोखले, गांधीजी, या सर्वश्रेष्ठ देशभक्तांचें ध्येयभूत स्वराज्य, मिळालें यापेक्षां, पूर्णत्वानें आपल्या पदरांत पडलें असतें असें वाटल्याशिवाय राहत नाहीं.

टिळकांची राजकारणांतील भूमिका निर्दोष होती, असें म्हटल्यानें टिळकांच्या महाराष्ट्रीय अनुयायांची भूमिका बरोबर आहे, असा निष्कर्ष निघत नाहीं. उलट अनेक महत्त्वाच्या बाबतींत ती प्रायः चुकली, असेंच विचारान्तीं म्हणावें लागेल. टिळकांच्या भूमिकेचा 'आत्मा' किंवा तिचे 'पंचप्राण' म्हणतां येईल असें त्यांतील तत्त्व म्हणजे परकीय सरकाराविरुद्ध धैर्यानें, स्वार्थत्यागानें सतत असमाधान निर्माण करणें व कांहींहि इतर घटना त्याच्या आड येऊं न देणें, हें होय. गांधीजींच्या कार्यपद्धतींतील दोष दाखवितांना याचें भान टिळकानुयायी म्हणविणारांना राहिलें असें दिसत नाहीं. हिंदु-मुस्लिम प्रश्नाबद्दल तर टिळकानुयायांची भूमिका टिळकांच्या राष्ट्रीय वृत्तीस बिलकुल साजेशी नव्हती. टिळकांचें हिंदु संस्कृतीबद्दल जाज्वल्य परंतु बुद्धिनिष्ठ प्रेम म्हणजे आजच्या हिंदु-जमातीच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रतिष्ठेबद्दलचें प्रेम नव्हे, हें या मंडळींच्या लक्षांत आलें नाहीं. या व इतर अनेक बाबतींत टिळकांच्या बुद्धिनिष्ठ परंतु तेजस्वी राजकारणाचा त्यांच्या अनुयायांनीं विपरीत अर्थ केला व

भावनावश होऊन पुराणमतवादी कल्पना त्यांनीं स्वीकारल्या असें दृष्टोत्पत्तीला येतें. टिळकांचें राजकारण सौम्य, हिंदुत्ववादी, सरंजामशाही थाटाचें, ब्राह्मणी कधींही झालें नसतें. कारण टिळकांचा देशाभिमान प्रामाणिक, डोळस व जागरूक होता.

गांधीजी व टिळक यांच्यामधील भेद एकाच शब्दांत सांगावयाचा तर असें म्हणतां येईल कीं, गांधींचें राजकारण भावनानिष्ठ व टिळकांचें बुद्धिनिष्ठ होतें. प्रत्यक्ष देशाभिमानाच्या भावनेंत टिळक गांधीजीपेक्षां कमी नव्हते, रेंसभर अधिक असतील ! उलट मुत्सद्देगिरींत व राजकीय प्रतिभेंत गांधी टिळकांपेक्षां कमी नव्हते. परंतु बुद्धिप्रधान राजकारणांत, समाजजीवनाला व व्यक्तिजीवनाला सतत प्रयत्नानें जें स्थैर्य येऊं शकतें, तें भावनाप्रधान राजकारणांत लाभूं शकत नाहीं. टिळकांची लोकोत्तर बुद्धिमत्ता राजकारणाशिवाय अनेक क्षेत्रांत प्रगट झाली आहे व ती सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. परंतु राजकारणांत टिळकांचा मोठेपणा त्यांच्या धूर्ततेपेक्षां सरळपणावरून, सामोपचारवृत्तीवरून, प्रामाणिकपणावरून व बुद्धिनिष्ठेवरून सिद्ध होतो.

ज्या निष्कामकर्मयोगाचें त्यांनीं आपल्या 'गीता-रहस्यां'त कौशल्यानें, विद्वत्तापूर्ण प्रतिपादन केलें त्याचें आमरण टिळकांनीं आचरण केलें. पारतंत्र्यांत असलेल्या देशाच्या नेत्यांना स्वार्थत्याग अपरिहार्यच आहे; परंतु टिळकांनीं स्वार्थत्याग कसा केला व किती केला, हें समजून घेतल्यास हिंदी देशभक्तांमधील त्यांचें स्थान अद्वितीय कां, हें लक्षांत येतें. 'ओरायन', 'आर्क्टिक होम' व 'गीता-रहस्य' हे अव्वल दर्जाचे ग्रंथ फावल्या वेळीं लिहितां येतील, अशी त्यांची बुद्धिमत्ता होती, व राजकीय कार्याच्या ऐन धकाधकींतही फुरसतीच्या क्षणांत वेदोपनिषदें, गणित व ज्योतिषग्रंथ आणि पाश्चात्य व पौरस्त्य तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ यांचें ते परिशीलन करीत ! मंडालेच्या तुरुंगांतूनही त्यांचें आपल्या खाजगी ग्रंथालयाकडे—ज्याप्रमाणें पक्षिणीचें घरटयाकडे त्याप्रमाणें—लक्ष असे. हिंदुस्थानच्या राजकारणाची निकड नसती किंवा स्वराज्यप्राप्ति झाली असती तर प्रोफेसर होऊन राहावें, अशी त्यांनीं आपली अंतरींची इच्छा अनेक वेळां

प्रकट केली होती. अशा मनोवृत्तीच्या टिळकांनीं तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी होऊन, जन्मभर परकीय सरकारशीं सामना देण्यांत आपलें आयुष्य वेंचावें याचा सादर विस्मय वाटतो. गेल्या शतकांतील या देशाचें बौद्धिक दारिद्र्य पाहिलें म्हणजे क्वचित् असें वाटतें कीं, टिळकांच्यासारखा असामान्य बुद्धीचा व उत्कट ज्ञानलालसा असलेला महापुरुष आम्हांस राजकारणांत खचीं घालावा लागला हें आमचें दुर्दैव होय. परंतु ह्यावरून टिळकांच्या अनन्य-साधारण स्वार्थत्यागाची थोरवी कळून येते.

टिळकांनंतर 'केसरी' संस्था महाराष्ट्रीय वर्तमानपत्रांच्या मानानें सधन झाली. परंतु टिळकांच्या अमदानींत ज्याला सांपत्तिक स्वास्थ्य म्हणतां येईल असे दिवस तिला कधींच आले नाहींत व टिळकांच्या ह्यातींत ते कधींहि आले नसते. कारण अवश्य पडेल तर देशकार्याकरितां सर्वस्वावर आहुति देणें हा त्यांचा स्वभाव होता.

स्वार्थत्यागबुद्धीप्रमाणेंच धैर्य या गुणाचाही टिळकांच्या जीवनांत अलौकिक प्रकर्ष झालेला दृष्टोत्पत्तीस येतो. 'संकटें व आपण यांत शर्यत चालली असून आपण हार जायचें नाहीं,' असा त्यांनीं आपल्या चिरंजीवांस पत्रांमधून केलेला उपदेश ते किती पूर्णपणें आचरीत हें दिसून येतें. सार्वजनिक जीवनांत डे. ए. सोसायटीच्या सभासदत्वाचा राजीनामा, सुरतेच्या काँग्रेसमधील प्रसंग, १९०९ मधील जस्टिस दावर यांस शिक्षेच्या सुनावणीपूर्वी दिलेलें उत्तर, मंडालेच्या तुरुंगांतून सुटकेबद्दलची भूमिका स्पष्ट करणारीं श्री. खापर्डे यांस लिहिलेलीं पत्रें, चिरोल केसमध्यें निष्णात कायदेपंडित सर एडवर्ड कार्सन् यांस उलटतपासणींत दिलेलीं उत्तरें, असे एक-ना-दोन, अनेक प्रसंग टिळकांच्या अलौकिक धैर्याची साक्ष देतात. १९०९ सालीं ६ वर्षांच्या सक्तमजुरीच्या शिक्षेचा निकाल ऐकल्यानंतर ऑर्थर रोड जेलकडे परत जातांना वाटेंत टिळकांस झोंप लागली व सार्जंटनें त्यांना जागें करतांना प्रश्न केला. त्यास उत्तर म्हणून 'आमचें काम संपलें, आतां कांहीं करावयाचें नसल्यामुळें झोंप आली,' असें त्यांनीं सांगितलें! अशी आणखी एक आठवण प्रसिद्ध आहे. तीवरून टिळकांच्या धैर्यवृत्तीची कल्पना येते. सौ. टिळकांच्या निधनाचीं वार्ता मंडाले येथील

जेलमध्यें असतांना कळली. तेव्हां रा. धोंडोपंत विद्वांस यांना टिळकांनीं लिहिलेलें पत्र वाचल्यास खरा सत्याग्रही देशभक्त कसा असतो व संसारांतील अत्यंत प्रिय अशा व्यक्तीचा वियोगही ध्येयाकरितां कर्तव्यबुद्धीनें व कर्मयोग्याच्या भूमिकेवरून टिळकांनीं कसा सहन केला हें समजतें. माझ्यामतें टिळकांइतकें शुद्ध व विचारशील परंतु अत्यंत तेजस्वी धैर्य फारच थोडचा आधुनिक हिंदी नेत्यांत दिसून येतें.

स्वार्थत्याग व धैर्य याप्रमाणेंच टिळकांची परोपकारबुद्धिही अलौकिक होती. लहान-थोर व्यक्तींना ज्याच्या त्याच्या जरुरीप्रमाणें सरकारी नोकरीकरितां शिफारसपत्रें देण्यापासून, राजद्रोहाच्या शिक्षेनंतर पोलिसांचा ससेमिरा पाठीमागें असलेल्या तरुणांना आपल्या 'केसरी' कचेरींत नोकरीस ठेवणें, आपल्या अनेक कार्यांत व्यापृत असतांना सुद्धां कुणा गरीब शेतकऱ्याच्या वांटपाचे कागद पाहून त्याला सल्ला देणें, प्लेगानें गांजलेल्या लोकांना इतर पुढाऱ्यांप्रमाणें गांवांत सोडून बाहेर न जातां त्यांस शक्य ती मदत देणें, लांच खाणाऱ्या क्रॉफर्डसाहेबांच्या नादानें 'डागळलेल्या' मामलेदारास न्याय मिळण्याकरितां झगडणें, स्वतःवर राजद्रोहाच्या खटल्याचें काम सुरू असतां, व त्यांत अत्याचारांस उत्तेजक व प्रक्षोभक असे लेख आहेत हा आरोप असतांना व स्वतः कधींही क्रांतिकारक चळवळीस संमति दाखविली नसतांना केवळ माणुसकी म्हणून फांशीची शिक्षा दिल्या गेलेल्या कान्हेरेच्या विनंतीवरून तुरुंगांतच त्यास त्याच्या कौटुंबिक व्यवहाराबद्दल सल्ला देणें, व स्वतःच्या वाचनालयांतून गीतेची प्रत आणवून देणें, अशा अनेक लहानमोठ्या प्रसंगीं 'स्वार्थान् परित्यज्य परार्थघटक' अशा सत्पुरुषाचें लक्षण टिळकांनीं आपल्या जीवनांत सार्थ केलें आहे.

टिळकांच्या बुद्धिमत्तेबद्दल फार लिहिण्याची आवश्यकता नाहीं. न्या. रानडे या एकाच व्यक्तीशीं महाराष्ट्रांत तरी त्यांची तुलना करतां येईल. कोर्ट-कचेऱ्यांतील दाव्यापासून ज्योतिष, गणित, तत्त्वज्ञानापर्यंत सर्वांत त्यांच्या बुद्धीची अप्रतिहत गति होती हें सिद्ध झालें आहे. त्यांची संशोधनबुद्धि, विद्वत्ता व ज्ञानलालसा यांबद्दल प्रो. मॅक्समुल्लर यांसारख्या पाश्चात्य अधिकारी व्यक्तींनीं आदरभाव व्यक्त केला आहे. चारित्र्य व सखोल

बुद्धिमत्ता यामुळें 'अथांगसागर' किंवा 'गगनचुंबी हिमालय' याची टिळकांच्या सहवासांत अनेक थोर लोकांना (–त्यांत गांधीजीहि होते–) आठवण येई. 'ओरायन,' 'आर्क्टिक होम' हे प्रायः संशोधनात्मक विद्वत्तेचे ग्रंथ सोडले तरी त्यांचा लेखसंग्रह व 'गीतारहस्य' ह्या मराठींत सामान्य जनांकरितां लिहिलेल्या लिखाणावरून त्यांच्या प्रगल्भ विचारशक्तीची व सर्वकष बुद्धिसामर्थ्याची जाणीव होते.

टिळकांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायांनीं काय केलें व काय करावयास पाहिजे होतें, याबद्दल महाराष्ट्रांत बरीच चर्चा साहजिकच झाली. टिळकांनंतर महाराष्ट्र राजकारणांत मागें पडला, हें स्पष्ट आहे व माझ्या मतें ती घटना कोणीहि थांबवूं शकला नसता. त्याचीं कारणें दोन : पहिलें असें कीं, टिळकांची कर्तबगारी, थोरपणा, धैर्य, बुद्धि, यांशीं तुलना केल्यास आसपासही येईल असा एकहि नेता गेल्या ३० (आतां ४०) वर्षांत महाराष्ट्रांत झाला नाहीं. दुसरें कारण असें कीं, ज्या प्रकारची राष्ट्रीय चळवळ गांधीजींच्या नेतृत्वाखालीं या देशांत सुरू झाली तो प्रकार महाराष्ट्रीय जनतेच्या प्रकृतीशीं जुळत नाहीं; म्हणून त्यांच्या बरोबरीचे सहकारी म्हणून त्या चळवळींत पडणें महाराष्ट्रीयांस दुरापास्त होतें. साहजिकच, टीकाकार व निंदक, किंवा अनुयायी हे दोनच पर्याय सामान्य महाराष्ट्रीयांपुढें होते व ज्यानें त्यानें आपल्या स्वभावधर्मानुरूप त्यांतील मार्ग धरला. स्वतः टिळक हे गांधीजींचे निंदक, टीकाकार किंवा अनुयायी कांहींच झाले नसते. गांधींचे ज्येष्ठ सहकारी म्हणून टिळकांनीं त्यांच्या कार्यशक्तीस बंधारा घालून तीस स्थैर्य व सातत्य आणलें असतें व १५ ऑगस्ट १९४७ ला मिळालेलें स्वातंत्र्य अधिक फलदायी व अधिक निर्दोष होईल अशी त्यांनीं खबरदारी घेतली असती. गांधीजीचें अनुयायित्व पत्करणें हा बहुसंख्य टिळकानुयायांनीं स्वीकारलेला मार्ग चूक तर खराच; परंतु त्यांचे निष्क्रिय निंदक, टीकाकार होणाऱ्या टिळकांच्या अनुयायांपेक्षां कमी चुकीचा व अधिक बरोबर होता असेंच म्हणावें लागेल.

टिळकांचें व्यक्तिमत्त्व व कार्य याचें विवेचन करतांना प्रसंगोपात्त मी वृद्धचाच टिळकांची रानडे, गोखले, गांधीजी यांजबरोबर तुलना केली

आहे व त्यांचे साम्यभेद दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व थोर व्यक्तींचा थोरपणा बरोबर काय आहे व कशांत आहे हें समजून घेण्याची वेळ आतां आली आहे; तरच पुढील मार्गास त्यांतून योग्य दिशा मिळेल. केवळ टिळकपक्षीय, गांधीपक्षीय किंवा रानडे–गोखलेपक्षीय या दृष्टिकोणानें पाहणें किंवा उलट सर्वांचीच नुसती स्तुति करणें या अवस्थांतून पुढील अवस्थेंत आपण आतां आलों आहों व तसें आलेंही पाहिजे. प्रकृति व परिस्थिति-भेदांप्रमाणें यांपैकीं कोणी तरी एक प्रत्येकास अधिक अनुकरणीय व वंद्य वाटणार. परंतु विवेचक बुद्धीनें सर्वांचें थोरपण समजून घेतल्यावर वैयक्तिक रीत्या या 'रामकृष्ण-विठ्ठल-शिवा' पैकीं कोणाची कोण उपासना करतो हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, टिळक-गांधी यांच्या प्रमाणेंच रानडे-गोखले यांचीही त्यांच्या अनुयायांकडून उपेक्षाच झाली आहे. त्यांचें अनुयायित्व म्हणजे त्यांच्याशिवाय इतर नेत्यांवर टीका करणें अशी दृढ समजूत दिसते. ही उपेक्षा मूलतः अज्ञानांतून व विवेकाच्या अभावांतून उद्भवते. भावनावश होऊन प्रकृतिभेदाप्रमाणें कोठचा तरी पक्ष आपला आहे असें समजावयाचें व नंतर याबाबत कांहीं जबाबदारी आपणांवर येते, याची जाणीवही ठेवावयाची नाहीं, अशी बहुसंख्य सुशिक्षितांची वृत्ति आहे. ती कमी होण्यास अल्पस्वल्प मदत व्हावी, या हेतूनें वरील विवेचन केलें आहे. टिळक, रानडे, गोखले या तीन थोर व्यक्तींच्या जीवनांत व कार्यांत कालच्या महाराष्ट्रांतील ध्येयवादाचा प्रायः सारांश येतो, असें म्हणतां येईल.

आगरकरांचा बुद्धिवाद

(नौरोसजी वाडिया कॉलेजमधील मराठी वाङ्मय-मंडळातर्फे आगरकर-शताब्दि-समारंभ-प्रसंगीं केलेलें भाषण)

गेले कांहीं दिवस सर्व हिंदुस्थानभर लो. टिळकांच्या जन्मशताब्दि-निमित्त निरनिराळे कार्यक्रम चालू आहेत आणि टिळकांचें कर्तृत्व व जीवन यांनीं या देशाचा आजचा इतिहास घडवून आणण्यांत केवढी मदत केली, हें सर्वजन निरनिराळ्या प्रकारें विशद करून सांगत आहेत. टिळक, आगरकर आणि त्यांचे इतर समकालीन सहकारी ह्यांनीं हिंदी व महाराष्ट्रीय जीवनाची जी बहुमोल कामगिरी केली आहे, तिचें मूल्य जसजसे दिवस जातील तसतसें विचारी माणसांना अधिकाधिक पटूं लागलें आहे. त्यावेळीं निर्माण झालेले अनेक वाद आतां इतिहासजमा झालेले आहेत. त्यामुळें आलेली तत्कालीन कटुता आतां विसरली गेली आहे. त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनीं आरंभिलेल्या अनेक उद्योगांचें फळ आपण आज चाखीत आहोंत. सकृद्दर्शनीं ज्या अनेक लहानसहान वाटणाऱ्या गोष्टी त्यांनीं सतत केल्या त्यामागील भूमिका, दृष्टिकोण व तत्त्वें हीं समजून घेण्याची व पुढील प्रगतीकरितां व नव्या अडचणींच्या वेळीं, उपयोग करण्याची वेळ आतां आलेली आहे. या दृष्टीनें आगरकरांच्या व्यक्तित्वाचा विचार केला, तर त्यांच्या कर्तबगारीचें मूळ त्यांच्या विशिष्ट बद्धिवादांत होतें, असें दिसून येतें. म्हणून या त्यांच्या पुण्यस्मरणांत त्यांच्या या बुद्धिवादाचा विचार करावा व त्याचें स्वरूप समजून घ्यावें असा मनोदय आहे.

तें करण्यापूर्वी व त्या विवेचनाची आवश्यक पूर्वपीठिका म्हणून आगरकरांच्या जीवनांतील ठळक घटनांची थोडी उजळणी करूं.

ता. १४ जुलै १८५६ रोजीं कऱ्हाडजवळ टेंभू या गांवीं आगरकरांचा जन्म झाला. घरची प्रथमपासूनच गरिबी. स्वभावांत विनोद व हूडपणा आणि

खेळण्याची आवड. कऱ्हाडच्या शाळेंत इंग्रजी शिक्षणास प्रारंभ झाला. मराठी वक्तृत्व व लेखन यांची लहानपणापासून आवड. त्यांत या वयांतहि प्रगति इतकी कीं, एका प्रसंगीं त्यांनीं सभेंत एक निबंध लहानपणीं वाचला असतां हा इतक्या लहान मुलानें लिहिला असणें शक्य नाहीं, असें परीक्षकांना वाटलें. वयाच्या तेराव्या वर्षींच वडिलांच्या आर्थिक अडचणीमुळें शिक्षण सोडून मुन्सफ कचेरींत त्यांना उमेदवारी करावी लागली. कऱ्हाडहून पुढील शिक्षणाची व्यवस्था रत्नागिरीस चुलते असत त्यांजकडे होईल, या आशेनें ते तेथें दोनशें मैल चालत पोहोंचले. तेथेंहि स्वतः वाटेल ती खस्त सोसण्याची तयारी असूनहि पुढील शिक्षणाची सोय न होऊं शकल्यानें, आपले थोरले मामा अकोल्यास होते, तेथें ते गेले. ज्या पुण्यांत पुढें आगरकर व त्यांचे सहकारी यांनीं शाळा व कॉलेज सुरू केलें व अनेक गरीब विद्यार्थ्यांस शिक्षण शक्य केलें, त्या पुण्यांत चौकशी करतां शिक्षणाची सोय होणार नाहीं, असें कळल्यावर ते अकोल्यास गेले ! हायस्कुलांत आल्यापासून काव्य, नाटक व इतिहास यांची त्यांस फार गोडी होती व मूळ असलेली लेखनाची त्यांची हौस या काळांत अधिक वाढली. ज्या डौलदार भाषेनें ते पुढें सुधारणेच्या लढाया लढले त्यांचा व अभ्यासू लेखनाचा पाया येथें घातला गेला. १८७५ सालीं आगरकर मॅट्रिक झाले. या वयांत पुष्कळ विद्यार्थी आतां बी. ए. होतात; पण किती अडचणींतून व काय परिस्थितींतून ते मॅट्रिक झाले याचा विचार करायला हवा. सर्व आप्तेष्ट आतां झालें तेवढें पुरे, असें सांगत असूनही त्यांचें कौतुक वाटणाऱ्या अकोल्याच्या गुरुजनांनीं जमा केलेले ६० रुपये घेऊन 'डिग्री घेतल्यावांचून राहाणार नाहीं' या निश्चयानें ते पुण्यांत आले व डेक्कन कॉलेजांत दाखल झाले.

वर्तमानपत्रांत लेख लिहावे, निबंधस्पर्धेंत बक्षिसें मिळवावीं, कनिष्ठ मामा आपल्याला खर्चाकरितां पैसे घरून येत त्यांतून थोडी मदत करीत ती घ्यावी, अशा प्रकारें त्यांनीं अत्यंत हालअपेष्टा सोसून शिक्षण चालू ठेवलें. अंगांत घालण्याकरितां पुष्कळदां एकच सदरा असायचा तो रात्रीं धुऊन वाळवायचा व सकाळीं घालायचा. पहिल्या वर्षी त्यांनीं परीक्षेंत स्कॉलरशिप मिळविली. बी. ए. च्या परीक्षेकरितां इतिहास, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हे

त्यांचे ऐच्छिक विषय होते. १८७६ सालीं बी. ए. ची परीक्षा पार पडली. विद्यार्थिदशेंत इतकी हालअपेष्टा सोशीत असतांही 'मला असें वाटतें कीं, आपले लोक अज्ञान आहेत, त्यांना शहाणे करून सोडण्याचा प्रयत्न करावा.' हा निश्चय तेव्हांपासून त्यांनीं केला होता. आगरकर, टिळक, रानडे हे विद्यार्थी असतांना किती वाचीत, याबद्दल रानड्यांनीं विद्यार्थिदशेंत वाचलेल्या ग्रंथांची यादी केली आहे, त्यावरून कल्पना करतां येते. आजच्यासारखीं टिपणी-पुस्तकें त्यावेळीं प्रचलित नव्हती व आगरकरांसारखे विद्यार्थी तर चुकूनहि तीं हातांत धरणें शक्य नव्हतें ! संदर्भग्रंथांच्या साहाय्यानें परीक्षेचीं सर्व पुस्तकें स्वतः लावावयाचीं हा त्यांचा नियम होता. असें केलेलें वाचन आणि टिप्पण, पुस्तकें व व्याख्यानांतील सारांश यांच्या साधनांनीं केलेला अभ्यास यांत जमीनअस्मानाचा फरक पडतो. साधनें वापरावीं; पण साध्य म्हणून नव्हे. कारण शिजविलेलें ज्ञान सकस ठरत नाहीं.

बी. ए. नंतर एम्. ए. करितां अभ्यास करीत असतांना आगरकरांचा टिळकांशीं संबंध आला व यावेळच्या त्यांच्या सहवासांतच दोघांच्याहि सार्वजनिक जीवनाचीं बीजें पेरलीं गेलीं. परिस्थिति बिकट असतांनाहि आगरकरांनीं स्वतंत्र देशसेवा करण्याचा निश्चय कधींहि ढळूं दिला नाहीं. त्याच वृत्तीचे टिळकहि असल्यानें दोघांच्याहि मनाला खंबिरी आली. याच सुमारास आगरकरांनीं आपल्या आईला, "तुझा मुलगा आतां एम्. ए. होणार; मोठ्या पगाराच्या व मानाच्या जागेवर तो काम करील व आपलें दैन्य जाईल, असें तुला वाटत असेल; पण पोटापुरतें मिळवून देशसेवेचें व लोकशिक्षणाचें कार्य करावयाचें असें मी ठरविलें आहे. म्हणून इतर चार मुलांप्रमाणें आपलाहि मुलगा करील अशी आशा बाळगूं नकोस." अशा अर्थाचें पत्र लिहिलें. स्वतंत्ररीत्या, सरकारी नोकरी न करतां (न्या. रानडे यांनीं नोकरी करून देशसेवा केली, तशी मर्यादित देशसेवा आतां पुरणार नाहीं या जाणिवेनें) देशकार्य करायचें; तें कोणतें व कोणत्या पद्धतीनें, याबद्दल अनेक वाद होऊन प्रथम मूलभूत म्हणून शिक्षणाचें कार्य करावें, याबद्दल या दोन स्नेह्यांचें मतैक्य झालें. त्याच सुमारास कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे असलेली सरकारी नोकरी सोडून खाजगी शाळा काढण्याच्या विचारांत होते. त्यांची व आगरकर-टिळकांची गांठ पडून न्यू इंग्लिश स्कूल काढावयाचें ठरलें.

या शाळेबरोबरच लोकजागृतीचीं साधनें म्हणून 'केसरी' व 'मराठा' हीं वर्तमानपत्रें व चित्रशाळा छापखाना हीं या तीन सहकाऱ्यांनीं काढावयाचें ठरविलें. प्रथम शाळेंत शिक्षक व नंतर कॉलेजांत प्राध्यापक व प्राचार्य म्हणून आगरकरांनीं आमरण कार्य केलें. आगरकरांच्या सामाजिक मतांबद्दल कितीहि विरोध झाला, तरी शिक्षक म्हणून त्यांच्याबद्दल त्यांच्या सर्वच विद्यार्थ्यांना नेहमींच अतिशय आदर व प्रेम वाटे. एक मुख्य कारण अर्थात् त्यांची विद्वत्ता, त्यांची विचार करण्याची शक्ति व साध्या भाषेंत मोहक रीतीनें कोणताहि विषय प्रतिपादन करण्याची हातोटी. पण याहीपेक्षां त्यांचें निष्कपट, प्रेमळ व थोर अंतःकरण व त्यांची विनोदप्रियता हीं होत. माझे वडील मला त्यांच्या आठवणी सांगत. धडा संपला कीं अवांतर विषयांवर बोलायची त्यांना फार हौस. (हें किती कमी होतें हल्लीं!). अवांतर विषय म्हणजे 'सद्यःस्थिति.' त्यांचीं मतें बहुतेक विद्यार्थ्यांना पटायचीं नाहींत. "अरे, तुम्हांला तें पटायचें नाहीं; पण पुढें समजेल. मी सांगून ठेवतों." मुलें चिडवण्याकरितां प्रश्न विचारावयाचीं. शांतपणें, गमतीनें व आपली भूमिका न सोडतां त्यांना त्यांनीं उत्तरें द्यावयाचीं. रागावतां यावयाचेंच नाहीं! क्षणभर राग आला तर ताबडतोब जायचा. ह. भ. प. पांगारकरांनींहि आपले गुरु टिळक–आगरकर–गोखले यांचें वर्णन केलें आहे. त्यांत त्यांनीं आगरकरांचीं मतें न पटूनहि त्यांचें औदार्य, निष्कपट वृत्ति व प्रेमळपणा यांचें वर्णन केलें आहे. विद्यार्थ्यांमध्यें अगदीं धकाधकीच्या काळांतहि आगरकर प्रियच राहिले, असें त्यांनीं सांगितलें आहे.

'केसरी' व 'मराठा' या वर्तमानपत्रांतील लेखन चिपळूणकर, आगरकर व टिळक हे तिघेहि करीत. चिपळूणकर लवकरच निवर्तले. आगरकर खरोखरच लेखनाचे हौशी असल्यानें ते पुष्कळच लिहीत. हें लिखाण अभ्यासपूर्ण, विचारी व सर्वच क्षेत्रांत सुधारकी वाण्याचें असे. टिळक व आगरकर यांच्या कार्यपद्धतींत जो महत्त्वाचा मतभेद पुढें झाला तो या वेळेपर्यंत प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस आला नव्हता. तो होता हें मात्र डेक्कन कॉलेजमध्यें असतांना त्यांचे जे वादविवाद होत त्यांवरूनहि बारकाईनें पाहिल्यास दिसून येतें. म्हणून टिळकांनीं लोकप्रियतेकरितां आपलीं मतें नंतर बदललीं, हें म्हणणें साधार नव्हे

सर्व प्रकारचा अन्याय वेशीवर टांगणें हें 'केसरीचें कार्य' असल्यानें कोल्हापूर-दरबारांत राजाविरुद्ध कारस्थानें झालीं व त्याचे हाल झाले. त्यांचें वर्णन कोल्हापूरहून मिळालेल्या बातमीवरून 'केसरीं' त देण्यांत आलें. त्याबद्दल टिळक व आगरकर यांच्यावर खटला होऊन उभयतांना शिक्षा झाली. कायदेशीर दृष्ट्या प्रसिद्ध केलेल्या मजकुराबद्दल पुरावा आरोपींना पुढें आणतां आला नाहीं. त्यामुळें त्यांना शिक्षा होणें क्रमप्राप्त होतें. परंतु आपला कांहीं स्वार्थ नसतांना चौकशी करून योग्य वाटलेल्या पुराव्यावरून अन्याय उघडकीस आणण्याच्या एकाच हेतूनें वर्तमानपत्रकर्त्यांचें कर्तव्य म्हणून टिळक-आगरकरांनीं हा मजकूर प्रसिद्ध केला होता. त्याबद्दल त्यांना शिक्षा झाली व ती त्यांच्या सार्वजनिक जीवनाची दीक्षाच ठरली. आपल्या धैर्यानें व हालअपेष्टांनीं दोघांनींहि जनतेच्या हृदयांत कायमचें मानाचें स्थान मिळविलें. त्यावेळीं किंवा नंतर केव्हांहि या दोघांनीं शिक्षेच्या किंवा निंदेच्या भयानें सत्य लपविलें नाहीं. या प्रकरणांतहि पुन्हां लिहितांना स्पष्टपणें कोल्हापूरच्या राजावरील अन्यायाचा 'केसरी' नें कडक शब्दांत निषेधच केला. डोंगरीच्या तुरुंगांतील ते १०१ दिवस कसे घालविले, याचें आगरकरांनीं फार मार्मिक वर्णन केलें आहे. त्यांतील 'आतांप्रमाणें फिरून तुरुंगांत यावें लागलें, तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत त्या गोष्टी कोणत्या–वगैरे विषयांवर आमचा एकेक वेळ एवढ्या मोठ्या जोरानें वाद चाले कीं, आसपासचे शिपाई 'हळू बोला – हळू बोला' असा इशारा करीत व बोलतां बोलतां रात्र निघून जाई.' हें वाक्य अविस्मरणीय आहे. किती पक्क्या दिलाचे हे देशसेवक होते ! तुरुंगांत जाणें त्यावेळीं किती कठीण होतें, हें लक्षांत घेतल्यास व वयाच्या पंचविसाव्या वर्षीं हा फटका बसूनहि गाजावाजा न करतां व तुरुंगवास म्हणजे देशसेवा ही कल्पना न करून घेतांहि जरूर पडल्यास वाटेल तितक्या वेळां हे असले हाल, मानहानि, जीवनांतून उठण्यासारखे हे प्रसंग स्वीकारलेच पाहिजेत, याबद्दल त्यांनीं केलेल्या व पाळलेल्या निश्चयावरून त्यांचें अलौकिकत्व प्रत्ययास येतें. आगरकर व टिळक यांनीं या व इतर सोसलेल्या हालअपेष्टांचें वर्णन केलें आहे. त्यांत इतका विनय व इतकी विनोदबुद्धि आहे कीं, आपल्या मोठेपणानें दुसरा भांबावून जाऊं नये, अशी जणूं खबरदारी ते घेत आहेत असें वाटतें !

याच सुमारास व प्रायः ह्या तुरुंगांतच आगरकरांनीं 'हॅम्लेट' चें भाषांतर 'विकारविलसित' हें लिहिलें.

१८८५ सालीं फर्ग्युसन कॉलेज सुरू झालें. आतां दरवर्षी अनेक कॉलेजें सुरू होतात; परंतु सरकारी नियंत्रणाखालीं नसलेली, स्वार्थत्यागपूर्वक, देशहिततत्पर, एतद्देशीय कर्तबगार विद्वानांनीं स्थापन केलेली ही पहिलीच संस्था. तिचा साहजिकच फार बोलबाला झाला. हिंदी लोकांनीं प्रगतिपथावर स्वावलंबनानें टाकलेलें हें पहिलें पाऊल म्हणून सर्वांनीं त्यांचें स्वागत व कौतुक केलें ! आगरकर व टिळक यांच्या विचारसरणींतील भिन्नता आतां अधिक स्पष्ट होऊं लागली; सहकाऱ्यांचा टिळकांना अधिक पाठिंबा होता. त्यामुळें 'केसरी' चें लेखन करतांना आगरकरांची कुचंबणा होऊं लागली. त्यांतच 'सुधारका' चा जन्म झाला.

यांत यावज्जन्म अंगीकारलेलें व्रत आगरकरांनीं चालविलें व सामाजिक आर्थिक, राजकीय व धार्मिक या सर्व बाबतींत सडेतोडपणें लोकहितार्थ आपले विचार कुशलतेनें व कळवळ्यानें प्रगट केले. 'देवाच्या सख्यासाठीं पडाव्या जिवलगांच्या तुटी' असें हें कठोर व्रत पाळणें हेंच आगरकरांनीं आपलें समाधान मानलें.

आणखी कांहीं वर्षांनंतर टिळकांचा आगरकरादि सहकाऱ्यांशीं संस्था कोठच्या तत्त्वावर चालवावी, याबद्दल तीव्र मतभेद होऊन टिळकांनीं १८९१ मध्यें डे. ए. सोसायटी सोडली. या बाबतींत योग्यायोग्याची बरीच चर्चा झाली आहे; परंतु माझ्या मतें झालें तें अपरिहार्य होतें व परिणामीं हितकारकच ठरलें, इतकेंच म्हणतां येईल. त्यांत टिळकांची बाजू सदोष होती, असें कांहीं जण म्हणत. परंतु सर्व उपलब्ध पुरावा पाहिला, तर तसें म्हणण्यास सबळ कारण दिसत नाहीं. उलट आगरकर-गोखले यांसारखीं माणसें तत्त्वच्युत झालीं, असेंहि म्हणणें कठीण आहे. म्हणून स्वभावपद्धति आणि कर्तबगारीचें क्षेत्र यांबाबत या मंडळींतील भिन्नता एका विशिष्ट बिंदूपर्यंत आल्यामुळें त्यांचे मार्ग भिन्न होणें अपरिहार्य व इष्टहि होतें, इतकेंच म्हणणें श्रेयस्कर होय.

येथून पुढें पांच वर्षें (१८९१–१८९५) सुधारणेच्या अनेक लढाया टिळक-आगरकर प्रतिस्पर्धी म्हणून लढले. संमतिवयाचा कायदा, मिशन

हाऊस चहा-प्रकरण, शारदा-सदन, सामाजिक परिषद् या व अशा प्रकरणीं त्यांचे फार जोराचे वाद झाले. आगरकरांनीं नेहमीं सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला व या नाहीं त्या कारणानें तिच्या मार्गांत अडथळे आणणारांवर कडक टीकाप्रहार केले. याबरोबरच अर्थकारण व राजकारण यांबाबतही त्यांनीं नेहमींच स्वाभिमानी व पूर्णपणें राष्ट्रीय अशी भूमिका घेतली. त्यांचे राजकीय लेख थोडे आहेत; पण ते टिळकांच्या बोंचक व सडेतोड लेखांसारखेच आहेत. आगरकरांच्या भाषाप्रभुत्वामुळें ते अधिकच वाचनीय झाले आहेत. प्लेगबद्दल लेखावरून टिळकांवर खटला झाला; पण आगरकरांनीं त्याबाबत टिळकांपेक्षां जास्त चिडून लिहिलें होतें. तो उतारा वाचण्यासारखा आहे. स्वदेशीचा पुरस्कार, भारतीय कलांचें महत्त्व, आपल्या लोकांची उद्योगपराङ्मुखता, स्त्री-शिक्षणाची आवश्यकता, देशी भाषांतून शिक्षण देण्याची जरुरी, अस्पृश्यता, जातिभेद, घटस्फोट इत्यादि अनेक विषयांवर आगरकरांनीं विचारपूर्वक, अनुमानें व पुरावे देऊन लिहिलें. धर्मविषयक लिखाणांत ते नास्तिक नव्हते; पण अज्ञेयवादी भूमिकेचा पुरस्कार व एकंदर विचारसरणीचा पाया Mill, Spencer, Bentham यांच्या उपयुक्ततावादावर म्हणजे ऐहिक परंतु, सुसंस्कृत मानवकल्याण किंवा मानवसुखवाद यांवर होता. आधुनिक भौतिक शास्त्राची पद्धति व त्यांचे निर्णय ते प्रमाणभूत मानीत व आपल्या लोकनीं त्यांचा अधिकाधिक उपयोग करावा, असें प्रतिपादीत.

कॉलेजांतील सहकारी, विद्यार्थी, महाराष्ट्रांतील व इतरत्र अनेक पुढारी मंडळी त्यांचा आदर व प्रेम मिळवीत. स्वतःच्या लेखणीच्या वाढत्या व्यापाबरोबर व सामर्थ्याबरोबर प्रतिस्पर्ध्यांच्या वाढत्या टीकेला व पुराणमतवादी लोकांपैकीं कांहींच्या निंदेला, कुचेष्टेला तोंड देत, अध्ययन-अध्यापनाचें काम उत्तम प्रकारें करीत, बेताचीं आर्थिक साधनें व दम्यासारखा क्लेशकारक आजार यांतून आपलें कार्य अगदीं शेवटपर्यंत आगरकरांनीं सर्वस्वीं अनृणी राहून केलें व उलट इतरांवर सारखे उपकारच केले. लहानसहान बाबतींतही अनृणी राहाण्याची व दुसऱ्याला आपल्यामुळें अडचण पडूं नये, याविषयीं इतकी दक्षता घेण्याची त्यांना संवय होती कीं, आपल्या अंत्यसंस्काराला लागतील त्या पैशांची पुरचुंडी त्यांनीं करून ठेविली होती.

त्यांच्या निधनानंतर सगळ्यांनाच फार हळहळ वाटली व त्यांच्या मोठेपणाचें अंतःकरणपूर्वक गुणगान झालें.

आगरकर वयाच्या ३९ व्या वर्षीं निधन पावले. दारिद्र्य, प्रकृतीचें अस्वास्थ्य व लोकविरोध यांना न जुमानतां, टिळक व गोखले अशा थोर व्यक्तींना आदरानें मान लववावी लागेल, इतकी कामगिरी त्यांनीं इतक्या अल्पायुष्यांत केली, याचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. आगरकर यांच्या पिढींतील टिळक व मागच्या पिढींतील रानडे सोडले, तर त्या वेळचे अनेक कर्तबगार लोकनेते विद्वान् व अल्पायुषी होते. चिपळूणकर व आपटे ३२ व्या वर्षीं, आगरकर ३९ व्या वर्षी, तर गोखले ४९ व्या वर्षीं निधन पावले. पुणें शहरांतून हिंडतांना अनेक वेळां या व्यक्तींनीं जिथें आपले अनेक उद्योग आरंभिले, तीं स्थळें पाहिल्यावर चमत्कारयुग अजून संपलें नाहीं, असें वाटल्याशिवाय रहावत नाहीं ! आजच्या तुलनेनें ज्ञानार्जनाचीं व इतर अनेक जीवनोपयोगी साधनें त्यावेळीं अल्प होतीं. शिक्षित व्यक्तींची स्वतःची आर्थिक व सामाजिक परिस्थिति थोड्या श्रमानें सुधारण्यासारखी होती. त्याबद्दल त्यांना दोषहि लागला नसता. असें असतांना परकीय सत्ता, लोकांचें अज्ञान व सामान्य सुशिक्षितांतील आळस, ध्येयशून्यता व लाचारी यांच्या विरोधास न जुमानतां, वैभव व सुस्थिति यांना लाथाडून आपल्या आयुष्याची केवळ जनहितार्थ जळणारी दिवटी या व्यक्तींनीं पेटविली; म्हणूनच सामान्यतः दोन-दोन जन्म पुरणार नाहींत, इतकी मोठी कामगिरी सामान्य मानवी जीवनाचा अर्धा हिस्सा त्यांच्या वांट्याला येऊनहि त्यांनीं पुरी केली. सैन्यांत दाखल न झालेले, परंतु अतिशय पराक्रमी व देशहिततत्पर असे हे योद्धेच होते. आपण स्वतः धारातीर्थी पडून त्यांनीं आपणां सर्वांस वांचविलें आहे व आपणास प्रगतिपथावर आणून सोडलें आहे. आगरकरांनीं ही लढाई प्रायः त्यांच्या बुद्धिवादानें लढविली; म्हणून त्यांचा थोडा सविस्तर विचार आतां आपण करूं.

हिंदुस्थानांतील आजच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांत, तत्त्वज्ञानाचा बुद्धिवादाशीं विशेष संबंध आहे असें नव्हे, या मताचे पुष्कळ लोक आहेत

त्यांच्या मतें भारतीय तत्त्वज्ञानाची जगाला विशिष्ट देणगी असेल, तर ती ही कीं, बुद्धिवाद मानवी जीवनाचें व विश्वाचें रहस्य समजून घेण्यास समर्थ नाहीं, ही जाणीव त्या तत्त्वज्ञानानें नेहमीं ठेविली. माझ्या अल्प समजुतीप्रमाणें हें मत भ्रममूलक व धोक्याचें आहे. भारतीय तत्त्वज्ञानेतिहासावर त्यामुळें अन्याय होतो व येथील तत्त्वज्ञानाची पुढें प्रगति होण्याच्या दृष्टीनें ही बुद्धिपराङ्मुखता भयावह आहे. मुख्य म्हणजे बुद्धिप्रामाण्याचा किंवा खऱ्या बुद्धिवादाचा हा अजाणतां केलेला अपमान आहे !

जीवनांतील मूल्यें व प्रत्यक्ष अनुभव यांशीं तुटक किंवा विरोधी अशी तार्किक अनुमानपद्धति म्हणजे बुद्धि असा वरील मंडळी बुद्धीचा संकुचित, इतकेंच नव्हे तर, पूर्णपणें अवास्तव असा अर्थ करतात. व मग त्या साधनानें जीवनाचें व सृष्टीचें व्यवहारांत किती गौण स्थान आहे, हें ते दर्शवितात. उलट आगरकरांसारखी खरी बुद्धिवादी व्यक्ति बुद्धि म्हणजे विवेकशक्ति असें प्रतिपादी. अनुभवाच्या निरनिराळ्या शाखा व पातळी यांचें योग्य मूल्यमापन करून त्यांतील महत्त्वाचा, प्रगतिपर, मूलभूत भाग कोठला व गौण कोठला, हें ठरविणें, याला विवेक म्हणत असल्यामुळें जीवन किंवा अनुभव यांशीं 'विवेकी' मनुष्य कधींहि पराङ्मुखता दाखवीत नाहीं, असें त्यांनीं प्रतिपादिलें.

आधुनिक बुद्धिवाद्यांचे अग्रणी श्री. रसेल यांची भेट घेण्याचा योग आला होता, त्यावेळीं संभाषणांत व त्यांच्या लिखाणांतहि अनेक वेळां 'बुद्धि' म्हणजे मनुष्यानें स्वीकारलेल्या साध्यांची प्राप्ति सुलभतेनें करून देणारें साधन, असें त्यांनीं प्रतिपादिलें. याचा अर्थ साध्यें किंवा ध्येयें यांची निवड करण्यांत बुद्धीचा उपयोग नाहीं, असा दिसतो. प्रत्यक्ष रसेल यांच्या मनांत बुद्धीचा इतकाच मर्यादित अर्थ आहे, असें मला वाटत नाहीं; परंतु तसा जर असेल तर हें बुद्धिप्रामाण्य आगरकरांना मान्य होण्यासारखें नाहीं. बरें कोठचें व वाईट कोठचें, इष्ट काय व अनिष्ट काय, राष्ट्रहितकारक काय व राष्ट्रहितविरुद्ध काय, याचा निर्णयहि आपणांस बुद्धीच्या साह्यानेंच मिळतो. तसा मिळवूनच मग तत्प्रीत्यर्थच योग्य साधनांची निवड करावी, अशी आगरकरांची भूमिका

दा. क्र. 9230

होती. भौतिक शास्त्रांत त्या त्या विषयाचा शास्त्रविषय नीट समजून घेण्याकरितां बुद्धीचा उपयोग करावा लागतो. आगरकरांनीहि बुद्धीचा असा उपयोग केला. परंतु भौतिक शास्त्रांप्रमाणें सामाजिक व जीवन-विषयक अनुभवांतहि सम्यक् ज्ञान बुद्धिमार्गानेंच मिळतें, असा त्यांचा विश्वास होता.

आंधळी श्रद्धा, गतानुगतिकत्व, सत्ताधारी व्यक्तीचें दडपण, विचार करण्याबाबत आळस, किंवा भीरुता यांच्या कचाट्यांत न सांपडतां मनुष्य-प्राण्याला ज्या ज्या वासना व आकांक्षा स्वभावतः आहेत त्यांचें वैयक्तिक व सामाजिक जीवनांत पूर्णतः चीज व्हावें, व्यक्तित्वाच्या प्रगतीला व व्यक्तीच्या समाधानाला पूर्ण वाव मिळावा, हें ध्येय बुद्धि आपणापुढें ठेविते.

त्या ध्येयाच्या प्राप्तीकरितां निसर्गाचे नियम समजावून घेऊन सर्व क्षेत्रांत वेळोवेळीं काय साधनें वापरावीं, हेंहि बुद्धिच आपणांस सांगूं शकते, असें आगरकर समजत. इतर कांहीं देशबांधवांप्रमाणें आपलें तें सर्व कांहीं चांगलें असें आगरकरांस वाटत नव्हतें. उलट निदान आजमितीस आपण अतिशय निकृष्टावस्थेस आलों असून माणसानें काय मिळवावें व त्याकरितां काय उपाय योजावे या दोन्हींबद्दल आपल्या समजुती व आचार—आपल्यांतील सुशिक्षित व शहाणे म्हणविणाऱ्यांच्याहि समजुती व आचार—अतिशय अडाणीपणाचे आहेत व मनुष्याची निसर्गदत्त बुद्धि वापरण्यास त्यांची नाखुषी दिसते, असें त्यांना वाटे. जन्मभर लोकनिंदा सोसून त्यांनीं हें स्पष्टपणें सांगितलें. परंतु पाश्चात्यांचें सर्व बाबतींत आपण अनुकरण करावें, किंवा आपल्या संस्कृतींत किंवा जीवनांत कांहींहि मौलिक गोष्टी नाहींत, असें आगरकर कधींच म्हणाले नाहींत. उलट कलाकुसरीपासून तत्त्वज्ञानापर्यंत सर्व बाबतींत आपल्यांतील अनेक व्यक्तींनीं विशिष्ट कौशल्य दाखविलें आहे व नव्या परिस्थितीतहि आपले विशिष्ट गुण व जीवनविषयक आपली कार्यपद्धति न सोडतां आपण डोळस व प्रगतिमान् व्हावें, हीच त्यांची भूमिका होती. याबद्दल आगरकरांनीं अनेक ठिकाणीं फार स्पष्टपणें लिहून ठेवलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, डाणे. स्थापना
वनुक्रम ७४१३९ दि. ....
दिनांक १९६३ दि. ७/३/७

बाह्य पाश्चात्य आचारविचार किंवा छानछोकी यांचा सुधारणेशीं किंवा खऱ्या प्रगतीशीं कांहीं संबंध नाहीं, ही गोष्ट आगरकरांचा स्वतःचा जीवनक्रम व त्यांच्या संवयी लक्षांत आणल्या म्हणजे सहजच कळून येईल.

आगरकरांच्या बुद्धिवादाचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे तो विवेकाप्रमाणें अभ्यासावर अधिष्ठित होता. कोणच्याही विषयावर मत बनविण्याच्या व विशेषतः लोकांपुढें तें मांडण्याच्या अगोदर त्याबाबत आपणांस उपलब्ध असलेलें सर्व वाङ्मय वाचण्याचा त्यांचा प्रघात होता. बुद्धि वापरावयाची किंवा तर्क चालवावयाचा तो इतक्याच अर्थी कीं अभ्यासानें, निरीक्षणानें व अनुभवानें जी सामुग्री मिळेल तिची सारासारपूर्वक योग्य बांधणी करावयाची. याचा अर्थहि इतकाच कीं, जो विशिष्ट अनुभव-समुच्चय आपणांपुढें असेल त्याचा इतर स्वीकृत व मान्य अनुभवांशीं मेळ बसेल असें करणें. आगरकरांच्या वेळच्या इतर अनेक पुढाऱ्यांत—रानडे, टिळक, गोखले इत्यादींत—हा गुण प्रकर्षानें वास करीत होता. म्हणूनच अजूनही त्यांनीं लेखनांत आणि भाषणांत प्रतिपादिलेलीं मतें व भूमिका त्या त्या क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांस मार्गदर्शक ठरतात. अभ्यास करणें म्हणजे नुसते ग्रंथ वाचणें नव्हे; तर ग्रंथ समजून व आपल्या अनुभवांशीं पडताळून वाचणें हें होय. असा अभ्यास म्हणजे निरीक्षण व अनुभवाचाच विस्तार होय. त्यावर अधिष्ठित असलेला बुद्धिवाद म्हणजे आपल्या व इतर थोर लोकांच्या अनुभवानें सुचलेला शहाणपणाचा मार्ग. हा आगरकरांनीं यावज्जन्म आचरला.

आगरकरांच्या बुद्धिवादाचा याहून महत्त्वाचा गुण असा कीं, तो व्यापक व सर्वगामी होता. हिंदु समाजांतील सामाजिक व धार्मिक आचार-विचारांबद्दलच आगरकरांनीं आपलें बुद्धिसाधन वापरलें नसून त्यांचें निरीक्षण देशबांधवांच्या सर्वांगीण जीवनविषयक असे. राजकारण, अर्थकारण याबद्दलहि त्यांनीं लिहिलें, तेंहि त्याच तर्कशुद्ध पद्धतीनें व दृष्टिकोणांतून. त्यांतहि त्यांनीं कधीं तडजोड मान्य केली नाही, व खरें वाटेल तें रुचणार नाहीं म्हणून मागें ठेवलें नाहीं.

पुष्कळ माणसें अशीं असतात कीं, तीं आपल्या जीवनाच्या कांहीं क्षेत्रांत आग्रही बुद्धिवादी असतात; पण इतर अनेक क्षेत्रांत गतानुगतिक आग्रही किंवा धरसोडीच्या वृत्तीनें वागत असतात. कांहीं विषयांत कांहींची बुद्धि चालते. इतरांत–उदाहरणार्थ गणितांत–चालत नाहीं, असाच कांहींसा हा प्रकार आहे. परंतु वर उल्लेखिलेली असमर्थता बौद्धिक नसून नैतिक असते. ओघांत आलें म्हणून सांगावेंसें वाटतें कीं, बुद्धिवाद व बुद्धिप्रामाण्य हीं बुद्धिवान् माणसांनाच साध्य असतात असें नव्हे. पुष्कळ सामान्य बुद्धीचीं माणसें निष्ठावंत व बुद्धिवादी असतात व कित्येक बुद्धिवादी लोक पूर्णपणें बुद्धिपराङ्मुख असतात. कोणालाहि बुद्धि अगदींच नसते असें नव्हे. व कोणी कितीहि बुद्धिवान् असला तरी सर्वज्ञ नसतो. म्हणून अनुभवाबद्दल विचार करण्याची जी शक्ति आपणांत आहे तिचा निरलसपणें व डोळ्यांत तेल घालून व शक्य तितक्या निरपेक्षतेनें उपयोग करणें यासच बुद्धिवाद म्हणतां येईल. हा अर्थ ज्याला समजला असेल अशी आगरकरांसारखी व्यक्ति आपल्या बुद्धीचा उपयोग सर्वच क्षेत्रांत करीत असते. महाराष्ट्रांतीलच नव्हे तर आधुनिक हिंदुस्थानांतील सुधारणावादी कार्यकर्त्यांमध्यें आगरकरांसारखे सर्वांगीण सुधारक फारच थोडे होते. स्वतः आगरकरांच्या अनेक चाहत्यांनाहि त्याची नीट जाणीव नव्हती. आणि अनेकांना ती जाणीव ठेवणें सोयीचेंहि नव्हतें. परंतु आगरकरांच्या लेखनाचा थोडाहि अभ्यास केला तरी ही गोष्ट स्पष्ट होणार आहे.

अनेक बुद्धिवाद्यांत नसतो, पण खऱ्या बुद्धिवाद्यांत अवश्य पाहिजे, असा आगरकरांच्या बुद्धिवादाचा आणखी विशेष गुण म्हणजे 'सहिष्णुता'! आगरकरांचें टीकास्त्र किती कठोर होतें व दांभिकांची निर्भर्त्सना किती तीक्ष्ण शब्दांनीं व बोंचक विनोदानें त्यांनीं केली आहे, हें सर्वांस माहीत आहे. परंतु प्रामाणिक मतभेद असणाऱ्या व्यक्तीबद्दल, किंवा परंपरागत समजुतीमुळें नवे विचार समजून घेण्याची शक्ति ज्यांच्यांत नाहीं त्यांबद्दल त्यांनीं कधींच असहिष्णुता दाखविली नाहीं. त्यांच्या स्वतःच्या पत्नी त्या बेळच्या इतर स्त्रियांप्रमाणें जुन्या आचारविचारांच्या होत्या. त्यांना आगरकरांनी समजावून पाहिलें; पण परंपरेच्या दडपणामुळें त्यांच्या पत्नीस हे नवे विचार पटत नव्हते. मनांत आणलें असतें तर त्यांना आपल्या मर्जीप्रमाणें

वागावयास लाविणें व आपल्या सुधारणा-प्रेमाला दोष न लागेल असें करणें आगरकरांना शक्य होतें. पटतें म्हणून नव्हे, तर पतीची आज्ञा म्हणून त्यांच्या पत्नीनें नवे आचार आचरणांत आणले असतेहि; पण असें करण्याचें चुकूनहि आगरकरांच्या मनांत आलें नाही. 'मी जर मला पटतें तसें वागण्याचें स्वातंत्र्य मागतों, तर तिचें स्वातंत्र्य मी काय म्हणून हिरावून घेऊं' असा त्यांनीं विचार केला. सांगून पाहिलें; पण 'तुला पटल्याशिवाय मी म्हणतों म्हणून तूं असें कर,' असें म्हटलें नाहीं. पुढें एकदां कॉलेजांत एका टिळक-पक्षीय विद्यार्थ्याला कांहीं मदत द्यावी न द्यावी याबद्दल सहकाऱ्यांत चर्चा चालली असतां 'आम्हाला शिव्या देतो. देवो बिचारा! त्याच्या समजुतीप्रमाणें बरोबर असलेल्या मतांकरितां. तीं आम्हांस पटत नाहींत म्हणून होतकरू विद्यार्थी असून, त्याला मदत नाकारणें सर्वथैव अयोग्य होय!' असें आपलें मत सांगून त्याला आगरकरांनीं मदत देवविली. सामान्य बुद्धिवाद्यांचा असहिष्णुता हा Characteristic pitfall आहे व सुधारणा पक्षाचें त्या दोषामुळें फार मोठें नुकसान झालें आहे. आपल्या अलीकडच्या सुधारकांत अण्णासाहेब कर्वे यांच्या आचारविचारांत तो नाहीं; म्हणून सुधारणेच्या कांहीं विशिष्ट क्षेत्रांत कां होईना, पण फार मोठें कार्य त्यांच्या हातून झालें. आगरकर व कर्वे यांच्या कार्यपद्धतींत पुष्कळ भिन्नता आहे, याबद्दल पुढें थोडा विचार करूं. परंतु अन्याय व असत्य याबद्दल अत्यंत कडक टीकास्त्र वापरणारे आगरकर मतभेद किंवा प्रामाणिक अज्ञान याबद्दल असहिष्णु नव्हते. कर्वेहि तसें नाहींत. दोघांच्याहि बुद्धिवादाचा हा मोठा गुण आहे, इतकेंच सध्यां म्हणावयाचें आहे.

आगरकरांचें कठोर टीकास्त्र—ज्याला त्यांच्या भाषाप्रभुत्वानें, विद्वत्तेनें, कल्पनाचातुर्यानें व विनोदाच्या देणगीनें फार प्रभावशाली केलें—तें सर्वांच्या परिचयाचें आहे. टिळकांनासुद्धां तें फार कडक वाटलें. सामाजिक व आर्थिक बाबतींत अवास्तव तें तर्ककर्कश व कठोर होतें, असें टिळकांचें मत होतें. आगरकरांच्या अनुयायांना व चाहत्यांना अर्थातच त्यांचें फार कौतुक वाटे. अन्याय, असत्य, ढोंग, निर्दयता, आळस यांवर धैर्यानें व प्रामाणिकपणानें कोरडे ओढून समाजपुरुषाच्या इच्छेविरुद्ध व त्याची इतराजी सोसूनहि त्यास निरोगी व सुखी करण्याचा प्रयत्न

आगरकरांनीं आजन्म केला, याबद्दल त्यांनीं आगरकरांना धन्यवाद दिले आहेत. व या धन्यवादास आगरकर सर्वथैव पात्र आहेत.

टिळकांनीं उपस्थित केलेल्या मुद्द्याचें उत्तर असें कीं, आगरकरांच्या मतें राजकीय व आर्थिक बाबींइतकीच, किंबहुना, त्याहिपेक्षां अधिक महत्त्वाची बाब आपल्या सामाजिक जीवनांतील न्यायप्रीति व त्याची गतिमानता ही होय. म्हणून आर्थिक व राजकीय बाबींत कठोर टीका योग्य, तर येथेंहि ती योग्यच आहे. शिवाय ती प्रामाणिक मतभेदांबद्दल किंवा अज्ञानाबद्दल होती. याहि मुद्द्याचा आणखी थोडा विचार टिळकआगरकरांबद्दल तुलनात्मक दोन शब्द लिहूं तेव्हां करूं. प्रस्तुत म्हणावयाचें तें हेंच कीं, टिळकांना अवास्तव व अनुयायांना योग्य व कौतुकास्पद वाटणारी ही कटुता, तर्ककर्कशता व काठिन्य यांचा–किंबहुना आगरकरांच्या बुद्धिवादाचा—खरा व एकमेव पाया आगरकरांचें मानव जातीबद्दल व म्हणून आपल्या देशबांधवांबद्दल असलेलें अपरंपार प्रेम. बुद्धिवादी कठोर अंतःकरणाचे असतात, असें बुद्धिवादाच्या टीकाकारांचें आणि त्यांनीं तसें असावें, असें त्यांच्या अनेक चाहत्यांचें मत दिसतें. तसें असण्याचें कांहींच कारण नाहीं. इतकेंच नव्हे, तर सहृदयता व उच्च आकांक्षा यांच्या सान्निध्यांतच खरा बुद्धिवादी रमतो. आगरकरांपुरतें तरी असें निर्विवाद म्हणतां येईल कीं, निष्कपट बालकाच्या अंतरंगासारखें स्वच्छ, संतांसारखें भूतदयेनें पूर्ण, कवीप्रमाणें ध्येयवादी असें त्यांचें व्यक्तित्व होतें व त्यांचे रागाचे, कठोरपणाचे शब्द त्यांच्या कनवाळू हृदयाला दुःख पाहाणें असह्य झाल्यानें येतात, तसे येत होते. त्यांना चीड येई पण ती प्रेमामुळें. कोणाच्याहि रागाला किंवा लोभाला बळी पडून मनांत आलेलें सत्य लपविण्याची संवय त्यांना नसल्यामुळें ते आपली भावना स्पष्टपणें व्यक्त करितात. कवि, संत आणि बालक यांची कोमलता असलेला त्यांचा बुद्धिवाद शब्दांत उतरला, तेव्हां कडक वाटला; पण खरा होता अत्यंत मृदु.

आगरकरांच्या बुद्धिनिष्ठ सुधारणामार्गाचें वैशिष्ट्य पूर्णपणें लक्षांत यावें व उजेडाबरोबर साहजिकच त्याचीं छायास्थळेंहि दिसावीं या हेतूनें आगरकरांप्रमाणें सामाजिक सुधारणेबद्दल आस्था असणाऱ्या

कांहींच्या कार्यपद्धतीशीं आगरकरांच्या कार्यपद्धतीची तुलना करावी, असें योजलें आहे. त्यांतील पहिले, आगरकरांच्या वेळच्या, महाराष्ट्रांतीलच नव्हे, तर या देशांतील ज्येष्ठ पुढारी न्या. रानडे, आगरकर व रानडे यांच्या सुधारणावादांतील मुख्य साम्य म्हणजे त्यांचें सर्वगामित्व. आगरकरांच्यापेक्षांहि अधिक पद्धतशीरपणें न्यायमूर्ति रानडे यांनीं हिंदी जीवनाच्या सर्व अंगांतील दोषांची जाणीव आपल्या देशबांधवांना करून दिली. निरनिराळचा दोषांच्या परिहारार्थ कार्यकर्ते तयार करण्याकरितां सतत उद्योग केला. हीं दोन्हीं कार्यें त्यांनीं आगरकरांच्या मानानें फार सौम्य पद्धतीनें केलीं. पण कांहीं प्रकारें ही सौम्य पद्धत परिणामीं अधिक हितकारक ठरते. समाजापुढें थोडेंच राहून, शक्यतों समाजाला घेऊनच पुढाऱ्यानें पुढें पाऊल टाकावें, अशी रानडे यांची पद्धत होती. तो त्यांचा स्वभाव होता व त्यांच्या निष्ठेची ती मर्यादाहि होती. आगरकरांच्या ध्येयवादित्वाला ही सौम्यता व ही तडजोड असह्य वाटे व रानड्यांविषयीं आदर असूनहि त्यांनीं याबाबत अनेकदां नापसंती दर्शविली आहे. दुसरें असें कीं, रानड्यांचें सर्व जीवन एका अर्थी त्यांच्या धार्मिकतेवर—ईश्वरी श्रद्धेवर उभारलेलें होतें. जगरहाटीचा फार दूरवर विचार करून मानवी प्रयत्नांव्यतिरिक्त कार्यसिद्धीस इतर साधनें लागतात, या जाणिवेनें रानडे हे एकान्तिक आग्रह चांगल्या गोष्टीबद्दलहि धरीत नसत व क्वचित् प्रसंगीं चाहत्यांच्या व निकटवर्ती मंडळींच्या मनाला धक्का बसेल अशी तडजोड करीत. तसें करणें कमकुवतपणाचें लक्षण नसून ध्येयनिष्ठेलाहि अधिक उच्च निष्ठेमुळें मुरड घालण्याचा तो प्रकार होता. परंतु सामान्यतः त्यांच्या कृत्यानें समाजसुधारणेचें पाऊल मागें पडलें, 'सुधारणेस अशीच घडलें', अशीच सुधारणाग्रणींची समजूत होती. आगरकरांचेंहि तेंच मत होतें. आगरकर व रानडे हे दोघेहि बुद्धिमार्गी व विचारी होते. तरीहि आगरकरांच्या व्यक्तित्वांत भावनोत्कटतेला पहिलें स्थान होतें. म्हणून त्यांना विलंब व तडजोड चालत नसे. आगरकर स्वतः एक उत्कृष्ट कार्यकर्ते असल्यामुळें मागें राहून हळूहळू कार्यकर्ते तयार करावयाचे, त्यांची जोपासना करावयाची, हें त्यांच्या पद्धतींत बसलें नाहीं. त्यांचा सुधारणावाद नैतिकतेवर, तर रानड्यांचा धर्मनिष्ठेवर अधिष्ठित होता. उत्कटतेनें जळून जाणाऱ्या

ज्योतिप्रमाणें आगरकरांचें व सतत तेवत राहाणाऱ्या नंदादीपाप्रमाणें रानडयांचें कार्य होय. समाजाच्या डोळयांत अंजन घालून एकानें त्यास खडबडून जागें केलें, तर दुसऱ्यानें सुविचाराच्या भूपाळया नित्य आळवून त्याची झोंप घालविली व त्यास कार्यप्रवण केलें.

या बाबतींत आगरकर व गांधीजी यांच्यामध्यें अधिक साम्य आहे. दोघांचेंहि सुधारणाप्रियतेचें अधिष्ठान नैतिक होतें, धार्मिक नव्हतें. गांधीजी नेहमीं धार्मिक परिभाषा वापरीत; पण God म्हणजे Love आणि Truth असेंच ते समजत. गांधींना किंवा आगरकरांना तडजोड (येथें मी गांधींच्या राजकारणासंबंधीं बोलत नाहीं) माहीत नव्हती. गांधी फार सुसंस्कृत भाषेंत बोलत व लिहीत; परंतु ते कडवे लिहीत व बोलत—सौम्य नव्हे. आगरकरांनीं प्रत्यक्ष सुधारणेच्या कार्यास व्यावहारिक पद्धतशीर-प्रकारें हात घातला नाहीं. गांधींनीं त्याकरितां मोठें आंदोलन करून यंत्रणाहि निर्माण केली. आगरकरांचें व्यक्तित्व बुद्धिमार्गी, (मूल्यें भावनात्मक असूनहि) तर गांधींचें भावनात्मक होतें व भावनेला कार्यशक्ति अधिक असते. शिवाय गांधी एका विलक्षण प्रकारें व्यावहारिक होते. पंडित पंतांनीं वर्णिलेला आपल्या गुजराथी बंधूंचा धूर्तपणा Shrewdness त्यांच्यांत नैसर्गिक होता. म्हणून लोकांना कार्यप्रवृत्त करण्याचे मार्ग आगरकरांपेक्षां त्यांना अधिक अवगत होते. पण भावनेची शक्ति ही बुद्धीच्या पाठिंब्या-शिवाय समाज-जीवनांत कायमचे व मूलभूत परिणाम घडवून आणूं शकत नाहीं व म्हणून, जातिभेदाचें उच्चाटन, अस्पृश्यता-निवारण, शिक्षण, देशी उद्योगधंदे, हिंदु-मुस्लीम ऐक्य वगैरे राजकारणाव्यतिरिक्त ज्या अनेक चळवळी गांधीजींनीं हातीं घेतल्या, त्यांनीं मूळ धरलें नाहीं व फार मोठा बोलबाला होऊन शेवटीं त्या बऱ्याच थंडावल्या. यांतील अस्पृश्यता-निवारणाच्या बाबतींत कांहीं व्यवस्थित प्रगति आहे. पण त्याचें कारण अस्पृश्य समाजांतील जागृति व सार्वत्रिक मताचा हक्क हें आहे. कसेंहि असलें तरी सुधारणा ही सर्वांगीण असते, ही जाणीव ठेवून व उत्कट भावनेच्या सामर्थ्यानें आश्चर्यकारक कार्य करतां येतें, हें स्वतःच्या उदाहरणानें गांधीजींनीं दाखवून दिलें आहे.

गु. अण्णासाहेब कर्वे यांचें निदान महाराष्ट्रीय सुधारकांत फार वरचें स्थान आहे. त्यांच्या यशाचें मुख्य कारण गाजावाजा न करतां आपल्या मर्यादांची जाणीव ठेवून, विशिष्ट क्षेत्र निवडून, कोणास न दुखवितां त्यांनीं अविरत श्रम केले. तेहि बुद्धिवादीच आहेत. व त्या शब्दाच्या अगदीं साध्या आणि सोज्वळ अर्थानें. आपणास आपल्या भोंवतीं दिसणाऱ्या समाज-रूढींत जें सुधारतां येण्यासारखें असेल, तें सुधारण्याचा सतत प्रयत्न करावयाचा व गोडीनें, चिकाटीनें कष्ट करीत राहावयाचें, शक्यतों कोणाला दुखवावयाचें नाहीं व आपल्याला अनेक सुधारणा व्हाव्यात असें वाटत असेल व त्याला वैयक्तिक पाठिंबा आपण दिला, तरी आपण होऊन आपल्या हातांतील कार्यांत व्यत्यय येईल, असे अन्य इष्ट उद्योगही हातीं घ्यावयाचे नाहींत, हें त्यांच्या कार्यपद्धतीचें वैशिष्ट्य. त्याबाबत कर्वे यांच्या आयुष्यांत एका प्रसंगीं त्यांना भांडारकरादि सुधारणाग्रणींचा—ज्यांच्याबद्दल कर्व्यांना फार आदर होता—रोषही पत्करावा लागला. स्त्री-शिक्षणाबरोबरच विधवाविवाहविषयक कामगिरीहि त्यांनीं हातीं घ्यावी, असा या मंडळींचा आग्रह होता. परंतु कर्वे यांनीं त्यांचें म्हणणें नम्रतापूर्वक पण स्पष्टपणें नाकारलें. हळूहळू आपल्या विशिष्ट कार्यक्षेत्रांत त्यांनीं इतकी चांगली कामगिरी केली कीं, आतां कांहीं वर्षें महाराष्ट्रांतील सामाजिक नव्हे तर इतरहि अनेक सुधारणांचीं कामें त्यांच्या आशीर्वादानेंच सुरू केलीं जातात.

हा प्रामाणिकपणाचा, पण व्यावहारिक बुद्धिवाद आगरकरांना जमला नसता. जेथें जेथें अन्याय असेल, दोष असतील, ते दाखवून मी त्यावर टीका करीन, सुधारणांचीं सर्व क्षेत्रें मला उपलब्ध हवींत, हा आगरकरांचा हव्यास; आकाशाला गवसणी घालण्याची त्यांची उच्च आकांक्षा, त्यांच्या बुद्धीची ही झेंप त्यांच्या भावनेची नितान्त कोमलता दाखविते. म्हणूनच सुधारणा झाली पाहिजे, असें कळवळून सांगणें व आपल्या समाजाच्या अंगच्या ज्या दोषांनीं—अप्रामाणिकपणा, भ्याडपणा, आळस इत्यादीं-मुळें ती होऊं शकत नव्हती, त्यांचें आविष्करण करणें, इतकेंच प्रत्यक्ष कार्य आगरकरांनीं केलें व आशा बाळगली कीं, कोणीतरी कधींतरी इतर पुढें करण्यसारखें कार्य करावयाला लागेल.

बुद्धिवादी व्यक्तींत लोकहितवादी, जांभेकर, सुधारणावादींत राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, यांसारखे इतर अनेक नेते महाराष्ट्रांत व इतरत्र आगरकरांच्या वेळीं अथवा थोडे आधीं असे झाले. या विषयावर आणखी सविस्तर चर्चा करतांना त्यांचाहि उल्लेख करावा लागेल. आज आणखी एकाच अर्वाचीन हिंदी व महाराष्ट्रीय नेत्याबद्दल बोलून हा विषय पुरा करतों. तो नेता म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

टिळक व आगरकर यांच्या भूमिकांबद्दल व दृष्टिकोणांबद्दल थोडा विचार करावा, असें मीं मुद्दाम ठरविलें आहे. म्हणजेच आगरकरांच्या विशिष्ट कार्यपद्धतीचा पुरा उलगडा होईल, असें मला वाटतें. टिळक सामान्य अर्थी सुधारक नव्हते; पण बुद्धिवादी नक्की होते. असें असतां आगरकरांचा व त्यांचा कांहीं बाबतींत इतका तीव्र मतभेद कां झाला व त्याबाबत दोन्ही पक्षीं काय म्हणण्यासारखें आहे, हें पाहणें इष्ट व आवश्यक आहे.

आगरकर व टिळक यांनीं आपल्या सार्वजनिक जीवनास एकाच ध्येयानें प्रेरित होऊन प्रारंभ केला. कांहीं वेळ बरोबर कार्य केल्यावर त्यांचे मार्ग भिन्न झाले व अनेक प्रश्नांबाबत त्यांचा तीव्र मतभेद झाला. स्वतः टिळक व आगरकर या मतभेदांना फार महत्त्व देत नव्हते. परंतु त्यांच्या अनुयायांस ते फार महत्त्वाचे वाटले. इतके कीं, आगरकरांच्या चाहत्यांच्या मतें टिळकांनीं आगरकर-प्रणीत बुद्धिवादी सुधारणेच्या मार्गांत पुराणमतवादी लोकांच्या राजकीय क्षेत्रांतील पाठिंब्याकरितां खीळ घातली. टिळकांनीं व त्यांच्या अनुयायांनींहि आगरकरांना दोष दिला; परंतु प्रत्यक्ष टिळकांच्या कार्यास अधिकाधिक पाठिंबा मिळत गेल्यामुळें आगरकरांनीं माझ्या कार्यांत अडचणी उत्पन्न केल्या, असें टिळकांना म्हणण्याची वेळ फारशी आली नाहीं. टिळकांनीं आगरकरांवर केलेल्या टीकेला व त्यांच्याशीं दाखविलेल्या मतभेदाला लोक विशेष महत्त्व देत नाहींत. याचें माझ्या मतें एक कारण असें असावें कीं, ती टीका खरी व तो मतभेद योग्य ठरला आहे. पण भास असा उत्पन्न होतो कीं, आगरकरांनीं टिळकांवर केलेल्या कळवळ्याच्या टीकेला उत्तरच नाहीं. स्वतः आगरकरांना याबाबत योग्य कल्पना होती व त्यांनीं त्याबद्दल स्पष्ट लिहिलेंहि आहे. तें

पुढें पाहूंच. आगरकर-पक्षीयांचा टिळकांवर हल्ला आहे. त्याचा अभिप्रेतार्थ असा कीं, राजकारणांतील यशाकरितां स्वतःस न पटणाऱ्या जुन्या समजुती व विचार यांचा टिळकांनीं पाठपुरावा केला. त्यामुळें त्यांस लोकमान्यता मिळाली व आगरकरांसारख्यांना कुचेष्टा व लोकविरोध सहन करावा लागला. मुख्य म्हणजे टिळकांसारख्यांच्या अशा वागणुकीनें सुधारणेचें कार्य नीट होऊं शकलें नाहीं. यापेक्षां पुष्कळच कटु व निंदाव्यंजक शब्दांत हे हल्ले चढविले गेले आहेत. पण शब्द विसरून मुद्द्याकडे पाहिलें, तर काय शिल्लक राहातें व त्याला टिळकांतर्फे उत्तर नाहीं काय? उत्तर थोडक्यांत असें आहे. आपल्या समाजाची व देशाची आजची अवनति होण्यास अनेक कारणें आहेत. त्यांत आमच्या अंगचे अनेक नैतिक दोष व आंधळ्या आणि अन्याय्य चालीरीती आहेत. परंतु आमची आज असलेली राजकीय व आर्थिक अवनति ही अनेक प्रकारें या दोषांचें मूळ आहे, निदान ती हे दोष वाढवीत आहे. यास्तव सर्वांनीं एकजुटीनें, धीरानें, चिकाटीनें प्रयत्न करून राजकीय व आर्थिक उन्नति करून घेतली पाहिजे. तें करतांना अनेक दुष्ट सामाजिक अन्याय साहजिकच दूर होतील. या चळवळीनें येणारें चैतन्य संचारूं लागलें कीं, इतर विकृति आपोआप किंवा कमी कष्टानें नाहींशा होतील. सर्वच गोष्टी एकदम करण्याइतकीं माणसें आपणांजवळ नाहींत. समाज मोठा व अज्ञ आहे. तेव्हां त्याला फार न बिचकवितां प्रथम फार निकडीच्या व नंतर कमी निकडीच्या गोष्टी आपण त्यांच्याकडून करवून घेऊं. कोणतेंहि सामाजिक कार्य समाजाला दुखवून व विरोधी करून होत नसतें. कायद्यानें या गोष्टी सुधारणें नेहमींच गौण; पण परकीय सत्ता असतांना तर आत्मघाताचें होय. यास्तव सामाजिक सुधारणा करावयाच्या त्या शक्यतों सलोख्यानें, प्रत्यक्ष आपल्या उदाहरणानें कराव्या व जे कोणी इतर (उदाहरणार्थ, राजकीय) क्षेत्रांत कार्य करीत असतील त्यांचें कार्य दुर्घट होईल व त्यांचे पाय ओढले जातील असें कांहीं केलें जाऊं नये. समाज-सुधारकांना पुराणमतवादी गुंडांकडून त्रास होत असला, तर राजकीय कार्यकर्त्यांचेंहि जीवन धोक्याचें व संकटाचें आहे. परकीय सत्ता, तिचे बगलबच्चे, भित्री जनता व पोशाखी नोकरीवाले सुशिक्षित यांच्या कचाट्यांतून व सुधारणावादी विद्वानांचा व मवाळाग्रणींचा उपहास सहन करीत

असतांना एखाद्याला लोकमान्यता मिळतेहि. पण तिला सवंग लोकप्रियता म्हणतां येईल काय ? म्हणून निदान Live and Let Live या न्यायाचा तरी अनुसार व्हावा व लोकांना तुम्हीं आपले करूं शकत नाहीं, या वैतागाची फेड आमच्यावर न व्हावी.

माझ्या मतें या उत्तराला प्रत्युत्तर नाहीं. कोणी किती कडक भाषा वापरली, हा मुद्दा गौण आहे. टिळकांनीं सामाजिक सुधारणेचेंहि कार्य कां केलें नाहीं, तें कोणत्याहि क्षेत्रांत कांहीं न करणाऱ्या टीकाकारापेक्षां त्यांना चांगलें समजलें असेल, असें गृहीत धरणें योग्य नव्हे काय ? कोठचेंच मोठें कार्य वेड लावून घेतल्याशिवाय होत नसतें. टिळकांच्या वेळच्या परिस्थितींत अत्यंत धैर्यानें, शहाणपणानें त्यांनीं स्वराज्याचा मंत्र लोकांना दिला व स्वातंत्र्य-प्राप्तीचा लढा अव्याहत लढविला. त्याचबरोबर त्यांनीं आणखींहि पांच-दहा कामें कां केलीं नाहींत, हें विचारण्यांत समंजसपणा आहे काय ?

टिळक हे जाणूनबुजून स्वराज्याचे मिशनरी झाले होते. गीतेचा अर्थ त्यांनीं कर्मपर लावला. भारतीय तत्त्वज्ञानाला लोकसंग्रहात्मक कर्मयोगाची झिलई दिली. एखादा संन्यासी किंवा भगवद्भक्त भेटला, तर त्याला स्वराज्याचें कार्य केल्यास तुम्हांला मोक्ष किंवा ईश्वर प्राप्त होईल, असें ते सांगत ! अशा व्यक्तीला• तुम्ही स्त्रीशिक्षणाचे, विधवा-विवाह मंडळाचे, जातिनिर्मूलन संस्थांचे कार्यकर्ते कां होत नाहीं किंवा या लोकांना उत्तेजन कां देत नाहीं, हें म्हणणें शहाणपणाचें आहे काय ? टिळकच नव्हे, तर गोखले, रानडे, गांधीजी या सर्वांच्याच मतें हिंदुस्थानच्या तत्कालीन परिस्थितींत राजकीय अवनति व मागासलेपणा हा दोष सर्वांत महत्त्वाचा व म्हणून आधीं दूर करण्यासारखा होता. व्यक्तिमात्राचे किंवा समाजाचे अनेक दोष नैराश्यामुळें, कर्तबगारी दाखविण्यास संधि न मिळाल्यामुळें आलेले असतात. म्हणून व्यक्तित्वाला किंवा समाजजीवनाला अधिक वाव मिळेल, अशी परिस्थिति निर्माण केली गेली, तर निराशेनें, आळसानें आलेले पुष्कळच दोष नाहींसे होतील, असें वाटण्यास जागा असते. हा तरतमभाव आगरकरांना मान्य नव्हता, असेंहि नव्हे. परंतु त्यांच्या बुद्धिवादाची बैठक भावनाप्रधान व नैतिक असल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांना हा

तरतमभाव सांभाळतां आला नाहीं. अन्याय दिसला, दोष दिसला, कीं त्यांचें मन कळवळावें व त्याविरुद्ध हाकाटी करावी, हा त्यांचा स्वभाव होता. कांहीं दोष व अन्यायाचा प्रतिकार थोडचा धीरानें व अप्रत्यक्षपणें करणें जरूर असतें, हें त्यांना पटत नसे. 'मी निदान खऱ्याखोट्याची, बऱ्यावाईटाची लुप्त झालेली जाणीव करून देतों, मग दुरुस्ती व्हायची तेव्हां होवो,' असें जणूं ते म्हणत. या भूमिकेंतील मोठेपणा मान्य करूनहि ती निर्दोष आहे, असें म्हणतां येत नाहीं. शिवाय ज्या दोषाविषयीं आगरकरांनीं इतका कल्लोळ उठविला त्याचें स्वरूपहि ते कांहींसें कवीच्या भावनोत्कट दृष्टींतून पाहात व म्हणून तो अनुभवहि पूर्णपणें Objective नव्हता, असेंहि म्हणतां येईल, समाजांतील अन्याय्य चालीरीती अन्याय्य होत्या, हें खरें आहे. पण आगरकरांनीं या गोष्टी फार हळुवार हृदयानें पाहिल्या. यामुळें वस्तुस्थितीचा विपर्यास नव्हे; पण अतिरंजन झालें. 'हिंदुधर्म व सुधारणा' या ग्रंथांत याची दुसरी बाजू आली आहे व जे अनेक सामाजिक अन्याय आगरकर निर्घृण समजतात, ते प्रत्यक्ष सहन करणाऱ्या व्यक्तींना तसे वाटत नाहींत, हें व या सर्व चालीरीती एकेकाळीं समाजहितार्थच अस्तित्वांत आल्या म्हणून त्या बदलायच्या तर शास्त्रशुद्ध पद्धतीनें बदलायला हव्यात, नुसता कळवळा येतो म्हणून नव्हे, असें गोळ्यांनीं दाखविलें आहे. हा विषय आतां आणखी लांबवितां येत नाहीं. परंतु आगरकरांचें सामाजिक व्यथांचें दर्शन पुरेसें शास्त्रीय Objective व ऐतिहासिक Historical दृष्टीचें नाहीं. त्या व इतर आर्थिक, राजकीय व्यथांचें त्यांत योग्य मूल्यमापन नाही व म्हणून त्यांनीं सुचविलेले उपायहि उपयोगी असले, तरी पुरेसे ठरले नाहींत, असें म्हणणें शक्य आहे. आगरकरांच्या कार्यपद्धतींत हे दोष वाटले, तरी ते दोष मोठेपणाचे द्योतकच आहेत. आपल्या समाजाच्या अनेक दोषांबद्दल जनता व सुशिक्षित समाजहि लोचट बनला असतां त्याचें अस्तित्व त्यांना समजलें व त्यामुळें त्यांना व्यथा झाली व या दोषांचें उच्चाटन ताबडतोब झालें पाहिजे, असें त्यांनी आग्रहानें प्रतिपादलें. हा दोष म्हटला तरी हेंहि म्हटलें पाहिजे कीं, असे 'दोष' असणाऱ्या व्यक्तीकडूनच समाज कार्यप्रवण होतो व प्रगति घडून येते. उलट टिळक बुद्धिमार्गी व बुद्धिप्रामाण्यवादी व त्या

अर्थी सुधारणावादी होते, यावद्दलहि खरोखर संशय असूंच नये. इतकी कुशाग्र बुद्धि, ज्ञानाची व विद्वत्तेची इतकी लालसा व आचार, विचार व उच्चार यांत पूर्णतः कर्मयोग्याची निरपेक्ष व समवृत्ति ही निःसीम बुद्धिवादाशिवाय अशक्य होत. असें असण्यानें टिळक-आगरकरांचा जो मतभेद झाला तो दोन बुद्धिवाद्यांतील मतभेदच होता. दोघेहि प्रामाणिक व आपापल्या क्षेत्रांत कर्तबगार होते. टिळकांचाहि बुद्धिमार्ग देशप्रेम, संस्कृतिभक्ति या भावनांवर आधारलेला होता. पण तो कांहींसा अधिक कणखर, व्यवहारी व तरतमभावांचें सम्यक् दर्शन घडविणारा होता. आगरकरांचा बुद्धिवाद हा बुद्धिमान्, विद्वान्, पण प्रेमळ, निष्कपट, निर्मळ अंतःकरणाचा, कवीप्रमाणें कल्पनातरल व भावपूर्ण असा होता; तर टिळकांचा बुद्धिवाद हा त्यांच्या आवडत्या कर्मयोग्याचा व कणखर देशभक्ताचा होता.

माझ्या मतें या विचारपद्धतीचा आजच्या विषयापुरता निष्कर्ष असा कीं, आगरकरांनीं केलें तें जसें योग्य, तसें टिळकांनीं केलें तेंहि योग्य. कारण, आगरकर ते आगरकर व टिळक ते टिळक. त्यांचा स्वभाव, त्यांची वृत्ति, त्यांना असलेली बुद्धीची देणगी, यांचा उपयोग त्यांनीं त्यांना शक्य होतें तें उत्तम रीतीनें करण्यांत केला. हा या दोघांचाहि मोठेपणा आहे. त्यांच्यापैकीं कोणीहि दुसरा होऊं शकला नसता. किंवा दोघेहि एकरूप होणें शक्य नव्हतें. टिळकांनीं आगरकरांशीं मिळतें घेण्यांत किंवा आगरकरांनीं टिळकांशीं तडजोड करण्यांत देशाचें नुकसान झालें असतें. कारण दोघांचेंहि कार्य झालें इतकें परिणामकारक होऊं शकलें नसतें. ज्या कलहाचें आपण इतकें महत्त्व मानतों, त्याला आगरकर वा टिळक तसलें महत्त्व देत नसत. आगरकर तर हे मतभेद उलट स्वागतार्ह मानीत.

मला आपल्याला मुद्दाम सांगावेंसें वाटतें कीं, अर्वाचीन महाराष्ट्रीयांपैकीं टिळक हे मला समजायला लागल्यापासून माझे Hero आहेत. ते अद्यापहि आहेत व त्यांचें मोठेपण अधिकाधिक समजावून घेतांना मला रानडे, गोखले व आगरकर यांची खरी ओळख झाली. या सर्वांच्या कर्तबगारीचें थोरपण लक्षांत आलें. त्यांचे मतभेद व त्यांच्या एकमेकांवरील टीका, विशेषतः टिळकांच्या प्रखर टीका वाचूनहि, मला माझें टिळकांबद्दलचें

मत बदलावेंसें वाटलें नाहीं. परंतु रानडे, गोखले, आगरकर यांच्याबद्दल अनादरहि माझ्या मनांत त्यामुळें निर्माण होऊं शकला नाहीं. हे सर्वच निरनिराळ्या प्रकारें इतके मोठे होते व इतके सच्चे होते कीं, त्यांच्या तत्कालीन मतभेदांनीं व भांडणांनीं त्यांच्या व्यक्तित्वांत यत्किंचितहि कमीपणा आला नाहीं. टिळकांच्या लेखणीचा कडकपणा सर्वांस माहीत आहे; पण आगरकरांचीहि लेखणी जात्याच तीक्ष्ण होती व त्यांनीं टिळक व इतर प्रतिस्पर्धी यांच्यावर फारच मर्मग्राही व उपहासात्मक टीका केली आहे. टिळक हयात असतां त्यांनीं व त्यांच्या अनुयायांपैकीं कांहींनीं कदाचित् आगरकरांसारख्या थोर व्यक्तीवर अवास्तव प्रखर टीका केली असेल. पण टिळकांच्या मृत्यूनंतर सामान्यतः टिळकपक्षीयांचें केळकरांचें नेतृत्वानें जें वाङ्मय प्रसिद्ध झालें, त्यांत पुष्कळ सौजन्य व प्रतिपक्षीयांबद्दल सभ्यता दर्शविली आहे. उलट रानडे, गोखले, आगरकर यांच्या चाहत्यांनीं जिवंतपणीं केली नसली, तरी टिळक निवर्तल्यावर टिळकांवर कडकच नव्हे, तर असमंजस टीका केली आहे, ही खेदाची गोष्ट आहे. माझ्या आतां विशेष मनांत असलेले दोन ग्रंथ आहेत. पहिला फाटकांचें 'रानड्यांचें चरित्र' व दुसरा आळतेकरांचें 'आगरकरांचें चरित्र.' हें दुसरें पुस्तक मीं आतां अलीकडे पुन्हां चाळलें व त्यांतले कित्येक भाग वाचतांना हें आगरकरांचें मोठेपण दाखविणारें त्यांचें चरित्र आहे कीं, टिळक-निंदेचा ग्रंथ आहे, हें समजत नाहीसें होतें. आळतेकरांस असें करण्याची काय आवश्यकता होती ? त्यांतलें कांहीं कौशल्य आगरकरांचें मोठेपण अधिक मार्मिक प्रकारें वर्णन करण्यांत जर खर्च केलें असतें तर किती बरें झालें असतें ? फाटकांच्या रानडे-चरित्राचेंहि तेंच. रानड्यांसारख्या असामान्य नेत्याबद्दल अधिक सहृदयतेनें, रसाळपणें लिहिणें शक्यच नव्हे, तर आवश्यक व सुलभ होतें. पण मग टिळकांचा समाचार कोण घेईल ? सामान्य प्रतीचा हरिदास देवाच्या मोठेपणाचें वर्णन करण्याऐवजीं आधुनिक सुशिक्षितांची नालस्ती करण्यानें जसें आपलें कीर्तन सदोष करतो तसें फाटकांनी लिहिलेल्या रानडे-चरित्राचें झालें आहे. आणि याचें कारण इतकेंच कीं, यांना आगरकर, रानडे हेहि नीटसे समजले नाहींत व टिळकांना समजून घ्यायचेंच नाहीं, ही जणूं त्यांची प्रतिज्ञाच होती ! असो.

हा कांहींसा कटु व कदाचित् थोडासा अप्रस्तुत उल्लेख केला असला तरी वरील दोन्ही ग्रंथांत गुणहि आहेतच. हें नमूद करणें जरूर आहे. रानडे व आगरकर यांचा मोठेपणा प्रथमच लोकांना सविस्तर व पद्धतशीर प्रकारें समजावून सांगण्याचा या दोन ग्रंथांत प्रयत्न आहे व विशेषतः रा. फाटक यांनीं आपले नंतरचे लिखाणांत याबाबत अधिक विधायक भूमिका घेतली आहे हें वाचकांस माहीत असेल. माझ्या टिळकभक्तीमुळें त्यांतले दोष मला कदाचित् अधिक बोंचले असतील. मुख्य सांगण्याचा मुद्दा हा कीं, टिळक, आगरकर, रानडे यांतला मोठा कोण, हा प्रश्न आपण सोडवीत नसून त्यांतील प्रत्येक तुम्हां-आम्हांपेक्षां कितीतरी व कसा थोर होता व त्यांच्या थोरपणाचीं बीजें काय, हें आपणांस पाहायचें आहे व तसें करतांना त्यांची तुलना कांहींशी अपरिहार्य आहे व ती टाळूंहि नये. आपण टाळली तरी इतिहास ती करीत आहे व करीलच. पण ती तुलना कोणा दोघांतील चूक कोण, हें ठरविण्यापेक्षां दोघांनीं कोणत्या विशिष्ट पद्धतीनें आपलें कार्य केलें, हें समजण्याकरितां असावी. एकंदर ईश्वरदत्त देणगी व स्वसंपादित कार्यशक्ति या दोहींचा विचार केला व आयुष्यमान अधिक मिळाल्यामुळें, या सर्व मंडळींपैकीं टिळक हे बहुधा अधिकांचें, अधिक काल, जीवन घडवतील असें मला वाटतें. एका अर्थीं रानडयांबद्दलहि असें म्हणतां येईल. परंतु राजकारणांत टिळकांच्या मतें सौम्य वैद्यकाचा उपचार करणारे गोखले व त्यांच्या मतें समाज व धर्मकारणांत तर्ककर्कश कडक उपाय योजणारे आगरकर यांची जागा टिळक-रानडयांनाहि कांहीं बाबतींत भरून काढतां येणार नाहीं.

समाजपुरुषाच्या सदसद्विवेकबुद्धीला झळझळीत, पण कळकळीच्या उपायांनीं जागृत करणें व त्याच्या सारासार विचारशक्तीला बौद्धिक अनुमानें, इतिहासाचे दाखले व विनोद-उपहास या साधनांनीं एक प्रकारचें आव्हान देणें, हें आगरकरांचें जीवितकार्य व तें त्यांनीं यशस्वी रीतीनें केलें, असेंच कोणीही म्हणेल. माझ्या स्वतःपुरतें बोलावयाचें, तर मी असें म्हणूं इच्छितों कीं, टिळक हे माझे पुरुषोत्तम (Hero) असले तरी मला स्वतः आगरकरहि तितकेच अनुकरणीय वाटतात. आगरकरांप्रमाणें, पण निराळ्या

कारणाकरितां मीहि स्वभावतः Unpractical आहे व तसेंच राहावें असें मला वाटतें, आणि असें असूनहि अशाहि व्यक्तींचा समाजजीवनांत उपयोग असतो असें मला वाटतें. म्हणून आगरकरांना कांहीं अर्थीं Unpractical म्हणण्यानें त्यांच्या मोठेपणाला किंवा विशिष्ट उपयुक्ततेला बाध येतो, असें मला बिलकुल वाटत नाहीं. भोंवतालच्या निकट व दूरच्या जीवनाबद्दल जें अनेक प्रश्न वेळोवेळीं उद्भवतात, तेव्हां माझ्या सहकाऱ्यांच्या म्हणण्यांतील व्यावहारिक सत्य कळूनहि मला माझें मत बदलवत नाहीं व बदलूं नये, असें वाटतें.

आतांपर्यंत माझ्या समजुतीप्रमाणें आगरकरांच्या जीवनाचा, कार्यपद्धतीचा व बुद्धिवादाचा मीं आढावा घेतला. आगरकरांना आपण स्वतः अयशस्वी आहों, असें वाटलें नाहीं. तात्कालिक खेद किंवा राग सोडला, तर टीकांनीं त्यांचें मन विव्हळ झालें नाहीं व त्यांनीं विवेकहि सोडला नाहीं आपण काय करतों, याची पूर्ण जाणीव व आपल्या मार्गाच्या योग्यतेबद्दल व आपल्या कर्तबगारीबद्दल त्यांना पूर्ण आत्मविश्वास होता. आपल्या कार्याचा विशेष स्वभाव व त्याच्या मर्यादाहि त्यांना पूर्णपणें अवगत होत्या.

असा हा आगरकरांचा बुद्धिवाद होता.आणि म्हणून टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें संपूर्ण आगरकर सामान्य माणसांना पचणें किंवा समजणें कठिणच होतें ! आगरकरांना झालेला विरोधहि त्यांचा मोठेपणाच दर्शवितो. त्यांचें तत्कालीन अपयश हें अटळ होतें. परंतु तेंहि त्यांच्या ध्येयाची विशुद्धता व उंची दर्शवितें. जसजसे दिवस लोटतील, तसतसें त्यांनीं लावलेलें सुविचारांचें रोप वाढेल व फलद्रूप होईल. त्यांनीं सुचविलेल्या शास्त्रशुद्ध उपचारांनीं आपल्या सामाजिक जीवनांतील अनेक किल्मिषें व वैगुण्यें दूर होतील. अर्थात् तेव्हां नव्हे, पण आतां तरी आपण मंडळींनीं आगरकरांनीं आरंभिलेल्या महत्कार्याला थोडाबहुत हात लावला तर !

या उलट आगरकर अशा प्रकारचे बुद्धिवादी होते म्हणून विरोधकांबरोबर त्यांना त्यांच्या जीवनांतहि जिव्हाळ्याचे सहकारी व प्रेमळ शिष्यहि मिळाले व त्यांच्याशीं सहमत नसणाऱ्या अनेकांनींहि त्यांच्या निष्कपट व थोर अंतःकरणाचें मनःपूर्वक कौतुक केलें व त्यांच्याबद्दल जिव्हाळा व आपलेपणा ठेवला आणि ते असे निष्ठावंत बुद्धिवादी होते म्हणून दारिद्र्य,

विरोध व व्याधि यांना न जुमानतां जन्मभर प्रेमाचा, न्यायाचा व डोळसपणाचा संदेश त्यांनीं पूर्ण आत्मविश्वासानें व खऱ्या समाधानी वृत्तीनें दिला.

व्यक्तीचें गैरवाजवी महत्त्व कधींहि व कोणीहि माजवूं नये. आजच्या आपल्या परिस्थितींत तर या गोष्टीचें महत्त्व फारच आहे. तसेंच प्रगतिपर जीवन जगूं इच्छिणाऱ्या व्यक्तीनें किंवा समाजानें गतेतिहासाचें वैभव व त्यांतील व्यक्तीचें मोठेपण यांच्या चिंतनांत फार वेळ व शक्ति खर्च करूं नये; तर आजचें आपलें जीवन डोळसपणानें उत्साहीपणानें, सहृदयतेनें व रचनात्मक वृत्तीनें जगावयास शिकावें, असें मला वाटतें. विशेषतः आपणां महाराष्ट्रीयांस ही गतजीवनांत रमून जाण्याची फार खोड आहे. ती आपण सुधारणें अवश्य आहे. तरीपण रानडे, गोखले, टिळक, आगरकर यांच्या जीवनाशीं समरस होऊन व त्यांचें शील, त्यांची उद्योगप्रियता, विचारशीलता व जीवनाशीं असलेला त्यांचा प्रामाणिकपणा यांची ओळख करून घेतल्याशिवाय आजच्या महाराष्ट्रीयांस स्वाभिमानाचें, संतोषाचें व स्वतःच्या व समाजाच्या उपयोगाचें जीवन जगतांच येणार नाहीं असें मला मनःपूर्वक वाटतें. त्यांच्या मार्गापासून आपण जितके ढळलों, तितकी आपली अवनति झाली व होत आहे.

आगरकरांपुरती त्यांच्या विशिष्ट दृष्टिकोणाची व कार्यपद्धतीची ओळख होण्यास या विवेचनानें आपणा सर्वांस थोडीशी तरी मदत व्हावी, या बुद्धीनें आतांपर्यंत विवेचन केलें. त्यांतील ग्राह्यांश वाचक घेतीलच.

ना. गोपाळ कृष्ण गोखले (पुण्यस्मरण)

कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखले आपणांस न्या. रानडे यांचे शिष्य म्हणवीत व गांधीजी गोखले यांस आपले गुरु मानीत. हे उभयपक्षीं संबंध नीट समजून घेतले तर ना. गोखले यांच्या व्यक्तिमत्त्वाची व कार्याची योग्य ओळख पटण्यासारखी आहे. आणखी एका थोर व्यक्तीशीं गोखल्यांचा आलेला विशिष्ट संबंधहि या दृष्टीनें लक्षांत घेण्यासारखा आहे. ती व्यक्ति म्हणजे लो. बाळ गंगाधर टिळक ही होय. टिळकांशीं गोखल्यांचे असलेले मतभेद, त्या दोघांचा विशिष्ट पद्धतीनें एकमेकांशीं चाललेला तात्त्विक संग्राम व सार्वजनिक जीवनांतील त्यांतील प्रत्येकाचें असलेलें विशिष्ट स्थान यांबद्दल पुष्कळ लेखन व विवेचन झालें आहे. तरी पण अद्यापहि निःपक्षपाती बुद्धीनें याबाबत विचार होण्यासारखा आहे. वर दिग्दर्शित केल्याप्रमाणें ना. गोखले यांचे ज्या तीन थोर व्यक्तींशीं विशेष निकट संबंध आला, तो लक्षांत घेऊन ना. गोखल्यांच्या जीवनाचें व कार्याचें प्रायः त्या विशिष्ट दृष्टि-कोणांतून थोडक्यांत पुण्यस्मरण करावें, असें या लेखांत योजिलें आहे.

गोखल्यांचें पुण्यस्मरण हा शब्दप्रयोग मी बुद्धिपुरःसर योजिला आहे. आपलें चारित्र्य, कर्तबगारी व निःस्वार्थी समाजसेवा यांयोगें ज्यांनीं आपल्या समाजाचें व देशाचें नांव उज्ज्वल केलें अशा अलौकिक व्यक्तींपैकीं ना. गोखले हे होते. त्यांच्या कार्याची व जीवनाची स्मृति ही सत्कार्य व सद्विचार यांस निःसंशय प्रोत्साहक आहे. आपल्या ४९ वर्षांच्या अल्पायुष्यांत गोखल्यांनीं त्यांच्यापुढें असलेल्या कामाच्या डोंगराचा इतका मोठा भाग उचलला कीं, त्यांनीं केलेलें कार्य हें एका व्यक्तीकडून कसें होऊं शकलें याचा अचंबा वाटल्याशिवाय राहत नाहीं. या देशाला त्यांनीं ठेवलेल्या देणग्यांपैकीं एकच — "भारत सेवक समाज" — जरी मनांत आली, तरीहि कृतज्ञतेनें च आदरानें मन भारावून जातें.

गोखले यांच्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ, विशेषतः टिळकांच्या प्रोत्साहनानें, 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' च्या आद्य संस्थापकांबरोबर त्या संस्थेंत झाला. सुमारें २० वर्षें त्या संस्थेंत त्यांनीं निष्ठेनें व उत्साहानें अध्यापनाचें कार्य केलें. सन १८८५ पासून १९०३ सालीं विस्तृत सार्वजनिक कार्याची दीक्षा घेऊन 'भारत-सेवक-समाजा'ची प्रतिष्ठापना करीपर्यंत, त्यांनीं डे. ए. सोसायटी या संस्थेची निष्ठेनें बहुविध व बहुमोल सेवा केली. 'Farewell to Fergusson College' या आपल्या भाषणांत राष्ट्रसेवेच्या जनशिक्षणाच्या दालनांतून आपण अधिक विस्तृत क्षेत्रांत कां व कसे पडत आहोंत, याची अतिशय हृदयंगम मीमांसा गोखले यांनीं केली आहे. गोखल्यांनंतर 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' मधून पुष्कळ व्यक्ति निवृत्त झाल्या; परंतु डे. ए. सोसायटींतील सभासदांचा स्वार्थत्याग व राष्ट्र-हिताची तळमळ या गुणांचा प्रकर्ष ज्यांत शोभून दिसेल व अधिक उत्कट-तेला पोंचेल अशा जीवनाचा स्वीकार करण्याकरितां जे निवृत्त झाले अशा थोडक्या व्यक्तींपैकीं गोखले हे एक होत. अद्यापहि त्यांचें तें भाषण वाचलें म्हणजे मन आदरानें विनम्र होतें.

प्राध्यापक व आजीव सेवक म्हणून गोखल्यांनीं श्रेष्ठ दर्जाचें कार्य केलें व आपल्या मोठेपणामुळें डे. ए. सोसायटी या संस्थेस मोठेपणा प्राप्त करून दिला. 'गोखल्यांचें कॉलेज' म्हणून अनेक लहान-मोठे लोक फर्ग्युसन कॉलेजास ओळखीत व त्यावद्दल आपलेपणा दाखवीत. टिळकांच्या व गोखल्यांच्या मतभेदाचा प्रारंभ कॉलेजमध्येंच झाला. ते मतभेद दोन प्रकारचे होते. एका मतभेदाचें पर्यवसान पुढें नेमस्त व जहाल पक्षांच्या स्थापनेंत झालें. दुसरा मतभेद संस्थेंतील अंतर्गत कार्यपद्धति व तिचीं तत्त्वें यांबद्दल होता. आतां पन्नास वर्षांनंतर या वादाचें निःपक्षबुद्धीनें निरीक्षण करणें शक्य आहे. तसें तें केल्यास असें दिसतें कीं, दोन्हीहि पक्षांच्या बाजूनें कांहीं सत्य होतें. दोघांनींहि आपापले पक्ष आग्रहानें व एकेरी-पणानें मांडले. व्यक्तिशः टिळकांच्या मानानें गोखले सौम्य प्रकृतीचे होते. म्हणून झालेल्या वादंगांत कटु शब्दप्रयोग टिळकांच्याकडून अधिक झाले असावे. शिवाय टिळकांचे चाहते व त्यांचा अनुयायीवर्ग हे नेहमींच संख्येनें अधिक व उत्साही होते. दोघांच्याहि कांहीं अनुयायांकडून

अनेक वेळां सदभिरुचीचें उल्लंघन झालें. उलट, या वादांतील मुख्य तात्त्विक मुद्द्यांबाबत टिळकांची भूमिकाच अधिक योग्य वाटते डे. ए. सोसायटीच्या सभासदांनीं किमान वेतनावर संपूर्णतया आपणांस शिक्षणकार्यांत मिशनरी वृत्तीनें वाहून घेतलें पाहिजे व तसें झाल्यास सोसायटीचें शिक्षणकार्य पुष्कळ प्रकारें सुधारतां व वाढवितां येईल हें टिळकांचें म्हणणें निर्विवाद सत्य आहे महाराष्ट्रीय शिक्षणसंस्थांकडून संशोधनाचें व उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचें कार्य तितकें यशस्वी रीतीनें झालें नाहीं. याचें एक कारण, या वादांत डे. ए. सोसायटीच्या नियामकमंडळानें या वेळीं टिळकांवरील रागामुळें घेतलेला चुकीचा तात्त्विक निर्णय हें होय त्या वेळीं आपल्या देशाच्या विशिष्ट परिस्थितींत सार्वजनिक कार्यकर्ते थोडे होते. त्यामुळें मूळ शिक्षणकार्यांत भाग घेत असलेल्या टिळक, आगरकर, गोखले यांच्यासारख्या व्यक्तींनीं सार्वजनिक जीवनाच्या दुसऱ्याहि विभागांत कार्य करावें असें त्यांना स्वतःस व जनतेस वाटणें साहजिक होतें. परंतु तें करण्याचा योग्य मार्ग म्हणजे शिक्षणक्षेत्रांतून निवृत्त होऊन विस्तृत सार्वजनिक कार्याचा अंगीकार करणें हा होय. टिळक मतभेदांमुळें डे. ए. सोसायटीमधून बाहेर पडले व गोखले स्वखुषीनें बाहेर गेले. परंतु दोघांनींहि सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेण्यापूर्वी शिक्षणक्षेत्र सोडलें. त्याचें कारण स्पष्ट आहे. तें असें कीं, राजकारण व शिक्षण-संशोधन हीं दोन्हींहि पूर्ण वेळ व शक्ति देण्याचीं कामें झालीं आहेत व तीं तशींच केलीं गेलीं तरच त्यांस तेजस्विता प्राप्त होते. लहान-मोठीं पाठ्यपुस्तकें तयार करणें आणि लिहिणें व सरकारचा विशेष रोष होणार नाहीं अशा प्रकारें सार्वजनिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांत कार्य करणें या गोष्टी आगरकर, गोखले व आपटे करीत होते तोंपर्यंत त्या प्रत्यक्ष अनिष्ट नव्हत्या. परंतु तत्त्वतः त्यामुळें उच्च शिक्षणसंशोधनाच्या कार्यांत विघ्न येतें, हें नाकबूल करतां येणार नाहीं. समाजकारण व राजकारण या क्षेत्रांतील टिळकांचीं मतें व त्यांचे मार्ग बरोबर आहेत कीं नाहींत याबद्दल मतभेद असूं शकेल. कदाचित् गोखले, आगरकर यांचें राजकारण व समाजकारण टिळकांस पसंत असतें तर त्यांच्यांतील मतभेद इतका विकोपास गेलाहि नसता. परंतु टिळकांच्या डे. ए. सोसायटीच्या राजीनाम्यांत मुख्यतः

वर दर्शविलेला जो तात्त्विक मुद्दा मांडला गेला आहे त्याचें उत्तर टिळकांच्या बाजूनेंच देणें योग्य आहे, हें प्रत्यक्ष गोखल्यांनीं स्वतः राष्ट्रकार्याचा प्रारंभ करण्यापूर्वी स्वखुषीनें फर्ग्युसन कॉलेज सोडलें यावरून व गोखल्यांनंतर डे. ए. सोसायटींतील ज्या अनेक प्राध्यापकांनीं शिक्षणेतर कार्य केलें त्यांच्या शिक्षण-विषयक दुष्परिणामांवरून लक्षांत येतें. गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वानें व कार्यानें प्रभावित होऊन त्यांच्याबद्दल गाढ आदर असणाऱ्या अनेक प्राध्या-पकांनीं गोखल्यांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला. पण तो अर्धवटच होता. गोखल्यांच्या उदाहरणाचें त्यांनीं जर पूर्णपणें अनुकरण केलें असतें तर गोखल्यांविषयीं त्यांना असलेला आदर अधिक सफल झाला असता. गोखले याबाबत टिळकांशीं भांडले असले तरी प्रत्यक्ष आचरणानें त्यांनीं टिळकांचीच भूमिका पत्करली. भारतीय राजकारणांतून महाराष्ट्राचें स्थान हळूहळू कमी होण्यास जीं अनेक कारणें झालीं, त्यांपैकीं एक मुख्य कारण वरील घटनेंत आहे. त्यामुळें पहिल्या प्रतीचा स्वार्थत्याग व चारित्र्य असलेल्या कार्यकर्त्यांची गोखले-टिळक यांच्यानंतर आपल्या सार्वजनिक जीवनांत वाण पडली.

टिळक व गोखले यांच्या सार्वजनिक कार्यपद्धतीची याच ओघांत थोडक्यांत चर्चा केल्यास गोखल्यांची मनोवृत्ति व दृष्टिकोण सुलभतेनें समजून येईल. पहिली महत्त्वाची गोष्ट अशी कीं, गोखले रानडे यांचे शिष्य असले, तरी आपल्या सार्वजनिक कार्याची कक्षा त्यांनीं टिळकांसारखीच राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित केली. रानड्यांची बुद्धिमत्ता सर्वंकष व सहृदयता सर्वस्पर्शी होती. त्यामुळें रानड्यांनीं महाराष्ट्रीय व भारतीय सार्वजनिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत विशिष्ट पद्धतीनें कार्य केलें. परंतु हेंहि खरें कीं, एका अर्थी त्यामुळें रानड्यांच्या कार्यास धार व तीव्रता आली नाहीं व वैचारिक जागृति निर्माण करण्यापलीकडे त्याची प्रगति झाली नाहीं. आगरकर व गोखले यांना परस्पर व्यक्तिशः आदर असला तरी सामाजिक प्रगति अधिक महत्त्वाची कीं राजकीय प्रगति अधिक महत्त्वाची, या प्रश्नाचें आगरकरांप्रमाणें 'सामाजिक' असें उत्तर गोखले यांनीं दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, आगरकरांचीं बुद्धीवर अधिष्ठित अशीं सामाजिक व

धार्मिक विषयांवरील मतें गोखल्यांस पूर्णपणें संमत नव्हतीं व तीं त्यांना परवडलीं नसतीं, असें साधार म्हणतां येईल.

गोखले व टिळक यांना राजकीय प्रगतीकरितां ज्या भिन्न पद्धति स्वीकाराव्या लागल्या त्या आज खरोखर ऐतिहासिक स्वरूपाच्या झाल्या आहेत. इतकेंच नव्हे तर, गांधीजींची कार्यपद्धति लक्षांत घेतां टिळक व गाखले यांच्या कार्यपद्धतींतील भेदापेक्षां त्यांच्यांतील साम्यच अनेकांस अधिक महत्त्वाचें वाटूं लागलें आहे. टिळकांचे कांहीं अनुयायी असें समजतात कीं, टिळकांच्या मार्गाचीच परिणति गांधीजींच्या चळवळींत झाली. उलट असेंहि म्हटलें जातें कीं, १९१४ नंतर म्हणजे आपल्या परिणत अवस्थेंत, टिळकांनीं जहाल राजकारण सोडून प्रतियोगी सहकाराचें तत्त्व मान्य करून गोखलेप्रभृति नेमस्तांच्या राजकारणाचा स्वीकार केला. स्वतः गांधीजी आपणांस गोखल्यांचे शिष्य मानीत. पण या त्यांच्या मानण्यास वैयक्तिक आदराचें व स्नेहपूर्ण परिचयाचें दर्शन यापेक्षां अधिक महत्त्व देण्याचें कारण नाहीं असें या मंडळीचें म्हणणें. उलट, प्रस्तुत लेखकाच्या मतें, गोखले व गांधीजी यांच्या कार्यपद्धतींत महत्त्वाचें साम्य आहे. तें असें कीं, दोघांचेंहि मुख्य अधिष्ठान भावना हें आहे. महाराष्ट्रीय जीवनाची पार्श्वभूमि व रानड्यांसारख्या बुद्धिमान् नेत्याचें मार्गदर्शन यांमुळें गोखल्यांचें राजकारण भावनाधिष्ठित आहे हें चटकन् लक्षांत येत नाहीं. परंतु मूलतः तें तसें आहे. गांधीजींची १९१९ पर्यंतची राजकारणांतील भूमिका व पद्धति लक्षांत घेतली, तर त्यांसहि गोखल्यांसारखें सौम्य राजकारण करतां येत असे हें स्पष्ट दिसेल. इतकेंच नव्हे तर,त्यांच्या सत्याग्रही चळवळीचाहि इतिहास नीट अवलोकिला तर बुद्धिवादापेक्षां भावनेची कसोटी ते अनेक व्यावहारिक घटनांस लावीत, असें कबूल करावें लागेल. म्हणून गोखल्यांच्या काळांत गांधीजी त्यांजसारखेच वागते व वागले. त्याप्रमाणेंच गांधीजींच्या अमदानींत गोखले असते तर तेहि त्यांच्या अलीकडील अनुयायांच्या कल्पनेपेक्षां फार वेगळे वागते असा संभव आहे. याच्या उलट टिळक प्रकृतीनें व स्वशिक्षणानें विचारवंत व बुद्धिप्रधान होते. त्यांनीं ब्रिटिशांशीं गांधीजींच्याप्रमाणें कधींहि पूर्ण असहकार केला नसता व नामदार गोखले व गांधीजी यांप्रमाणें त्यांच्यावर त्यांनीं कधीं पूर्ण विश्वासहि

ठेवला नसता. मनुष्यस्वभाव व आन्तरराष्ट्रीय परिस्थिति यांच्या निरीक्षणानें त्यांनीं देशाच्या परिस्थितीबद्दलचीं आपलीं मतें ठाम बनविलीं होतीं व कर्मयोगाच्या विरक्तीनें, हर्षशोकांचे उद्रेक न होऊं देतां, त्यांनी आपलें राजकारण चालविलें होतें. प्रतियोगी सहकाराची भूमिका प्रेमाचीहि नाहीं व द्वेषाचीहि नाहीं व ती टिळकांची सदैव होती. टिळकांचें वैयक्तिक चारित्र्य, धैर्य व स्वार्थत्याग यांमुळें जनतेच्या मनावर त्यांचा पगडा बसला. परंतु सामान्य जनतेच्या प्रकृतीस मानवणारें भावनात्मक राजकारण (— जें नेहमींच योग्य नव्हे —) टिळक खेळले असते असें वाटत नाहीं. व म्हणून गांधीजी व टिळक यांत निवड करावयाची वेळ आली असती तर भावनाप्रिय सामान्य व्यक्तींनीं गांधीजींचीच निवड केली असती असें वाटतें. योगायोगानें ती वेळ आलीच नाहीं. कारण गांधीजींच्या अमदानीच्या प्रारंभींच टिळक स्वर्गवासी झाले. ब्रिटिश लोकांच्या सौजन्यावर विश्वास ठेवून राजकारण जितकें व जसें लढवितां येणें शक्य होतें तितकें गोखले यांनीं लढविलें. तो विश्वास उडाल्यावर तें गांधींनीं पुढें चालविलें. रानड्यांच्या व टिळकांच्या राजकारणांतील कार्यपद्धतीपेक्षां गोखले व गांधी यांची कार्यपद्धति वेगळी होती. रानड्यांपेक्षां गोखले व टिळकांपेक्षां गांधी एका विवक्षित अर्थीं प्रभावी ठरले.

गोखल्यांच्या निष्कपट भावनात्मकतेचें एक महत्त्वाचें उदाहरण म्हणजे त्यांचें सुप्रसिद्ध माफी-प्रकरण हें होय. सार्वजनिक जीवनांतील मोठमोठ्या चुकांची सार्वजनिक कबुली व त्या चुकांबद्दल प्रायश्चित्त — या गोष्टींस, पुढें गांधीजींच्या अमदानींत त्यांचें विशिष्ट व्यक्तित्व व वेगळी राजकीय परिस्थिति यांमुळें, प्रभावी राजकीय घटनांचें स्वरूप आलें. गोखले यांनीं माफी मागितली. त्यामुळें त्यांवर त्या वेळीं केवढा गहजब झाला ! आपल्या भावनाधिष्ठित जीवनाच्या परिमाणानें जग मोजण्याचें गांधींचें कौशल्य व आत्यंतिक निष्ठा गोखल्यांच्या जवळ नसल्यानें, अगदीं थोडे विचारी लोक सोडले तर इतर सर्वांनीं गोखल्यांस या प्रकरणीं थोडा-बहुत दोषच दिला व खुद्द गोखल्यांसहि खिन्नता आली. अशा प्रसंगीं टिळकांनीं माफी मागितली नसती, रानड्यांनीं आपल्यावर असा प्रसंगच येऊं दिला नसता, गांधींनीं माफी मागण्यानेंच आपला लौकिक वाढविला

असता ! टिळक व गोखले यांच्या दरम्यान जे वाद झाले व ज्यांतील शेवटला तर गोखल्यांच्या निधनाच्या आधीं थोडे दिवस झाला, त्यांतूनहि एका निराळ्या अर्थीं गोखल्यांची भावनावशता दृष्टोत्पत्तीस येते. मतभेद असणारे दोन पक्ष-प्रमुख एकमेकांबद्दल जे शब्दप्रयोग करतात व सार्वजनिक रीत्या पक्षाच्या यशाकरितां जे डावपेंच परस्परांविरुद्ध लढवितात, ते शब्दशः घ्यावयाचे नसतात. अशा डावपेंचांतील बरेवाईटपणानें आपलें मन दुखूं देणें व दुसऱ्याबद्दल मत कलुषित होऊं देणें, हें बुद्धिनिष्ठ राजकीय कार्यकर्ता करणार नाहीं. गोखले बुद्धिमान् होते व निष्कपट होते. परंतु स्वभावानें बुद्धिनिष्ठ व वृत्तीनें विचारशील नसल्यानें कांहीं प्रसंगीं त्यांस निष्कारण त्रास होई. गांधीजींच्या जीवनांतहि असे कांहीं परंतु थोडे प्रसंग आहेत. एक लक्षांत येण्यासारखा प्रसंग श्रीमती कस्तुरबा यांच्या निधनाच्या वेळचा. त्या वेळीं गांधीजींनीं केलेल्या तक्रारी भावनावश पुढाऱ्याला शोभतात; परंतु देशसेवेचें कंकण बांधून सर्व सुखत्याग करणाऱ्या त्यांच्या-सारख्या फकिराला नव्हे. परंतु भावनात्मकता हाच एका अर्थीं गांधींच्याच नव्हे तर गोखल्यांच्याहि निष्ठेचा, असामान्य कर्तबगारीचा व यशाचा पाया होय. त्यामुळेंच देशसेवेच्या भावनेनें परिपूर्ण असें गोखल्यांचें व्यक्तिमत्त्व प्रभावी व त्या वेळचें देशाचें परिस्थितींत एका विशिष्ट प्रकारें परंतु अतुल रीतीनें कार्यक्षम झालें.

गांधीजी "भारत-सेवक-समाजा" चे सभासद होऊं इच्छीत होते. गोखल्यांचीहि तशी इच्छा होती. परंतु अधिक विचाराअंतीं 'समाजा'च्या सभासदांनीं त्याबाबत नाखुषी दर्शविली असें ऐकण्यांत येतें. ही घटना गोखले व गांधी यांचे संबंध व साधर्म्य यांवर प्रकाश टाकणारी आहे. टिळक व गोखले या दोघांनीं प्रथमपासून गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचें व त्यांच्या निष्ठेचें बळ ओळखलें होतें. गांधीजींचा टिळकांपेक्षां गोखल्यांशीं अधिक संबंध आला. या वेळीं एका अर्थीं, "नेहमींच सौम्य उपायावर विश्वास असणारी, लोकसेवेचें व्रत अंगीकारिलेली, सौजन्ययुक्त पण करारी अशी ही आपणांसारखीच एक व्यक्ति आहे. आणि म्हणून ज्या ध्येयानें प्रेरित होऊन आपण देशकल्याणाच्या ऐहिक ध्येयाच्या पूर्तीकरितां 'भारत-सेवक-समाज' ही मिशनरी संस्था स्थापिली, तिचा सदस्य होण्यास ही व्यक्ति विशेष योग्य

आहे " असें गांधीजींविषयीं गोखल्यांस वाटलें असावें. परंतु रानड यांच्या छत्राखालीं वाढलेल्या गोखल्यांच्या देशसेवेची पद्धति मूळ भावनानिष्ठ असली तरी शिक्षणानें व उदाहरणानें ती व्यवहारी झाली होती. उलट, गांधीजीच्या वृत्तींत त्या काळींहि असहकाराचे स्फुलिंग होतेच व अन्यायाशीं सारखा लढा करण्याची टिळकांची झुंजारवृत्तीहि होती. गांधींचें गोखल्यांशीं साधर्म्य होतें हें खरें असलें, तरी गोखल्यांचें अनुयायित्व करण्याइतकें त्यांच्याशीं तद्रूपत्व नव्हतें. ' भारत-सेवक-समाजा ' सारख्या फकिरी बाण्याच्या लोकसेवेच्या सत्याग्रह-आश्रमादि संस्था पुढें गांधीजींनीं काढल्या व चालविल्या. तोच त्यांच्या व ' भारत-सेवक-समाजा ' मधील दुवा होता. प्रत्यक्ष गांधीजी ' भारत-सेवक-समाजा ' चे सदस्य झाले असते तर त्या समाजाचें स्वरूप इतकें बदललें असतें कीं, कदाचित् नांवाशिवाय त्यांत कांहीं शिल्लक राहिलें नसतें !

आपल्या आयुष्यांतील सुमारें २० वर्षें आपल्या कर्तबगारीनें एका शिक्षणसंस्थेस उज्ज्वल केल्यावर नंतरच्या १०–१२ वर्षांत गोखल्यांनीं दोन जन्मांस पुरून उरेल इतकी कामगिरी केली ! त्यांच्या प्रामाणिक भावनेचा अल्पांशहि आपण हिंदी लोकांनीं अंगीं बाणविला तर आपणांपुढें असलेले बिकट प्रश्न सुटण्याच्या मार्गावर येतील. देशसेवा करायची तर देशाच्या गरजा काय आहेत या नीट समजून घेऊन, निरलसपणें त्यांच्या निवारणाची योजना आंखणें व त्या अंमलांत आणणें आवश्यक आहे. स्वराज्याचे अगदीं थोडे हक्क हिंदी जनतेकडे असतांना अभ्यास, सहकार्य, सामोपचारवृत्ति, विचारविनिमय यांच्यायोगें अधिकांत अधिक कार्य गोखल्यांनीं केलें. आज आपण म्हणूं तसें घडूं शकण्याचे दिवस आले आहेत. म्हणूनच गोखल्यांसारखे खरे देशहिततत्पर कार्यकर्ते मागल्या काळापेक्षांहि निकडीनें आज हवे आहेत

आज गोखले असते तर त्यांनीं काय केलें असतें, या वर सुचविलेल्या प्रश्नाचा विचार करणें उद्बोधक होईल. अगदीं लहान मोहरीपासून सुरुवात करावयाची झाल्यास, गोखले आज जर असते तर पुण्यांतील ' सर्व्हंट ऑफ इंडिया ' व ' ज्ञानप्रकाश ' हीं प्रागतिक वृत्तपत्रें बंद झाली नसतीं. ' लिबरल फेडरेशन ' च्या वार्षिक सभा स्थगित झाल्या नसत्या व स्वतंत्र भारतांतील

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकींत प्रागतिक पक्ष देशांत नाहींच असें वाटण्यासारखी स्थिति आली नसती. देशाच्या राजकीय पक्षांतून प्रागतिकांचें स्थान नाहींसें होण्यास इतर कारणें असलीं तरी त्यांतील मुख्य कारण त्या पक्षानें गोखल्यांच्यानंतर स्वार्थत्याग व फकिरी वृत्ति यांची जोपासना केली नाहीं, हेंच होय. गोखल्यांवरील मृत्युलेखांत 'देशांतील दैन्यावस्थेचें अचूक निदान करून निरलसपणें व निरपेक्षतेनें त्यावर सतत उपाय करणारा पण सौम्य उपायावर विश्वास असणारा भिषग्वर्य' असें टिळकांनीं गोखल्यांचें वर्णन केलें होतें. गोखल्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांनीं लहानसहान बाबतींतहि गोखल्यांची उद्योगनिष्ठा व चिकाटी दाखविली नाहीं, म्हणून देशास अत्यंत जरूर असलेलें हें 'सौम्य वैद्यक' नाहींसें होण्याच्या पंथास आलें आहे. फावल्या वेळांत, नोकरी-धंदा व कौटुंबिक स्वास्थ्य यांस धोका न लागेल अशा प्रकारें धीरोदात्तपणाचा आव आणून देशापुढील प्रश्नावर मतप्रदर्शन करणें एवढ्यानें 'प्रागतिक' म्हणून आपलें कर्तव्य संपलें, अशी समजूत फैलावली. ऐहिक ध्येयाकरितां मिशनरी वृत्तीनें वाहून घेतलेल्या संस्था काढण्याचा गोखल्यांचा मनोदय सफल झाला नाहीं. काँग्रेसमधील उजव्या पक्षाच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांनीं किंवा त्यांच्या सहाकार्यानें हाताच्या बोटांवर मोजतां येण्याजोग्या खऱ्या प्रागतिकांनीं फार जोमानें प्रयत्न केला तर कदाचित् प्रागतिक मतप्रणाली पुनः जीव धरील; पण तसा आज फारसा संभव दिसत नाहीं.

गोखल्यांचा व त्याहीपेक्षां रानड्यांचा प्रागतिक दृष्टिकोण हा या देशास आज व सदैव लाभकारक होणार आहे. विधायक वृत्ति, संयम, विवेकशीलता हीं खऱ्या प्रागतिक वृत्तीचीं मुख्य लक्षणें होत. महाराष्ट्रीय नेत्यांमध्यें न्या. रानडे यांच्या जीवनांत अशा प्रागतिक वृत्तीची सर्वोत्कृष्ट प्रचीति येते; परंतु तिच्या प्रत्यक्ष फैलावाकरितां व्यावहारिक संघटना गोखल्यांनीं निर्माण केल्या व प्रत्यक्ष कार्य केलें. गोखल्यांच्या ह्या संघटना गोखल्यांच्या धडाडीनें चालविल्या गेल्या असत्या तर स्वराज्यप्राप्तीनंतर आपलीं जीं अनेक व्यंगें दृष्टोत्पत्तीस आलीं तीं आपण बहुतांशीं दूर करूं शकलों असतों.

गोखले व टिळक यांचे मतभेद प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांस एकमेकांबद्दल असलेला आदर तितकासा प्रसिद्ध नाहीं. परंतु टिळकांनीं गोखल्यांवरील मृत्युलेखांत त्यांच्या थोरपणाची जी मीमांसा फार मार्मिकपणें केली आहे ती आजहि समर्पक आहे असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. त्यांतील एका अवतरणानें हें पुण्यस्मरण पुरें करतों—"डामडौलास न भुलतां आपण एकटेच निर्धन जन्मलों, तसें एकटेच जाणार हें लक्षांत आणून, ऐहिक सुखाचा त्याग करणें आणि केवळ देशहितकारक धर्म आचरणें यांतच खरा थोरपणा आहे आणि हा धर्म ज्यानें कडक रीतीनें पाळला तो दुसरें कांहीं करो वा न करो, त्यानें योजिलेले उपाय सौम्य असोत वा कडक असोत, केवळ वरील धर्म पाळल्यामुळेंच तो देशकर्त्या पुरुषांच्या वर्गांत पडून सद्गति पावतो."

कालचा, आजचा व उद्यांचा महाराष्ट्र*

गेल्या सुमारें ७५ वर्षांतील महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाकडे पाहिल्यास जे विचार मनांत येतात त्यांवरून आमची अधिक प्रगति होण्याच्या दृष्टीनें जे उपाय सुचतात तें थोडक्यांत सांगणें हा या लेखाचा उद्देश आहे. वर्तमानपत्रांच्या व तत्सदृश वाङ्मयाच्या वाचकांस जी माहिती सहज उपलब्ध आहे तितकी वाचकांस अवगत आहे असें गृहीत धरून मी त्याची चर्चा करणार आहें. मी वृत्तीनें (दोनही अर्थी) शिक्षक व त्यांतून तत्त्वज्ञानाचा शिक्षक आहें. सर्व प्रांतांमधून मिळालेल्या अनुभवांचा समन्वय करून त्याचा अर्थ काय होतो हें पाहणें, हा तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाचा दृष्टिकोण होय. मी तसा अभ्यासक असल्यामुळें या विषयाच्या चर्चेकरितां तीच दृष्टि स्वीकारणार आहें. मी इतिहास-संशोधक नसलों तरी इतिहासाच्या—अर्वाचीन व प्राचीन—अभ्यासाचें महत्त्व मला फार वाटतें. मानवी प्रगतीला सुधारणा व सातत्य दोनही लागतात. आपण कोण व काय आहों, तसे कसे झालों, कोठून आलों, याचा निःपक्षपातबुद्धीनें परंतु आपलेपणानें जे विचार करतात त्यांसच पुढील योग्य मार्ग कोणता हें कळतें व त्याचें ते आकलन करूं शकतात. म्हणून हा विषय आपणां सर्व महाराष्ट्रीयांस जिव्हाळ्याचा आहे. टिळक व केळकर या दोन श्रेष्ठ महाराष्ट्रीयांच्या सहवासानें पुनीत झालेल्या या स्थळीं याची चर्चा करणें मला विशेष योग्य वाटलें. आपणांसहि तसें वाटेल अशी आशा आहे.

माझ्या विवेचनांत महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनापैकीं विशेषतः शिक्षण, राजकारण, साहित्य, समाज व धर्मकारण यांचा उल्लेख येईल. कारण ती माहिती अधिक उपलब्ध आहे. व त्याबाबत जे निर्णय आपण घेऊं शकूं ते प्रायः आपले इतर जीवनाबद्दल खरे असतील असें मानण्यास जागा

---

* गायकवाडवाड्यांतील गणपत्युत्सवांत १९५० च्या सुमारास देण्याकरितां तयार केलेल्या भाषणाचा सारांश.

आहे. हा विषय माझ्या मतें महत्त्वाचा, मनोरंजक, परंतु मोठा आहे. परंतु त्यांतील कांहीं सामान्य आणि महत्त्वाचे विचार मीं येथें मांडणार आहें.

भारतीय 'परार्थ' अनुमान-पद्धति अनुसरून प्रथम मी याबाबत आपली 'प्रतिज्ञा' (Assertion) पुढें मांडतों. व मग 'हेतु' व 'उदाहरण' देतों. माझी भूमिका अशी. पुणें व मुंबई या शहरांतील व इतर ठिकाणचे 'कालचे नेते' (जें विधान आपण नेत्याबद्दल करूं शकतों तें योग्य फरकानें अनुयायांबद्दलहि खरें असतें) 'लोकहितवादी, रानडे, चिपळूणकर, गुंजीकर, डॉ. भाऊदाजी, मंडलिक, भांडारकर, तेलंग, दादोबा पांडुरंग, टिळक, आगरकर, गोखले, अण्णासाहेब कर्वे, तात्यासाहेब केळकर' वा. म. जोशी, इत्यादि, यांचे व्यक्तिगत भेद व मतभेद, त्यांचें कर्तबगारीचें क्षेत्र, व त्याचा विस्तार कांहीं असलें तरी त्यांचीं कांहीं महत्त्वाचीं सादृश्यें होतीं. तीं म्हणजे आपल्या विषयाचा किंवा जीवनक्रमाचा सखोल, तात्त्विक, निष्ठापूर्वक, स्वार्थत्यागपूर्वक अभ्यास व आचरण करणें हीं होत. याची दुसरी बाजू अशी कीं, न्या. रानडे सोडले तर इतर सर्वांच्या कार्यांत व व्यक्तिमत्त्वांत 'एकेरीपणा' होता. व हे नेते असल्यामुळें आमचें सामाजिक व बौद्धिक जीवन द्विधा झालें.

त्यानंतरच्या म्हणजे आजच्या काळाचें वैशिष्ट्य असें कीं, आमची कार्यनिष्ठा, स्वतंत्रबुद्धि, स्वार्थत्यागाची तयारी, मंदावली. आम्हीं अधिकांत अधिक प्रामाणिक किंवा ढोंगी अनुयायी नाहीं तर बहुधा नुसते टीकाकार व निंदक झालों. आमचें कार्यक्षेत्र कांहींसें रुंदावलें; पण फार उथळ झालें. आमच्या जीवनमूल्यांत तत्त्वशून्यता म्हणून सरभेसळ झाली. एकीकडे मागील पिढींतील मतभेद व द्विधात्त्व खालचे पातळीवर सीमेला गेलें. आमचें बहुतेक सामर्थ्य त्यांतच खर्च होऊं लागलें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमची खरी प्रकृति काय, याचा विसर पडून संपत्ति व सत्ता यांचा अयशस्वी पाठलाग आम्हीं करूं लागलों आणि आम्हांस न्यूनगंड आला.

उद्यांच्या महाराष्ट्रांत आमची प्रगति व्हावी अशी इच्छा असेल तर, गेल्या पिढीचा एकेरीपणाचा दोष सोडून इतर सर्व बाबतींत त्यांचें अनुकरण करावयास हवें. महाराष्ट्राचें प्रकृतिवैशिष्ट्य त्याच्या बुद्धिप्रधानतेंत

आहे, हें विसरण्याचा प्रघात पडत आहे, तो अतिशय भयदायक आहे. अद्यापहि आम्ही आमचा स्वभाव ओळखून कार्यनिष्ठा दाखविली तर 'संयुक्त महाराष्ट्र राज्य' झालें नाहीं तरी रानडे, टिळक, गोखले यांच्या वेळेच्या महाराष्ट्राप्रमाणें आम्हीं महाराष्ट्रीय लोक कांहीं प्रमाणांत हिंदुस्थानाचे नेतृत्त्व करूं व स्वतःच्या राष्ट्राची खरी सेवा करूं शकूं. इतकेंच नव्हे, तर असें केल्यास आपण कालच्या नेत्यांपेक्षां सरस, प्रगतिपर व श्रेष्ठ ठरून त्यांचे दोष टाळूं शकूं.

आमच्या शिक्षण-संस्थांचा मला प्रत्यक्ष कांहींसा अनुभव आहे. त्या वरून मी निर्विवाद असें म्हणूं शकतों कीं, जो ध्येयवाद, जी निष्ठा, जो उद्योग व जो प्रामाणिकपणा या संस्थांतील आद्य अशा डे. ए. सोसायटीच्या संस्थापकांत होता तो आज प्रायः लुप्त झाला आहे. त्याचें कारण एकंदर आमच्या समाजांतील ध्येयवादच कमी झाला आहे. शिक्षक, राजकारणी व्यक्ति व इतर सर्व मंडळी प्रायः आपापल्या क्षेत्रांत समाजाची सद्यःस्थिति प्रतिबिंबित करतात. आमचे शिक्षक ध्येयशून्य आहेत हें जर खरें असेल, तर तितकेच आमचे वर्तमानपत्रकर्ते, आमचे राजकारणी नेते, आमचे धार्मिक व सामाजिक पुढारी, आमचे वकील, डॉक्टर, इंजिनिअर, सर्वच तसे ध्येयशून्य झाले आहेत. संस्कृत व तत्त्वज्ञान या दोन आपणा सर्वांच्या व भारतीयांच्या जिव्हाळ्याचे, व ज्यांत आपणांस विशेष गति आहे व असावी, अशा या दोन अत्यंत महत्त्वाच्या विषयांचा इतका उथळ, इतका पुस्तकी, इतका निर्जीव, इतका परप्रत्ययनेय असा अभ्यास आम्ही हल्लीं करतों कीं, या विषयांच्या खऱ्या अभ्यासानें या राष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल होण्यास फार मदत होईल, अशी वस्तुस्थिति असून तें आज खरें वाटत नाहीं. अलीकडला अभ्यास व अध्यापन पाहिलें तर मी काय म्हणतों, हें ध्यानांत येईल. या विषयांबद्दल किंवा त्यांतील प्राचीन प्रगतीबद्दल अभिमान आजचे विद्वान् आस्थापूर्वक दाखवीत नाहींत ही माझी तक्रार नाहीं. ते दिवस गेले. परंतु आपण कसला अभिमान बाळगतों आहों, हें समजण्याचा त्रास न घेतां अभिमान बाळगायचा व त्यामुळें पाश्चात्य ज्ञान व आजचें जग यांकडे दुर्लक्ष करायचें, ही पद्धत अत्यंत अनिष्ट आहे व तत्त्वज्ञान व संस्कृत

या दोनही विषयांबद्दल अज्ञान प्रगट करणारी अशी आहे. आणि याला खरें कारण असें कीं, या विषयांचें ज्ञान आम्हांस व्हावें, अशी उत्कट इच्छाच बहुतेकांस नसते. परीक्षेंतील यश, व्यावहारिक बडेजाव, व कदाचित् एक प्रकारचा बौद्धिक किंवा नैतिक विरंगुळा, किंवा Escape पळवाट या हेतुकरितांच या विषयांचा अभ्यास होतो, हें लक्षांत घेतल्यास भांडारकरांच्या वेळेपेक्षां अनेक सुखसोयी व साधनें उपलब्ध असतां संस्कृताच्या अभ्यासांत प्रगति कां झाली नाहीं, किंवा टिळकांनीं आपला तो उद्योग नसतांना ज्या दर्जाचा ग्रंथ नीति आणि अध्यात्म शास्त्रावर लिहिला त्या दर्जाचाही ग्रंथ मध्यंतरीच्या काळांत कां लिहिला गेला नाहीं, याचें आश्चर्य वाटत नाहीं. वस्तुतः पाश्चात्य भाषापंडित किंवा तत्त्वज्ञानी यांच्या मानानें या दोघांचेही ग्रंथ प्रथम श्रेणींत बसूं शकत नाहींत; परंतु संस्कृतचे प्राध्यापक व तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक यांचें जें कांहीं आजचें लिखाण उपलब्ध आहे त्यांत भांडारकर व टिळक यांच्या दर्जाचें लिखाण दिसत नाहीं. या व इतर अनेक बाबींत काळोखानंतरची पहाट जवळ आली आहे, अशी मला कांहींशी आशा आहे. तो दिवस उजाडेल तेव्हां आजचे शिक्षक, संशोधक व विचारवंत मागच्यांच्या पुढेंच पाऊल टाकतील. परंतु तें होण्याकरितांच आजच्या काळोखाचें अधिक ज्ञान झालें पाहिजे.

'निरुपद्रवी' शिक्षक सोडून 'उपद्रवी' चळवळी मंडळी यांकडे क्षणभर दृष्टि टाकल्यासही तोच अनुभव येतो. राजकारणांत, समाजकारणांत, धर्मकारणांत आजकाल कार्य करणाऱ्या मंडळींचे हेतु, निष्ठा व उद्योग यांचा विचार केल्यास आपण इतके मागें कां पडलों तें आपल्या लक्षांत येईल. टिळकांनीं आगरकर व गोखले यांच्या मृत्युलेखांत जे उद्‌गार त्या दोघांविषयींहि काढले आहेत ते लक्षांत आणावे व मग आजूबाजूला पाहावें; म्हणजे आम्हीं मागें पुढें कां होतों व आज मागें कां आहों, हें लक्षांत येईल. आम्हीं कधींच धनाढ्य नव्हतों; परंतु ज्ञानानें, तपस्येनें, कर्तबगारीनें प्रभावी होतों व म्हणून धनाचीही वाण पडत नसे. आज तसें नाहीं, हाच फरक आहे. चारपांच मुख्य उदाहरणें घ्यायचीं तर रानडे, चिपळूणकर, आगरकर, टिळक व गोखले यांचीं देतां येतील. त्यांचे लेख, त्यांचीं भाषणें, त्यांचा अविरत उद्योग व त्यांचा स्वार्थत्याग यांशीं तुलना करतां येईल असा एकही नेता

गेल्या तीस वर्षांत तरी आपणांत झाला नाहीं. कोठल्याहि पक्षातर्फे व कसल्याही कार्यांत ते काम करीत असले तरी लोकहितबुद्धि हा एकच एक हेतु व स्वार्थत्यागपूर्वक निष्ठा व उद्योग हीं त्यांच्या जीवनांत दिसत. त्यांतील दोन व्यक्ति–रानडे व टिळक यांना असामान्य बुद्धिमत्तेची देणगी होती. परंतु त्यांचा सर्वांचा खरा मोठेपणा या व इतर देणगीचा परहितार्थ प्रामाणिकपणें उपयोग करण्यांत होता. चिपळूणकर, टिळक, आगरकर, गोखले, कोणीही विशेष संपन्न नव्हते. स्वपरजनांकडून व परिस्थितीनें अनेक अडचणी व संकटें त्यांचेवर आलीं, तरी अल्पवयांत मृत्यु येण्याच्या पूर्वी चिपळूणकर, आगरकर, गोखले यांनीं व टिळक आणि रानडे यांनीं आपल्या त्या मानानें असलेल्या दीर्घ आयुष्यांत केलेलें रचनात्मक कार्य पाहून अचंबा वाटतो. एकाच शब्दांत सांगायचें तर त्यांनीं सुरू केलेलें कार्य पुढें चालू ठेवण्याइतपत निष्ठा, उद्योग, धोरण, स्वार्थत्याग त्यांच्या अनुयायांत नसल्यामुळें त्यांच्यापैकीं कोणाच्याच कार्यास नंतरच्या पिढींत तजेला आला नाहीं. गांधीजींनीं सुरू केलेल्या राजकीय प्रणालीच्या प्रभावानें, सामर्थ्यानें व विलक्षणपणानें येथील मंडळींची बुद्धि दिपली व एक तर नुसतें अनुयायित्व, किंवा नुसती निंदा यापेक्षां वेगळी म्हणजे खरे स्वतंत्र बुद्धीचे सहकारी, अशी भूमिका महाराष्ट्र-नेत्यांकडे आली नाहीं. याचें कारण गांधीजींचें असामान्य व्यक्तिमत्त्व हें तर खरेंच; परंतु आमचें अत्यंत सामान्य व्यक्तिमत्त्व व जाज्वल्य ध्येयनिष्ठेची उणीव हेंहि एक कारण झालें. टिळक व गोखले गांधींच्या अमदानींत जिवंत असते, तर ते त्यांचे अनुयायी झाले नसते हें जितकें खरें तितकेंच त्यांचे निव्वळ निंदकही झाले नसते हेंही निर्विवाद खरें आहे.

आपल्या राजकीय कार्याला वाहून घेण्याकरितां टिळकांनीं इतर सर्व गोष्टींकडे कशी पाठ फिरविली व गोखल्यांनीं डे. ए. सोसायटी सोडून सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी कां काढली, याचा विचार केल्यास अंगीकृत कार्याकरितां सर्वत्याग करण्याची तयारी हेंच याचें कारण आहे, हें स्पष्ट होतें. त्यांनीं ही निष्ठा इतकी व अशा प्रकारें दाखविली कीं, त्यामुळें त्यांच्य- कार्यपद्धतींत कांहीं दोष आले. ते कोणते ते आपण पाहूंच; परंतु तो एकेरी

पणा व एकांगीपणा निष्ठेमुळें आलेला आहे, हें विसरतां येत नाहीं. आपण Faddist कल्लींना हंसतों. पण एका अर्थीं या जगांतील सर्व प्रगति Faddist नींच घडवून आणली आहे व सामान्यत: Fad चा पर्याय ढोंग किंवा निष्क्रियता असल्यामुळें Fad चा एकेरीपणा पत्करला; पण त्याचा पर्याय जी निष्क्रियता ती नको व ती अधिक अनिष्ट असें म्हणावें लागतें.

म्हणून महाराष्ट्रीय नेते संपत्ति व प्रचार यांच्या साधनांत इतर पुढाऱ्यांच्या मानानें आजच नव्हे तर पूर्वीहि मागें होते; तरीही मुंबई व पुणें येथील नेते इतके प्रभावी होते कीं, सर्व हिंदुस्थानच्या चळवळींचीं सूत्रें प्राय: ते हालवीत. याचें कारण त्यांची निष्ठा, सततोद्योग, स्वार्थत्याग व बुद्धिमत्ता हें होय. संपत्तीचा अभाव त्यांच्या आड येऊं शकल नाहीं. इतकेंच नव्हे तर एका अर्थीं त्यांना त्याचें सामर्थ्य होतें. रानडे, टिळक, आगरकर, गोखले, केळकर, अण्णासाहेब कर्वे हीं माणसें इतकीं मोठीं होण्याचें एक कारण धनार्जन व तें राखण्याचे व्याप, यांत त्यांचा कमींत कमी वेळ जाई. खुंटीवरचें अंगरखा-पागोटें घालून व हातांत सोटा घेऊन टिळक कधींही पांच मिनिटांत बाहेर पडून चालत जाऊन कामें करीत. त्यामुळें इतर बडेजावी पुढाऱ्यांच्या कामांत जो विलंब, जो कृत्रिमपणा येई तो—त्यांच्या व त्यांच्या सारख्या इतर महाराष्ट्रीय नेत्यांच्या कार्यांत येत नसे व म्हणून ते प्रभावी ठरत. आम्हीं गरीब आहों, म्हणून आम्हांला हें करतां येत नाहीं, तें करतां येत नाहीं, असें टिळक व गोखले यांना कधींच वाटलें नाहीं. कारण प्रत्यक्ष कार्याला जें द्रव्य लागतें तें खऱ्या कार्यकर्त्यांस कधींही कमी पडत नाहीं. अद्यापही जीं कांहीं माणसें शिक्षण-क्षेत्रांत किंवा सामाजिक-क्षेत्रांत निष्ठेनें कार्य करीत आहेत त्यांस द्रव्य मिळूं शकतें असा अनुभव आहे. 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या तत्त्वावर खरोखरच विश्वास असेल तर 'माझ्या भक्ताचा योगक्षेम मी वाहीन,' हें गीतेंतील वचन सत्य आहे, असाच अनुभव येतो. पुण्याच्या शिक्षण संस्थांचे दोष व उणीवा माहीत असून व कबूल करूनही मी अनुभवानें असें सांगतों कीं, एकंदरीनें तुलना केल्यास या प्रांतांत किंवा इतरत्र हिंदुस्थानांत कोठेंही असलेल्या संस्थांच्या प्रथमश्रेणींत आम्हीं निःसंशय येऊं. त्या सर्वांच्या मानानें आमचें द्रव्यबल पुष्कळच कमी आहे, हें प्रसिद्धच आहे. नवें होणारें पुणें विद्यापीठ सधन होवोच; पण त्याहीपेक्षां

गेल्या तीस वर्षांत तरी आपणांत झाला नाहीं. कोठल्याहि पक्षातर्फे व कसल्याही कार्यांत ते काम करीत असले तरी लोकहितबुद्धि हा एकच एक हेतु व स्वार्थत्यागपूर्वक निष्ठा व उद्योग हीं त्यांच्या जीवनांत दिसत. त्यांतील दोन व्यक्ति–रानडे व टिळक यांना असामान्य बुद्धिमत्तेची देणगी होती. परंतु त्यांचा सर्वांचा खरा मोठेपणा या व इतर देणगीचा परहितार्थ प्रामाणिकपणें उपयोग करण्यांत होता. चिपळूणकर, टिळक, आगरकर, गोखले, कोणीही विशेष संपन्न नव्हते. स्वपरजनांकडून व परिस्थितीनें अनेक अडचणी व संकटें त्यांचेवर आलीं, तरी अल्पवयांत मृत्यु येण्याच्या पूर्वी चिपळूणकर, आगरकर, गोखले यांनीं व टिळक आणि रानडे यांनीं आपल्या त्या मानानें असलेल्या दीर्घ आयुष्यांत केलेलें रचनात्मक कार्य पाहून अचंबा वाटतो. एकाच शब्दांत सांगायचें तर त्यांनीं सुरू केलेलें कार्य पुढें चालू ठेवण्याइतपत निष्ठा, उद्योग, धोरण, स्वार्थत्याग त्यांच्या अनुयायांत नसल्यामुळें त्यांच्यापैकीं कोणाच्याच कार्यास नंतरच्या पिढींत तजेला आला नाहीं. गांधीजींनीं सुरू केलेल्या राजकीय प्रणालीच्या प्रभावानें, सामर्थ्यानें व विलक्षणपणानें येथील मंडळींची बुद्धि दिपली व एक तर नुसतें अनुयायित्व, किंवा नुसती निंदा यापेक्षां वेगळी म्हणजे खरे स्वतंत्र बुद्धीचे सहकारी, अशी भूमिका महाराष्ट्र-नेत्यांकडे आली नाहीं. याचें कारण गांधीजींचें असामान्य व्यक्तिमत्त्व हें तर खरेंच; परंतु आमचें अत्यंत सामान्य व्यक्तिमत्त्व व जाज्वल्य ध्येयनिष्ठेची उणीव हेंहि एक कारण झालें. टिळक व गोखले गांधींच्या अमदानींत जिवंत असते, तर ते त्यांचे अनुयायी झाले नसते हें जितकें खरें तितकेंच त्यांचे निव्वळ निंदकही झाले नसते हेंही निर्विवाद खरें आहे.

आपल्या राजकीय कार्याला वाहून घेण्याकरितां टिळकांनीं इतर सर्व गोष्टींकडे कशी पाठ फिरविली व गोखल्यांनीं डे. ए. सोसायटी सोडून सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी कां काढली, याचा विचार केल्यास अंगीकृत कार्याकरितां सर्वत्याग करण्याची तयारी हेंच याचें कारण आहे, हें स्पष्ट होतें. त्यांनीं ही निष्ठा इतकी व अशा प्रकारें दाखविली कीं, त्यामुळें त्यांच्य. कार्यपद्धतींत कांहीं दोष आले. ते कोणते ते आपण पाहूंच; परंतु तो एकेरी

पणा व एकांगीपणा निष्ठेमुळें आलेला आहे, हें विसरतां येत नाहीं. आपण Faddist कल्लींना हंसतों. पण एका अर्थीं या जगांतील सर्व प्रगति Faddist नींच घडवून आणली आहे व सामान्यत: Fad चा पर्याय ढोंग किंवा निष्क्रियता असल्यामुळें Fad चा एकेरीपणा पत्करला; पण त्याचा पर्याय जी निष्क्रियता ती नको व ती अधिक अनिष्ट असें म्हणावें लागतें.

म्हणून महाराष्ट्रीय नेते संपत्ति व प्रचार यांच्या साधनांत इतर पुढाऱ्यांच्या मानानें आजच नव्हे तर पूर्वीहि मागें होते; तरीही मुंबई व पुणें येथील नेते इतके प्रभावी होते कीं, सर्व हिंदुस्थानच्या चळवळींचीं सूत्रें प्राय: ते हालवीत. याचें कारण त्यांची निष्ठा, सततोद्योग, स्वार्थत्याग व बुद्धिमत्ता हें होय. संपत्तीचा अभाव त्यांच्या आड येऊं शकल नाहीं. इतकेंच नव्हे तर एका अर्थीं त्यांना त्याचें सामर्थ्य होतें. रानडे, टिळक, आगरकर, गोखले, केळकर, अण्णासाहेब कर्वे हीं माणसें इतकीं मोठीं होण्याचें एक कारण धनार्जन व तें राखण्याचे व्याप, यांत त्यांचा कमींत कमी वेळ जाई. खुंटीवरचें अंगरखा-पागोटें घालून व हातांत सोटा घेऊन टिळक कधींही पांच मिनिटांत बाहेर पडून चालत जाऊन कामें करीत. त्यामुळें इतर बडेजावी पुढाऱ्यांच्या कामांत जो विलंब, जो कृत्रिमपणा येई तो—त्यांच्या व त्यांच्या सारख्या इतर महाराष्ट्रीय नेत्यांच्या कार्यांत येत नसे व म्हणून ते प्रभावी ठरत. आम्हीं गरीब आहों, म्हणून आम्हांला हें करतां येत नाहीं, तें करतां येत नाहीं, असें टिळक व गोखले यांना कधींच वाटलें नाहीं. कारण प्रत्यक्ष कार्याला जें द्रव्य लागतें तें खऱ्या कार्यकर्त्यांस कधींही कमी पडत नाहीं. अद्यापही जीं कांहीं माणसें शिक्षण-क्षेत्रांत किंवा सामाजिक-क्षेत्रांत निष्ठेनें कार्य करीत आहेत त्यांस द्रव्य मिळूं शकतें असा अनुभव आहे. 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या तत्त्वावर खरोखरच विश्वास असेल तर 'माझ्या भक्ताचा योगक्षेम मी वाहीन,' हें गीतेंतील वचन सत्य आहे, असाच अनुभव येतो. पुण्याच्या शिक्षण संस्थांचे दोष व उणीवा माहीत असून व कबूल करूनही मी अनुभवानें असें सांगतों कीं, एकंदरीनें तुलना केल्यास या प्रांतांत किंवा इतरत्र हिंदुस्थानांत कोठेंही असलेल्या संस्थांच्या प्रथमश्रेणींत आम्हीं नि:संशय येऊं. त्या सर्वांच्या मानानें आमचें द्रव्यबल पुष्कळच कमी आहे, हें प्रसिद्धच आहे. नवें होणारें पुणें विद्यापीठ सधन होवोच; पण त्याहीपेक्षां

ध्येयनिष्ठ साध्या राहणीचें (Plain living and High Thinking) महत्त्व व त्या बाबतींतील आमचा इतिहास व पीठिका लक्षांत घेऊन त्याची कार्यपद्धति ठरविणें इष्ट आहे.

विषय फार लांबूं नये व रानडे, टिळक, गोखले ही पिढी निष्ठावान् व उद्योगी होती यावद्दल फारसा मतभेद होणार नाहीं, असें समजून या पिढीच्या कार्यपद्धतीच्या मुख्य उणीवा कोणत्या, याचा विचार करूं. या बाबतींत रानडे यांना प्रायः वगळलें पाहिजे. 'सर्वज्ञः सहि माधवः' ही उक्ति त्यांच्याबद्दल लावतां येते. ते स्वभावानेंही अतिशय सहिष्णु, खऱ्या संतवृत्तीचे होते व म्हणून एकेरीपणाचा, असहिष्णुतेचा दोष त्यांच्या कार्यपद्धतींत व व्यक्तित्वांत नाहीं. शिवाय रानडे हे अनेक चळवळींचे संचालक व बौद्धिक उत्पादक असले तरी प्रत्यक्ष कार्यकर्ते नव्हते. त्यांची देशसेवा खरी; पण प्रायः परोक्ष होती. मुंबईतील जुन्या पिढीतील ज्या नेत्यांचा मीं वर उल्लेख केला आहे त्यांजबद्दलही न्या. रानडे यांजबद्दल केलेलें विधान त्यांच्या पायरींप्रमाणें खरें आहे. चिपळूणकर, टिळक, एका बाजूस व आगरकर गोखले, दुसऱ्या बाजूस, असेच कार्यकर्त्यांचे पक्ष कल्पावे लागतात. दुसरीही महत्त्वाची मंडळी या पक्षांत होती; परंतु या चौघांस प्रातिनिधिक म्हणतां येईल,

एकाच वाक्यांत सांगायचें तर असें म्हणतां येईल कीं, चिपळूणकर, आगरकर टिळक, गोखले, असे एका बाजूनें राष्ट्रकार्य करूं शकले असते; तर दोघांच्या उणीवा भरून निघाल्या असत्या. महाराष्ट्राच्या जीवनांत द्विधाभाव झाला नसता व गांधींच्या चळवळींतही खऱ्या सहकाऱ्यांचें स्थान महाराष्ट्राला मिळूं शकलें असतें. राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक आधीं, हा प्रश्न विचारला म्हणजे दोन उत्तरें येतात व तीं या प्रतिस्पर्ध्यांनी प्रामाणिकपणें दिलीं. परंतु हा प्रश्नच चूक आहे, असें एका अर्थीं रानडे व एका अर्थीं गांधी यांना समजलें. म्हणून टिळक-आगरकरांच्या उद्योगांत असलेला एकेरीपणा त्यांच्या कार्यांत दिसत नाहीं. टिळक व गोखले दोघेही राजकीय सुधारणा अधिक निकडीच्या व महत्त्वाच्या आहेत असें मानणारे व त्याप्रमाणें वागणारे होते. टिळकांच्या प्रमाणेंच गोखलेही

फटकून असत. कारण हिंदुस्थानचें सनदशीर मार्गानें स्वातंत्र्य मिळविणें हें दोघांचेंही एकच ध्येय होतें. त्यांच्या वृत्तींत व स्वभावांत भेद होता, व विशेषतः त्यामुळें ते भिन्न गटांत गेले. गांधी गोखल्यांना गुरु मानीत ते त्यांच्या व्यक्तिगुणांकरितां, त्यांच्या मार्गाकरितां नव्हे. गोखले व गांधी दोघेही भावनाप्रधान होते, टिळक बुद्धिप्रधान होते. या सर्वश्रेष्ठ व्यक्तींची अन्योन्यसंबंधींची चर्चा फार उद्‌बोधक व मनोरंजक होईल. परंतु प्रस्तुत विषयाशीं त्यांचा तितका संबंध नाहीं. थोडक्यांत म्हणजे व्यक्ति व स्वभाव यांतील भेद सोडले तरी मार्ग, कार्यपद्धति व म्हणून ध्येयाचीही कल्पना टिळक-आगरकर यांची भिन्न होती. त्याचें कारण दोघेही समन्वयी नव्हते. टिळक-आगरकर या श्रेष्ठ व्यक्तींत जो एकेरीपणा दृष्टोत्पत्तीस येतो तो त्या पिढीच्या सामान्य लोकांत अधिकच होता. त्याचा परिणाम असा झाला कीं, दोघांच्याही भूमिकेंतला एकेरीपणा वाढत जाऊन राष्ट्रकार्य सदोष व नंतर अशक्य झालें. बौद्धिक व सामाजिक जीवनांत दालनें टिळक-आगरकरांनीं केलीं व त्यांच्या बहुसंख्य अनुयायांत एकतर दुटप्पीपणा व दुसरें पक्षीं पक्षान्धता आली. त्यांतच कार्यशक्ति जाऊन प्रगति थांबली. प्रगति थांबली म्हणून अनुयायित्व किंवा निंदकत्व आलें व न्यूनगंड आला. न्यूनगंडानें लाचारी किंवा असूया उत्पन्न होऊन अविचारी कृत्यें होतात किंवा निष्क्रियता येते.

शिक्षण, समाज व राजकारण यांशिवाय साहित्य, शास्त्र या प्रांतांतील आपल्या कालच्या व आजच्या जीवनाचा विचार केल्यास तींच विधानें पुनः करावयास लागतील. त्यांतही आशेचे अंकुर दिसतात. विशेषतः मराठी साहित्य खरोखरच प्रगतिपर आहे व प्रगति घडवून आणण्यास मदत करील असें वाटत आहे. कालच्या पुढाऱ्यांच्या बौद्धिक उणीवा, एकेरीपणा, असहिष्णुता, ओळखून त्या भरून काढण्याचा प्रयत्न होत आहे; पण खोली नाहीं; पुरेशी निष्ठा नाहीं; उद्योग अविरत नाहीं व आद्यमूल्यें (First Things) कोणतीं व गौण कोणतीं, याची तर्कशुद्ध जाणीव नाहीं. मुख्य म्हणजे जोम नाहीं–जाहिरातबाजी, प्रसिद्धि-लोलुपता अधिक आहे.

आजच्या महाराष्ट्रांतील मुख्य गुण म्हणजे तरुण पिढी अधिक प्रामाणिक, सहृदय, कार्यकुशल व व्यवहारी आहे हा होय. पुरेसें व चांगलें नेतृत्व व विनीते न मिळाल्यामुळें वारेमाप मोकाट सुटलेल्याप्रमाणें कांहीं अंशीं Cynics बनलेले असे आमचे तरुण आहेत. याचा दोष त्यांच्याकडे आहे त्यापेक्षां त्यांचे पालक, त्यांचे राष्ट्रनेते व शिक्षक यांच्याकडे येतो. पैशाशिवाय सर्व फुकट आहे व निर्मूल्य आहे, असें जीवन व ध्येयवादाच्या पोकळ एकांगी गप्पा, वक्तव्यें व लेखन, यानें तरुणांचीं मनें भांबावलीं व विटलीं आहेत. त्यांची वृत्ति थिल्लर व नकारात्मक झाली आहे. धर्म, नीति, देशभक्ति, ज्ञानलालसा या सर्व बाबतींत प्रामाणिकपणा नाहीं व ढोंगी किंवा एकांगी असे ज्येष्ठ लोक व्यावहारिक जगांत यशस्वी होत आहेत, असा नित्य अनुभव असल्यामुळें आमचे तरुण याहीपेक्षां बेशिस्त कां झाले नाहींत याचें मला आश्चर्य वाटतें. शिस्तीवर विश्वास नसणें हा महाराष्ट्रीयांचा एक महत्त्वाचा दोष आहे. तो कालच्या पिढींतही होता; परंतु ते तत्त्वनिष्ठ असल्यामुळें अतिरेक झाला नव्हता; तो आतां झाला आहे. शाळा-कॉलेजांत शिस्त नाहीं म्हणून टाहो फोडणाऱ्या पालकांनीं ती कुठें आहे, हा प्रश्न आपणांस विचारावा. पालक शिस्तींत राहतात का ? जे शिक्षक याबाबत तक्रारी करतात त्यांनींही आपण खरोखरच शिस्तवान् आहोंत का, याबद्दल आत्मनिरीक्षण करावें. मर्यादित क्षेत्रांत आज १८–२० वर्षें मी तरुण विद्यार्थ्यांत वावरत आहें, व माझें स्वानुभवानें असें मत झालें आहे कीं, तीव्र बौद्धिक ज्ञानलालसा सोडली तर इतर सर्व बाबतींत व विशेषतः शिस्तीच्या बाबतींत आजचे विद्यार्थी मागील गेल्या दोन पिढ्यांपेक्षां सरस आहेत. प्रत्यक्ष बुद्धिमत्तेंतही ते बिलकुल कमी नाहींत. असें असतां त्यांचें तेज कां पडत नाहीं, त्यांच्या हातून उद्योग कां होत नाहीं, याचा थोरांनीं विचार करावा. तो केल्यास आपलेच दोष प्रायः याला कारणीभूत आहेत हें लक्षांत येईल. परसत्तेचे टीकाकार व विध्वंसक म्हणून ज्या बेफाट गोष्टी आपण बोललों त्यांचा हा परिपाक आहे हें दिसेल. 'हरताळ पाडा', 'आजची शिक्षण-पद्धति कुचकामाची आहे', 'तरुणांनीं विद्यार्थी असतांही राजकारणांत पडावें' या बीजांचे वृक्ष होऊन ते आतां फळाला लागले आहेत. आतां

एकदम दुसरीं फळें मागून तीं कुठून येणार? वृक्षारोपण केलें पाहिजे, संगोपन केलें पाहिजे. देशभक्तीचा मक्ता वर्तमानपत्र हातांत असणाऱ्या, भाषणें करण्यास सवड असणाऱ्या, निवडणुकींस उभे राहणाऱ्या व क्वचित् 'ब' वर्गांत तुरुंगांत जाणाऱ्या मंडळींनाच नसून इतरही लोक प्रामाणिकपणें आपल्या पद्धतीनें राष्ट्रसेवाच करीत आहेत, हें सर्वांच्या लक्षांत असतें तर 'काय हो, तुमची मुलें काय दंगा करतात सभांना' हें म्हणण्याची आज पाळी आली नसती. याबाबत टिळकांपासून चुकांना आरंभ होऊन, गांधी-युगांत त्यांचा कळस झाला. आजही शिस्त हवी म्हणणारेही शिस्तींत वागत नाहींत, अशी वस्तुस्थिति आहे.

महाराष्ट्रीय तरुणांना जीवनक्रमासंबंधी विधायक सूचना करावयाच्या त्यांत 'उद्योगधंदे वाढवा, व्यापार करा, संपत्ति मिळवा' असें सांगण्याचा अलीकडे प्रघात आहे. दरिद्री हिंदुस्थानचा एक प्रांत म्हणून हा उपदेश ठीक आहे. पण विशेषतः महाराष्ट्रीयांना ते विशेष निर्धन म्हणून हा उपदेश केला जातो. परंतु आमचें 'निर्धनत्व' हें दारिद्र्य नसून आमचा ध्येयवाद व कार्यशक्ति याचें हें प्रतीक आहे व राहावें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. मजकडे 'मी काय करूं' असें विचारायला कोणी महाराष्ट्रीय आल्यास ज्ञानसंवर्धन कर, संशोधन कर, तत्त्वज्ञानाचें शोधन कर, समाज व राजकारण कर, धर्मकारण कर व या सर्वांचें आद्य साधन म्हणून शरीर-संवर्धन कर असेंच मी त्यांस सांगेन. कारण रानडे, टिळक, आगरकर, गोखले यांचे आम्हीं खरे वारस त्याचमुळें ठरूं, काढतां आल्या तरी केवळ कारखाने व गिरण्या काढण्यानें नव्हे. आपलें बल कशांत आहे, हें लक्षांत घेऊन तें वाढवावें. विशेषतः महाराष्ट्रांतील ब्राह्मण व उच्च वर्गानें हें लक्षांत ठेवावें. वैभव व सत्ता यांच्या पाठीमागें लागून खरा मोठेपणा, खरें स्वास्थ्य मिळणार नाहीं. शिवाय 'पैसे मिळविणें' हें सामान्य माणसाला शिकवावें लागत नाहीं. प्रकृति तितकें करतें. विवाह करा, हें न सांगतां ब्रह्मचर्य पाळा असें सांगतात. याचें कारण मनुष्य-स्वभावाप्रमाणें ज्या गोष्टी होतात व होणार त्या गृहीत धरूनच उपदेश करावा. आपण आपला योग्य मार्ग धरल्यास कोणाशींही न भांडतां, विभक्तपणाचा

आजच्या महाराष्ट्रांतील मुख्य गुण म्हणजे तरुण पिढी अधिक प्रामाणिक, सहृदय, कार्यकुशल व व्यवहारी आहे हा होय. पुरेसें व चांगलें नेतृत्व व विनीते न मिळाल्यामुळें वारेमाप मोकाट सुटलेल्याप्रमाणें कांहीं अंशीं Cynics बनलेले असे आमचे तरुण आहेत. याचा दोष त्यांच्याकडे आहे त्यापेक्षां त्यांचे पालक, त्यांचे राष्ट्रनेते व शिक्षक यांच्याकडे येतो. पैशाशिवाय सर्व फुकट आहे व निर्मूल्य आहे, असें जीवन व ध्येयवादाच्या पोकळ एकांगी गप्पा, वक्तव्यें व लेखन, यानें तरुणांचीं मनें भांबावलीं व विटलीं आहेत. त्यांची वृत्ति थिल्लर व नकारात्मक झाली आहे. धर्म, नीति, देशभक्ति, ज्ञानलालसा या सर्व बाबतींत प्रामाणिकपणा नाहीं व ढोंगी किंवा एकांगी असे ज्येष्ठ लोक व्यावहारिक जगांत यशस्वी होत आहेत, असा नित्य अनुभव असल्यामुळें आमचे तरुण याहीपेक्षां बेशिस्त कां झाले नाहींत याचें मला आश्चर्य वाटतें. शिस्तीवर विश्वास नसणें हा महाराष्ट्रीयांचा एक महत्त्वाचा दोष आहे. तो कालच्या पिढींतही होता; परंतु ते तत्त्वनिष्ठ असल्यामुळें अतिरेक झाला नव्हता; तो आतां झाला आहे. शाळा-कॉलेजांत शिस्त नाहीं म्हणून टाहो फोडणाऱ्या पालकांनीं ती कुठें आहे, हा प्रश्न आपणांस विचारावा. पालक शिस्तींत राहतात का ? जे शिक्षक याबाबत तक्रारी करतात त्यांनींही आपण खरोखरच शिस्तवान् आहोंत का, याबद्दल आत्मनिरीक्षण करावें. मर्यादित क्षेत्रांत आज १८–२० वर्षें मी तरुण विद्यार्थ्यांत वावरत आहें, व माझें स्वानुभवानें असें मत झालें आहे कीं, तीव्र बौद्धिक ज्ञानलालसा सोडली तर इतर सर्व बाबतींत व विशेषतः शिस्तीच्या बाबतींत आजचे विद्यार्थी मागील गेल्या दोन पिढ्यांपेक्षां सरस आहेत. प्रत्यक्ष बुद्धिमत्तेंतही ते बिलकुल कमी नाहींत. असें असतां त्यांचें तेज कां पडत नाहीं, त्यांच्या हातून उद्योग कां होत नाहीं, याचा थोरांनीं विचार करावा. तो केल्यास आपलेच दोष प्रायः याला कारणीभूत आहेत हें लक्षांत येईल. परसत्तेचे टीकाकार व विध्वंसक म्हणून ज्या बेफाट गोष्टी आपण बोललों त्यांचा हा परिपाक आहे हें दिसेल. 'हरताळ पाडा', 'आजची शिक्षण-पद्धति कुचकामाची आहे', 'तरुणांनीं विद्यार्थी असतांही राजकारणांत पडावें' या बीजांचे वृक्ष होऊन ते आतां फळाला लागले आहेत. आतां

अट्टाहास न करतां आपलें योग्य स्थान आपणांस सबंध राष्ट्रांत राखतां येईल याविषयीं मला संशय नाहीं. महाराष्ट्रीय तरुणांना उपदेश म्हणून व आणखी एक आशास्थान म्हणून मी त्यांस असें सांगेन कीं, शिक्षणानंतर महाराष्ट्रीय खेडचांत कांहीं तरी कार्य करा. तें केल्याचें चीज होईल. खरें नेतेपण मिळेल, प्रामाणिक सार्वजनिक कार्यास जनतेचा पाठिंबा असतो, हें ध्यानांत येईल व गरिबांचे धन्यवाद मिळतील. अद्यापही सामान्य खेडे-गांवचा रहिवासी विवेकशून्य व सहृदयता नसलेला असा झाला नाहीं. त्याचें हृदय व बुद्धि दोनही शाबूत आहेत. साधनें व मदत मिळेल तर अजूनही कर्तबगारी करण्यासारखीं आहेत. माझ्या मतें शिक्षित महाराष्ट्रीयांची विटलेली व उत्साहहीन झालेली बुद्धि, खेडेगांवच्या राहणीनें ताजीतवानी होईल. त्यांचा जीवनाकडील दृष्टिकोण अधिक स्वाभाविक व समंजस होईल व कोणाही महाराष्ट्रीयाला कोणाच्या तोंडाकडे पाहण्याचा किंवा कोणाशीं भांडण करण्याचा मोह होणार नाहीं.

महात्मा गांधी : व्यक्ति व कार्य

" Plato is dear to us, but truth is dearer."—Aristotle.

" I, on the other hand, am a religious man under the garb of a politician. "—Gandhi.

' महात्मा गांधींचें व्यक्तिमत्त्व व त्यांचें जीवनकार्य ' या विषयावर साहजिकच अनेक ठिकाणीं विचार प्रदर्शित केले गेले आहेत. गत वर्षी त्यांची जीवनयात्रा अत्यंत विस्मयजनक व घोर रीतीनें संपली त्या वेळीं सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून त्यांचेबद्दल नितान्त आदरबुद्धि व्यक्त करण्यांत आली. हिंदुस्थानांत तर कांहीं अपवाद सोडल्यास, अशी एकहि लहानथोर व्यक्ति नसेल कीं जिनें त्यावेळीं आदर, कौतुक व कृतज्ञता या भावनांनीं प्रेरित होऊन गांधींच्या स्मृतीला वंदन केलें नसेल. परंतु यापूर्वीहि अनेक वर्षे अनेक लहानमोठ्या व्यक्तींनीं गांधींचें चरित्र व त्यांचें कार्य याबद्दल प्रायः स्तुतिपर व क्वचित् विरोधात्मक असें विवेचन केलेलें आहे. तरीहि अद्याप या विषयावर पुष्कळ अधिक विचार व्हावयास हवा आहे. ' आधुनिक भारताचे जनक ' असें ज्या व्यक्तीला आपण म्हणतों तिच्या कार्याची पुरेपूर व योग्य कल्पना आपणांपैकीं पुष्कळांस अद्यापि नाहीं व ती आल्याशिवाय तिच्या कार्याचें चीज आपल्या हातून होणार नाहीं हें स्पष्ट आहे. गांधींचें निधन व त्यापूर्वी व त्यानंतर झालेल्या घटना यांवरून या देशांतील जनतेला गांधी मोठे वाटत असले तरी त्यांच्या कार्याची खरी महती तिला समजली नाहीं असें दिसतें व यांत मी गांधींचे बहुसंख्य अनुयायी आणि प्रकट व प्रच्छन्न विरोधक या दोहोंचाहि समावेश करतों.

प्रस्तुत महत्त्वाच्या विषयाच्या विचाराबाबत आपल्या हातून होईल ती मदत करावी या बुद्धीनें खालील लेख लिहिला आहे. प्रत्यक्ष विवेचनास प्रारंभ करण्यापूर्वी लेखकाचा दृष्टिकोण व या विषयावर

विचार करण्याची त्याची 'पात्रता' याबद्दल दोन शब्द लिहिणें योग्य व अवश्य वाटतें. 'पात्रता' इतकीच कीं गेल्या २७–२८ वर्षांत, गांधींचें या देशांतील सार्वजनिक जीवन सुरू झाल्यापासून, विद्यार्थिदशेंत व नंतर प्राध्यापक असतां, प्रायः असा एकहि सप्ताह गेला नसेल कीं जेव्हां गांधींचें कार्य व चरित्र यांबद्दल कांहीं तरी भावना व विचार लेखकाच्या मनांत आलीं नाहींत. लेखकाप्रमाणेंच इतरहि सहस्रावधि शिक्षित व्यक्तींची अशीच अवस्था असणार. राजकारणांत असो वा नसो, गांधींची दखल विचारांत तरी घेतल्याशिवाय, गांधींविषयीं मनाशीं किंवा स्नेह्यांजवळ तरी टीकात्मक किंवा प्रशंसात्मक असें कांहीं बोलल्याशिवाय फार वेळ राहणें कोणाही विचारी माणसास या देशांत शक्य नव्हतें. गांधींच्या मोठेपणाचें अगदीं अचूक निदान हेंच होय. म्हणूनच सर्व टीका व टीकाकार एका बाजूला व गांधी एका बाजूला असें असतांहि गांधींचें पारडेंच नेहमीं वजनदार ठरलें.

लेखकाचा दृष्टिकोण तत्त्वजिज्ञासूचा व उद्योग शिक्षकाचा आहे; त्याची वृत्ति सत्यान्वेषकाची, अभ्यासकाची आहे. आपल्या देशांतील अत्यंत प्रभावशाली व्यक्ति 'गांधी' यांचा सार्वजनिक संसार आपल्या हयातींत चालू आहे, त्याचें स्वरूप काय, त्याचें माहात्म्य खरोखर कशांत आहे, त्यास कांहीं उपाधी आहेत काय, असल्यास त्या कोणत्या व या सर्व निरीक्षणाचा हिंदी व जागतिक जीवनास काय उपयोग होण्यासारखा आहे, यांचा विचार करण्याची इच्छा हाच लेखकाचा दृष्टिकोण. अर्थात् हा अभ्यास करतांना लेखक तत्त्वजिज्ञासु असला तरीहि हिंदुस्थानचा सामान्य नागरिकहि असल्यामुळें गांधींच्या यशामुळें अभिमान, कौतुक व कृतज्ञता आणि अपयशामुळें दुःख या भावनाहि त्याला वाटत आल्या आहेत. गांधींच्या निधनानंतर इतर लक्षावधि हिंदवासीयांप्रमाणेंच गांधींचें नांव उच्चारलें किंवा चलच्चित्रपटांत गांधींची मूर्ति दिसली कीं "केवढा मोठा हा अवतारी पुरुष आणि आपल्यापैकीं एका व्यक्तीनें त्यांचा काय भयंकर शेवट केला व त्यामुळें कायमची किती मोठी हानि झाली!" या व अशा विचारांनीं लेखकाचें मन अस्वस्थ व कावरेंबावरें होतें! अभ्यासकाच्या दृष्टिकोणाचें मुख्य वैशिष्ट्य म्हणज सहृदय

निःपक्षपातित्व. तें सांभाळण्याचा प्रयत्न लेखकानें केला आहे. जें जीवन,, ज्या घटना, किंवा जे अनुभव यांचा अभ्यास करावयाचा त्यांच्याशीं समरस होण्याचा प्रयत्न करणें हें सत्यान्वेषकाचें पहिलें कर्तव्य होय. पण त्यावरोबरच ही समरसता केवळ भावनात्मक व आंधळी नसून डोळस असावी व इतर मूल्यांचा विसर पडूं देतां कामा नये. लेखाच्या अग्रभागी दिलेल्या अवतरणांपैकीं ॲरिस्टॉटलचें वचन हें या बाबतींत सामान्यतः ध्येयभूत समजलें पाहिजे व लेखकानें तेंच आपल्यासमोर ठेवलें आहे. असो.

गांधींचा सार्वजनिक जीवनक्रम इतका चमत्कृतिपूर्ण आहे कीं तो प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोर घडला नसता तर खराहि वाटला नसता ! शास्त्रीय शोध व अद्ययावत्पणा यांच्या युगांत अहिंसा, खादी, मद्यपानबंदी, खेडेगांवची राहणी, या व अशा बाबींवर शक्तिसर्वस्व खर्च करणारी एक व्यक्ति सुमारें तीस वर्षें कोट्यवधि लोकांचें राजकीय धुरीणत्व संभाळते, आपल्या आयुष्यांत त्यांचा स्वराज्याचा लढा पुरा झालेला पाहते व एक वेळचे शत्रु व मित्र दोघांकडूनहि धन्यवाद मिळविते, ही खरोखरच असामान्य घटना होय. या तीस वर्षांत अनेक प्रसंगीं अशा घटना झाल्या कीं, गांधीजीचें सार्वजनिक जीवन संपलें, आतां ते निवृत्त होणार, असें पुष्कळांना वाटलें असेल. पण १९२० चा, १९३० चा, १९४२ चा, या तीनहि लढ्यांत गांधीच सर्व चळवळीचे खरे नेते राहिले. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्याचा कायदा जाहीर केला गेला, तेव्हां गव्हर्नर-जनरल लॉर्ड माऊन्टबॅटन, पंतप्रधान पं. नेहरू व इतर सर्व नेते यांनीं स्वातंत्र्याचे मुख्य कारागीर म्हणून गांधींचा उल्लेख केला, तो अक्षरशः खरा होता, हें कोणीहि मान्य करील. स्वराज्य-संस्थापनेशिवाय भारतीयांचें सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या प्रगतिसाठीं आणि सर्व जगांत शांतता व सहिष्णुता नांदावी म्हणून त्यांनीं असामान्य कामगिरी केली.

गांधींचें व्यक्तिमत्त्व व त्यांचें कार्य यांचे मुख्यतः दोन भाग पाडतां यतील : देशभक्त गांधी व ईश्वरभक्त गांधी. प्रथम गांधींच्या देशसेवेचा विचार करूं. ब्रिटिश रियासतींतच नव्हे, तर गेल्या कित्येक शतकांत

इतकी व्यापक व प्रभावी देशसेवा दुसऱ्या कोणाहि हिंदवासीयानें केलेली नाहीं हें निर्विवाद आहे. ब्रिटिश रियासतींत गांधींच्याप्रमाणें दादाभाई नौरोजी, रानडे, टिळक, गोखले, दे. बं. दास यांसारखे कर्तबगार व ध्येय-निष्ठ राजकीय पुढारी, राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी विवेकानंद, अरविंद घोष, यांसारखे धार्मिक व सामाजिक नेते आणि टागोर व जगदीशचंद्र बोस यांसारख्या प्रतिभासंपन्न व्यक्ति या देशांत होऊन गेल्यामुळें व त्यांच्या कार्यामुळें गांधींचें कार्य शक्य व सुकर झालें यांत संशय नाहीं. तसेंच आजहि गांधींचें शिष्यश्रेष्ठ व वारस असे हिंदुस्थानचे पंतप्रधान पं. नेहरू, हिंदुस्थानचे गव्हर्नर-जनरल श्री. चक्रवर्ती राजगोपाला-चारियर व उपपंतप्रधान सरदार पटेल यांसारखे कर्तबगार व ध्येयनिष्ठ देशभक्त आपणांत आहेत व पुढेंहि होतील. तरीहि या देशांतील कोट्यवधि जनतेची गांधींनीं जितकी व जशी सेवा केली, तितकी व तशी कोणींहि केली नाहीं हें स्पष्ट आहे. याचें मुख्य कारण म्हणजे गांधींचें असामान्य व्यक्तिमत्त्व. गांधींपेक्षां बुद्धिमत्तेंत, व्यवहारदक्षतेंत व इतर कोणत्याहि एका बाबींत श्रेष्ठ अशा अनेक व्यक्ति आपल्या देशांत गेल्या शतकांत झाल्या, आजहि असतील व पुढेंहि होतील; परंतु एकंदर गुणसमुच्चयाचा विचार केला तर इतके उत्कट व बहुसंख्य गुण दुसऱ्या कोणाहि देश-भक्तांत क्वचितच असतील. याबाबत गांधींची उत्कट धार्मिकता हीच त्यांना फार उपयोगी पडली. 'ईश्वराधिष्ठान' हें सर्व प्रभावी चळवळींचें बीज आहे, हें गांधींनीं पुरेपूर ओळखलें होतें व त्याचा त्यांनीं भरपूर उपयोग केला. गांधींबद्दल सामान्य जनतेला असलेली विलक्षण ओढ त्यांच्या धार्मिक देशभक्तीमुळें वाटे. एकंदरींत ईश्वरदत्त किंवा नैसर्गिक देणगी व मानवी प्रयत्न या दोहोंच्या सहकार्यानें गांधी या व्यक्तींत जे गुण विकास पावले ते निर्विवादपणें असामान्य होते.

राजकारण, समाजकारण, अर्थकारण व धर्मकारण यांची गांधींनीं 'खिचडी' केली असा एक आरोप गांधींवर केला जातो व त्यांत माझ्या मतें तथ्यांशहि आहे. गांधींच्या कार्याच्या मर्यादा व त्यांतील कांहीं दोष यांचीहि त्यामुळें उपपत्ति लागेल; परंतु दुसऱ्या दृष्टीनें त्यांतच गांधींचें मोठेपण होतें व त्यांतच गांधींच्या यशाची किल्ली होती. अर्वाचीन हिंदी

पुढाऱ्यांपैकीं न्यायमूर्ति रानडे यांचें या बाबतींत गांधींशीं सादृश्य दिसतें. त्यांचा व गांधींचा व्यक्तिपिंड अगदीं वेगळ्या प्रकारचा आहे : रानडे बुद्धि-मार्गी तर गांधी भावना-मार्गी होत. तरी पण देशभक्तीच्या मर्यादा सबंध जीवनावर पसरविणें व त्याला धार्मिकतेची बैठक देणें या बाबतींत मात्र त्या दोघांचें साम्य आहे.

देशभक्त म्हणून गांधींनीं काय मिळविलें, याचें उत्तर वाटतें तितकें सोपें नाहीं. कारण, आपणांस स्वातंत्र्य मिळालें तें एकट्या गांधींच्याच प्रयत्नानें, असें म्हणतां येत नाहीं. एक तर गांधींच्या पूर्वी दादाभाई नौरोजींपासून जे अनेक थोर राजकीय पुढारी झाले त्या सर्वांच्या प्रयत्नांची पार्श्वभूमि, तसाच त्यांचा पाया, गांधींच्या कार्यास होता; आणि दुसरें म्हणजे महायुद्धामुळें उत्पन्न झालेल्या जागतिक परिस्थितींतील फेरबदल न होते, तर आणखी पन्नास वर्षें तरी आपणांस स्वराज्य मिळालें असतें असें वाटत नाहीं. १९२१ ची, १९३०–३१ ची, १९३२–३४ ची, इतकेंच नव्हे तर १९४२ ची – या चार चळवळींनीं लोकांत विलक्षण जागृति केली व ब्रिटिश राज्यसत्तेविषयीं असमाधान उत्पन्न केलें. त्यायोगें स्वराज्य जवळ आलें असलें तरी आंतरराष्ट्रीय परिस्थितींत जीं विलक्षण स्थित्यंतरें झालीं तीं झालीं नसतीं तर आणखी अनेक सर्वगामी व उत्कट चळवळी झाल्याशिवाय स्वराज्य मिळालें असतें अशी शक्यता दिसत नाहीं. ही वस्तुस्थिति आजच्या अनेक नेत्यांना माहीत नसावी किंवा मान्य तरी नसावी असें त्यांच्या भाषणावरून कधींकधीं वाटतें; परंतु नीट विचार केला तर ती सहज पटण्यासारखी आहे.

गेलीं तीस वर्षें विद्यमान राजकीय पुढाऱ्यांतील या देशाचे सर्वश्रेष्ठ राजकीय नेते असल्यामुळें, स्वातंत्र्याचे मुख्य कारागीर व प्रणेते आणि अर्वाचीन हिंदुस्थानचे पितृतुल्य पुढारी असें गांधीचें वर्णन करणें योग्य असलें तरी " केवळ त्यांनींच (किंवा केवळ १९२१ नंतरच्या देशभक्तांनींच) स्वातंत्र्य मिळविलें " असा जो कांहीं भावनाशील अर्वाचीनांचा समज आहे तो मात्र वस्तुस्थितीवर आधारलेला नाहीं. शिवाय, अनेक महत्त्वाच्या बाबतींत हा देश इतका मागासलेला आहे व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व

स्वातंत्र्यप्राप्तीकरतां इतक्या अनिष्ट घटनांचा स्वीकार करावा लागलेला आहे कीं गांधींना अर्वाचीन हिंदुस्थानचे जनक व स्वातंत्र्याचे मुख्य प्रणेते असें म्हटल्याबरोबर आजच्या हिंदुस्थानचीं तशींच आपणांस मिळालेल्या स्वातंत्र्यांतलीं जीं अनेक वैगुण्यें आहेत त्यांचा उगम त्यांच्या कार्यपद्धतींतील दोषांमुळें झाला नसला तरी त्यांचें अस्तित्व त्यांमुळें राहिलें आहे असें म्हणणें भाग आहे.

तसेंच पाहिलें तर स्वतंत्र हिंदुस्थानांत कोणते दोष नाहींत ? नागरिकत्वाच्या जाणिवेचा संपूर्ण अभाव जनतेंत आढळून येतो; तर जबाबदार किंवा लोकशाही राज्यपद्धतींतील मूलभूत कर्तव्यें करण्याची असमर्थता राज्यकर्त्यांत दिसून येते. याचा अर्थ पंडित नेहरू किंवा सरदार पटेल व इतर कांहीं मंडळी कर्तबगार व ध्येयनिष्ठ पुढारी नाहींत असा नव्हे; तर आमचे श्रेष्ठ पुढारीहि आमच्यांतीलच असल्यामुळें आमच्याप्रमाणेंच तेहि शिस्तीच्या, संयमाच्या, विचारशीलतेच्या व रचनात्मक कार्यनिष्ठेच्या उच्च कसोटीस उतरूं शकत नाहींत. इतकेंच नव्हे तर, पुरोगामी विचार व समाजव्यवस्था यांचें पूर्ण आकलनहि त्यांना होतें असें दिसत नाही, इतकाच आहे. जनता सर्वस्वीं अशिक्षित व पुढारी राज्यकारभारांत अननुभवी, यांमुळें व स्वातंत्र्य मिळवितांना विशेषतः देशाच्या विभागणीची जी अनिष्ट घटना आपणांस स्वीकारावी लागली तीमुळें, तसेंच जगांतील बलाढ्य राष्ट्रांच्या समूहांत प्रथमच स्वतंत्रपणें व्यवहार करण्याची पाळी आल्यामुळें, स्वातंत्र्याचें पहिलें वर्ष अनेक दृष्टींनीं तापदायक गेलें व भावी कालाबद्दलही मन साशंक होतें. आमची राजकीय चळवळ अधिक बुद्धिवादी, अधिक रचनात्मक व अधिक अंतर्मुख रीतीनें चालविली गेली असती तर, आज आमच्यापुढें असलेले अडचणींचे अनेक प्रश्न उद्भवलेच नसते किंवा उद्भवले असते तरी इतके बिकट तरी झाले नसते असें समजण्यास जागा आहे.

हिंदु-मुसलमानांचें वैमनस्य, अस्पृश्य समाजाला स्पृश्यांबद्दल वाटत असलेला अविश्वास, आत्यंतिक दारिद्र्य, संपत्तीची विषम व अन्याय्य विभागणी आणि शिस्त व नागरिकत्वाची जबाबदारी यांचा अभाव हे ते

महत्त्वाचे अडचणीचे प्रश्न होत. ह्या सर्व अडचणी आमच्या मार्गात ब्रिटिश लोकांनीं आणल्या व त्यांस आम्हीं बिलकुल जबाबदार नाहीं असें म्हणण्याचा आपल्याकडे सार्वत्रिक प्रघात आहे, त्यांत अधिकांत अधिक 'अर्धसत्य' आहे. तरी पण ब्रिटिशांची राज्यसत्ता हांकलून लावणारे आमचे नेते या अडचणी कां दूर करूं शकले नाहींत, हेंहि विचार करण्यासारखें आहे. माझ्या मतें गांधींची प्रभावी व सर्वंकष पण वावटळी व प्रदर्शन-प्रधान (Demonstrative) राजनीति व कार्यपद्धति यांमुळें हे प्रश्न सुटले तर नाहींतच; पण उलट कांहींसें बिकट होऊन बसले ! व्यक्तिशः गांधींपुढें हे प्रश्न नव्हते. कारण, ते या सर्वांकडे उच्च नैतिक भूमिकेवरून पाहात; परंतु प्रत्यक्ष राजकारणांत त्यांच्या बहुसंख्य अनुयायांमध्यें त्यांची सात्त्विकता नसूनहि त्यांना इच्छा मात्र व्यावहारिक यशाची होती. तथापि त्यांचे मार्ग व्यावहारिक नव्हते; म्हणून शेवटीं चांगुलपणाहि नाहीं व व्यावहारिक यशहि नाहीं, अशी अवस्था झाली आहे !

"माझा रचनात्मक कार्यक्रम जनतेनें पार पाडल्यास एका वर्षांत स्वराज्य मिळेल" असें गांधी म्हणत. त्याला गांधींचे टीकाकार हंसले व गांधींच्या अनुयायांनीं त्याकडे कानाडोळा केला व म्हणूनच स्वराज्य मिळूनहि त्याबरोबर जें सुख, जी स्वाधीनता, जें स्वावलंबन व जी सुबत्ता येईल असें वाटलें होतें ती आली नाहीं. याचा दोष एका अर्थीं जनतेवर असला तरी एका अर्थीं पुढाऱ्यांवर व म्हणूनच सर्वश्रेष्ठ नेते गांधी यांवरहि येतो. खरोखरच गांधींच्या रचनात्मक चतुःसूत्रीकडे योग्य लक्ष पुरविलें गेलें असतें तर आमचे बिकट प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागले असते व स्वराज्याच्या पहिल्या वर्षांत घडलेल्या अनन्वित घटना झाल्याच नसत्या. या रचनात्मक कार्याचे प्रणेते गांधीच होत यांत शंका नाहीं. परंतु राजकीय चळवळीचें व परकीय राजवटीविषयीं असमाधान निर्माण्याचें साधन म्हणूनच प्रायः तिचा उपयोग त्यांच्या बहुसंख्य अनुयायांनीं केला व गांधींनीं त्यांना तो तसा करूं दिला. त्यामुळेंच प्रत्यक्ष रचनात्मक कार्य फारच अल्प झालें. ज्या हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या व सलोख्याच्या ध्येयाकरितां गांधींनीं शेवटीं आपले प्राणहि अर्पण केले तें ध्येय इतकें दूर कां गेलें, याचा विचार केला तर मुसलमान नेत्यांचा स्वार्थान्ध दुराग्रह व पाश्चात्य सत्तास्पर्धी राष्ट्रांची

कपटनीति यांबरोबरच महात्मा गांधींसकट त्यांच्या बहुसंख्य अनुयायांमधला मुत्सद्दीपणाचा व एकसूत्रीपणाचा अभाव हींच त्याचीं कारणें होत, असें दिसून येईल. मुसलमान म्हटला कीं तो लबाड व दुष्टच, अशीच ज्यांची विचारसरणी असेल त्यांची गोष्ट वेगळी; परंतु मुसलमान लोकहि आपणांसारखेच मानव आहेत व हिंदीहि आहेत; मग ते एकदम असे देशद्रोह्यांसारखे कां वागूं लागले हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे व त्या बाबत पुष्कळच आत्मनिरीक्षण करतां येण्यासारखें आहे. अस्पृश्य जमातीचा प्रश्न अद्यापि समाधानकारक रीतीनें सुटलेला नाहीं व आज तो दबलेला दिसत असला, तरी केव्हांना केव्हां तरी तो हिंदुस्थानच्या प्रगतीच्या आड पुनः येईल अशी भीति आहे. त्याचेंहि कारण म्हणजे गांधी व त्यांचे अनुयायी यांची धरसोडीची वृत्तीच. गेल्या प्रांतिक निवडणुकींत अस्पृश्य समाजानें मोठ्या बहुमतानें निवडलेले उमेदवार नंतर सार्वत्रिक मतनोंदणींत अयशस्वी होणें, डॉ. आंबेडकर यांना घटनासमितींत निवडून येण्याकरितां बंगालपर्यंत जावें लागणें, हैद्राबाद संस्थानांतील अस्पृश्य समाजाचा रझाकारांना किंवा निदान हिंदविरोधी गटांना मिळत असलेला पाठिंबा, या घटनांचा नीट विचार केला तर या जमातीचा प्रश्न न्याय्य व समाधानकारक रीतीनें सोडविला गेलेला नाहीं हें स्पष्ट होईल. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचे तर जो ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रश्न आम्हीं सोडविला असें काँग्रेसचे येथील नेते म्हणत होते, तो सुटलेला नाहीं, हें 'बहुजनसमाज' पक्षाची स्थापना दाखवीत आहे.

गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमांपैकीं अतिशय महत्त्वाची आणखी एक बाब म्हणजे खादी. स्वावलंबन, साधेपणा व न्याय्य अर्थविभागणी यांनींच हिंदुस्थानचा (व जगाचाहि) दारिद्र्याचा प्रश्न सुटूं शकेल व याबाबत नेत्यांनीं उदाहरण घालून दिलें पाहिजे, हा खादीच्या कार्यक्रमाचा खरा अर्थ; परंतु गांधींच्या हयातींतच त्यांच्या व्यापारी मित्रांनीं व त्यांच्या बहुसंख्य काँग्रेस अनुयायांनीं खऱ्या खादीला वाणीनें नसला तरी कृतीनें धोका दिला ! खादी वापरली; पण ती मिलची किंवा जपानीहि ! ! व वापरली तीहि काँग्रेस-संस्थेंत व तिच्याकरवीं इतरत्र निवडून येण्याकरितां ! ! ! ही गोष्ट गांधींसारख्या चतुर मनुष्याच्या लक्षांत आली नसेल, हें शक्य

नाहीं. पण 'असले नालायक व अप्रामाणिक अनुयायी मला नकोत, तुम्हीं आपला लढा चालवा,' असें काँग्रेसला न म्हणतां गांधी काँग्रेसशीं सहकार्य करीतच राहिले. याचा अर्थ रचनात्मक कार्यक्रम केवळ राजकीय चळवळीचें साधन म्हणून करूं देण्याला ते तयार होते व आपल्या अत्यंत ओजस्वी व सत्प्रवृत्त कार्यक्रमाकडे त्यांनीं कांहींशी पाठ फिरविली असाच होतो.

गांधींच्या जीवनाचें सार व कार्यपद्धतींचें वैशिष्ट्य त्यांच्या 'अहिंसें'त आहे; परंतु खेदाची गोष्ट अशी कीं, हिंदी जनता खऱ्या अर्थानें अहिंसाभक्त बिलकुल बनली नाहीं, असेंच अनेक वेळां सिद्ध झालें. शेवटीं तर कळसच झाला ! ! स्वराज्याच्या पहिल्या वर्षांत लक्षावधि लोकांची हत्या व वाताहात झालेली आपण निमूटपणें पाहिली व अहिंसेचे मुख्य सेवक गांधीजी यांचाहि खून या देशांत झाला ! ! !

व्यक्तिशः गांधींनीं आपलीं तत्त्वें जीवनांत पाळलीं; परंतु आपले अनुयायी तीं पाळत नाहींत व त्यांचा त्यांवर विश्वास नाहीं, हें स्पष्ट दिसत असतांना राजकीय नेते म्हणून त्यांनीं त्यांना पाठीशीं घातलें व चळवळ चालू ठेविली. विशेषतः १९४२ च्या चळवळीबाबत 'अहिंसा' शब्दाचा जो अर्थ गांधींनीं करूं दिला त्यानें अहिंसेचीच 'हिंसा' झाली ! स्वराज्याच्या किंवा कोठल्याहि न्याय्य लढ्यांत 'हिंसा' करायला लागली तरी करावी असें म्हणणारा एक प्रामाणिक व ध्येयवादी पक्ष आहे; पण गांधींचे अनुयायी (व बहुसंख्य हिंदी जनता) तसले प्रामाणिक लढवय्ये नव्हते व खरे अहिंसावादीहि नव्हते असेंच इतिहास म्हणेल. वरील विवेचनांतील विधानें सर्वसाधारण असून त्यांत अपवाद आहेत व स्वतः गांधी किंवा त्यांचे कांहीं खरे अनुयायी यांना तीं लागत नाहींत, हें इतरांप्रमाणें लेखकासहि माहीत आहे. तरीहि पण नेते म्हणून अनुयायांच्या वैगुण्यांची जबाबदारी या सर्वांवर पडते व म्हणूनच राजकीय पुढारी या दृष्टीनें गांधींचें यश परिपूर्ण नाहीं. त्यांनीं अधिक बुद्धिवादी व व्यावहारिक आणि म्हणूनच त्या अर्थीं अधिक प्रामाणिक कार्यपद्धतीचा अंगीकार केला असता तर तें यश परिपूर्ण झालें असतें असें मानण्यास सबळ कारणें आहेत.

तथापि ही उणीव मानली तरीहि गांधी हे भारताचे सर्वश्रेष्ठ राजकीय पुढारी व आधुनिक भारताचे 'जनक' होते, या विधानाला बाध येत नाहीं. कारण, हें विधान तुलनात्मक आहे व त्या दृष्टीनें विद्यमान व गत पुढाऱ्यांशीं तुलना करतां गांधींइतकी प्रभावी देशसेवा त्यांच्याइतक्या दीर्घ काळपर्यंत क्वचितच केली गेली हें स्पष्ट आहे. शिवाय, आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, नेत्यांचे दोष हे अनुयायांच्या वैगुण्यांचे प्रतिक्रियात्मक असेच असतात व हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या व सर्व दृष्टींनीं निकृष्टावस्थेंत असलेल्या देशाऐवजीं अधिक सुधारलेल्या, प्रगतिपर व जिवंत राष्ट्रांत गांधी जन्मले असते तर ते याहीपेक्षां मोठे झाले असते.

गांधींचा वध झाल्यापासून त्या वधास कोण व किती (कायदेशीर दृष्ट्या नव्हे) जबाबदार ठरतात व त्यानंतर देशाच्या कांहीं भागांत उठलेल्या वावटळीचें खरें स्वरूप काय व तीवर कायमचे उपाय कोणते, याची आजवर वरीच चर्चा झाली आहे व अनेक विचारी व विद्वान् व्यक्तींनीं तींत भाग घेतला आहे. वस्तुस्थितीचीं बहुतेक अंगें पुढें आलीं आहेत; परंतु त्यांचा समन्वय करण्याच्या मनःस्थितींत कोणीच नव्हतें असें वाटतें. प्रस्तुत लेखांत या प्रश्नाचा प्रत्यक्ष व सविस्तर विचार करणें नाहीं; परंतु माझे सिद्धान्त चर्चेकरितां थोडक्यांत मांडीत आहें.

माझ्या मतें गांधी या व्यक्तीचा खरा मोठेपणा या देशांतील बहुसंख्य जनतेला–विशेष म्हणजे त्यांच्या अनुयायांनासुद्धां कधींच समजला नाहीं व गांधींची शिकवणूक तर फारच थोड्या व्यक्तींनीं प्रामाणिकपणानें पाळली. म्हणून, प्रत्यक्ष गांधींचा खून झाला नसता तरीहि गांधींच्या जीवन-मूल्यांना हिंदी जनतेनेंच नव्हे तर त्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांनींहि 'नकार'च दिला आहे हें स्पष्ट झालें होतें. गांधीजी शेवटल्या कांहीं महिन्यांत अतिशय उदास असत. त्याचें कारण हें कीं, ज्या ज्या गोष्टी ते मूलभूत म्हणून मानीत, त्याचेकडे या देशांतील जनता व नेते यांनीं पाठ फिरविली होती. म्हणून मौ. आझाद यांनीं म्हटल्याप्रमाणें एका अर्थीं प्रत्येक हिंदी व्यक्तीच्या हातावर गांधीजींच्या रक्ताचा डाग आहे व तो यापुढील आचरणानेंच धुऊन निघाला तर निघेल, गांधींच्या नुसत्या स्तुतीनें किंवा गांधींच्या विरोधकांची निर्भर्त्सना केल्यानें नव्हे!

परंतु वरील महत्त्वाची पण अनेकांना समजत नसलेली या प्रश्नाची बाजू लक्षांत घेतली तरीहि प्रत्यक्ष खुनाची घटना होण्यापर्यंत पाळी आली याचीं दुसरींहि कारणें आहेत. असलें कृत्य प्रत्यक्ष करणारे लोक माथेफिरू असतात व ते ज्या समाजांतील असतील त्या समाजांत इतर पुष्कळ व्यक्तीहि तशाच असतील असें समजणें चुकीचें आहे. तथापि हा प्रश्न येथेंच सोडतां येत नाहीं. याचें कारण असें कीं, अशा अविचारी व माथेफिरू व्यक्तींना तरी गांधीजी या व्यक्तीचा खून करावासा कां वाटला, याचा विचार कर्तव्य आहे. त्याचें एक कारण गांधींचा मोठेपणा. असामान्य व अवतारी व्यक्ति इतक्या प्रभावशाली होतात कीं, त्यांच्याशीं सहमत नसलेल्या व्यक्ति उघड व परिणामकारक प्रतिकार करूं शकत नाहींत, म्हणून आततायी बनतात. याबाबत माझ्या मतें मध्यवर्ति सरकारने सरकार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या ओळखल्या नाहींत. कटाचा तपास व बंदोबस्त या बाबींचा उल्लेख मी येथें करीत नाहीं. त्या कोर्टासमोर आहेत. एका अर्थीं गांधींचें संरक्षण करणें खरोखरच कठिण होतें. कांहींहि व कसलेंहि संरक्षण आग्रहपूर्वक न घेतां जनसमुदायांत अहर्निश मोकळेपणानें वावरणाऱ्या एका निःशस्त्र पुरुषाला मारणें यांत तसें कठिण कांहींच नाहीं व कडेकोट बंदोबस्त असतांहि अशीं कृत्यें धाडसी लोक करूं शकतातच. मी हिंदी सरकारला दोष देतों तो अशाकरितां कीं, गांधींनीं सत्प्रवृत्ति व मनाचा थोरपणा यांमुळें घेतलेला निर्णय अव्यवहार्य आहे, असें हिंद सरकारचें मत असूनहि त्याला सरकारकडून पसंतीचा शिक्का मिळाल्यासारखा झाला व ह्या सरकारकडून गांधींच्या अव्यवहार्य गोष्टीहि उचलून धरल्या जाण्याचा संभव आहे असें दिसलें; तेव्हां मात्र गांधींचाच नाश केला पाहिजे, असे उत्पाती विचार कांहीं भावनावश तरुणांच्या डोक्यांत उसळूं लागले असावेत. याबाबत हिंद सरकारनें अधिक निश्चित भूमिका प्रगटपणें घ्यावयास हवी होती.

गांधींच्या शोचनीय निधनानंतर त्यांच्या अनुयायांनीं काय केलें व काय केलें नाहीं, याचा थोडक्यांत निर्देश करून हा विषय संपवितों. माझ्या मतें गांधीजींच्या निधनामुळें भावनेचा जो आवेग साहजिकच सर्व हिंदव सीयांच्या व विशेषतः गांधींच्या अनुयायांच्या ठायीं उत्पन्न झाला त्याचा

आविष्कार करतांना मोठेपणाला साजेसा संयम दाखविला गेला नाहीं. गांधींचा अंत्यविधि होईपर्यंत नभोवाणीच्या व इतर सर्व प्रचार-साधनांच्या द्वारें शोकप्रदर्शनाची सीमा गांठली गेली ! तसें करतांना शेवटीं शेवटीं साहजिकच आर्तता व स्वाभाविकपणा यांची उणीव दिसून आली व तेराव्या दिवशींच्या महायात्रेचीं रेडिओवरील वर्णनें तर इतर मिरवणुकींच्या किंवा क्रिकेट-मॅचच्या वर्णनासारखीं वाटूं लागलीं ! या सर्व अतिरेकाचा अनिष्ट परिणाम असा झाला कीं, हा भावनावेग ओसरल्यावर गांधींना जनताच नव्हे तर खुद्द त्यांचे अनुयायीहि विसरल्यासारखे दिसतात. ज्या गांधींना उभ्या आयुष्यांत एकाहि निधीच्या बाबतींत अपयश आलें नाहीं, त्यांच्या स्मारकाच्या निधीबाबत इतकी व्यवहारशून्यता व इतकें कार्यशैथिल्य दिसून येत आहेत कीं, त्यामुळें कोणाहि सहृदय हिंदवासीयास खेद वाटल्याशिवाय राहणार नाहीं. माझ्या मतें याचें मुख्य कारण म्हणजे गांधींचा खरा मोठेपणा त्यांच्या तथाकथित अनुयायांस कधींच नीट समजला नाहीं व पटला नाहीं.

गांधीजी एवढी असामान्य व्यक्ति या देशांत होऊन गेली; परंतु त्यांच्या गुणांचें चीज आपण पुरेसें करूं शकलों नाहीं, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. परंतु ती कबूल केल्यानेंच यापुढें तरी प्रामाणिक आचरण होईल हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जे लक्षावधि लोक आपणांस गांधींचे अनुयायी म्हणवितात, गांधीटोप्या घालतात व काँग्रेसचे म्हणून निवडून येतात, ते सर्व जर खरे गांधी-भक्त असते किंवा होतील तर आमचे पुष्कळसे प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागले असते किंवा लागतील; खरी भक्ति म्हणजे अंधश्रद्धाहि नव्हे वा ढोंगहि नव्हे.

गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा व जीवनकार्याचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांची ईश्वरभक्ति व धार्मिकता हा होय. गांधी या व्यक्तींत देशभक्ति व ईश्वरभक्ति या दोहोंचा सुंदर मिलाफ झाला होता. या दोहोंचा अन्योन्यसंबंध निकट आहे; तो कसा याचाहि विचार आपणांस करावा लागेल. परंतु तत्पूर्वी गांधींच्या धार्मिकतेबद्दल किंवा ईश्वरभक्तीबद्दल सविस्तर विवेचन करणें जरूर आहे.

9230

गांधीजींच्या राष्ट्रीय नेतृत्वाबद्दल आणखी एक-दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगून मग त्यांच्या धार्मिक जीवनाकडे वळतों. त्यांच्या राजकीय कार्यांतील वैगुण्यें व त्यांच्या मर्यादा लक्षांत घेतल्या तरीहि 'आधुनिक भारताचे जनक' ही जनतेनें स्वयंस्फूर्तीनें त्यांना दिलेली पदवी सार्थच आहे, हें वर सांगितलेंच. ब्रिटिश रियासतीबद्दल तीव्र असंतोष व ब्रिटिश सत्तेबद्दल बेपर्वाई व अनादर मोठ्या प्रमाणावर निर्माण करणारे आणि रचनात्मक कार्याचे प्रभावी प्रणेते म्हणून त्यांस हें स्थान मिळतें. राजकीय चळवळींतहि ज्याला Mystical shrewdness म्हणतां येईल, ज्याला ते स्वतः आपली 'बनिया' वृत्ति म्हणत, त्याचीं अनेक उदाहरणें आहेत व म्हणूनच संतवृत्ति असूनहि एक प्रकारचा धूर्तपणा व धोरणीपणा त्यांच्याजवळ होता.

ज्याला Flashes of Political genius म्हणतां येईल अशा निदान दोन महत्त्वाच्या कल्पनांचे ते जनक होते. पैकीं पहिली Non-co-operation ही, व दुसरी Quit India ही. केवळ बौद्धिक कल्पना म्हणून या पूर्णतया नव्या नव्हत्या. परंतु जिवंत व्यावहारिक राजकीय कार्यक्रम म्हणून त्या गांधीजींनींच सांगितल्या व अंशतः तरी आचरणांत आणविल्या. हिंदुस्थानांतील त्यांच्या राजकीय जीवनाच्या आरंभीं व अंतीं, त्या कल्पना पुढें मांडल्या गेल्या व त्याच प्रतिभेच्या भांडवलावर सतत तीस वर्षेपर्यंत या देशांतील सर्व नेत्यांवर त्यांनीं असामान्य प्रभुत्व मिळविलें.

गांधी विद्यमान पुढाऱ्यांत निव्वळ मुत्सद्देगिरींतही कांहीं अर्थीं सर्वश्रेष्ठ होते. त्याचीं कारणें दोन. एक, ते स्वतः म्हणत त्याप्रमाणें त्यांची मूळ 'बनिया' प्रकृति; म्हणून, संत झाले तरी, मनुष्यस्वभावांतील खांचाखोंचा व वैयक्तिक व सामाजिक स्वभावदोष (Weaknesses) त्यांना साहजिक समजत व जीवनविषयक विशिष्ट आडाखे त्यांना बांधतां येत; तसे ते इतरांस येत नसत. शिवाय आपलें नैतिक व आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व त्यांनीं इतकें उच्च केलें होतें कीं, जीवनांतील एका उच्च गिरिशिखरावर असलेली व्यक्ति ज्याप्रमाणें खालील सर्व गोष्टी सहज पाहूं

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्थापना
अनुक्रम..... दि. .....
क्रमांक..... दि. .....

शकते तसें त्यांचें होई व इतरांस कूट वाटणारे प्रश्नही ते त्याच तऱ्हेनें सत्वर सोडवीत.

आणखी एक अतिशय महत्त्वाची कल्पना त्यांनीं आपल्या जीवनाच्या अखेरच्या दिवसांत पुढें मांडली. त्यांचें राजकीय इच्छापत्र Last Will and Testament असें तिला म्हणतां येईल. त्यांत ते म्हणतात कीं, राजकीय संस्था म्हणून काँग्रेस या संस्थेचें कार्य समाप्त झालें असल्यामुळें ह्या संस्थेनें राजकारणांतून निवृत्त व्हावें व नैतिक, सामाजिक, आणि आर्थिक कार्य करीत राहावें. या घोषणेचें आध्यात्मिक व राजनैतिक महत्त्व ज्या दिवशीं गांधींचे अनुयायी म्हणविणारांना समजेल व पटेल तो सुदिन होय. खरोखरच, ज्याचीं सर्व बंधनें, मोह व लघुता सुटलीं आहेत अशा मुक्तात्म्याच्या दृष्टिकोणानें गांधी शेवटले कांहीं महिने वागत होते व त्यांनीं त्या वेळीं सांगितलेल्या गोष्टी व केलेल्या कृति यांचें जितकें अनुकरण या देशांत होईल तितकी आमची खरी प्रगति होईल.

गांधीजींच्या राजकीय नेतृत्वांतील माझ्या समजुतीप्रमाणें असणारा एक उणेपणा महत्त्वाचा आहे. तो म्हणजे (Democratic, Parliamentary and Consitutional) लोकशाही, प्रतिनिधिसभात्मक, कायदेशीर मार्गानें चाललेली प्रगति, जीवन, चळवळ व धोरण यांबाबत त्यांची असलेली अनास्था. गांधीजींचा समबल सहकारी म्हणून–निव्वळ अनुयायी म्हणून नव्हे–या वृत्तीचा कोणी नेता हिंदुस्थानांत या काळांत असता तर १९२४–२५, १९३१–३२, १९४१–४२, १९४४–४५ यांमध्यें परकीय व स्वकीय यांशीं वाटाघाटी करतांना ज्या चुका गांधीजींच्या या बाबतींतील अनास्थेमुळें झाल्या त्या झाल्या नसत्या. विशेषतः 'राउंड टेबल कॉन्फरन्स'मध्यें काँग्रेसचे एकमेव नेते म्हणून गांधीजींनीं केलेलीं वक्तव्यें व घेतलेल्या भूमिका यांनीं विशेषतः अल्पसंख्याक जमातीचा प्रश्न बिकट झाला तो झाला नसता, असें म्हणण्यास जागा आहे. रानडे, गोखले किंवा टिळक यांच्या तोलाचा व वृत्तीचा नेता गांधीजींबरोबर असता, तर गांधीजींच्या जागृतीच्या कार्यास बूड मिळालें असतें, त्यांत सातत्य राहिलें असतें व लोकशाही व धर्मजातिनिरपेक्ष राष्ट्र म्हणजे काय, हें हिंदी जनतेस समजलें व पटलें असतें.

गांधीजींच्या राजकीय कार्याचा समुच्चयानें विचार करून हिंदुस्थानांतील राजकारणी लोकांनीं व आजच्या राज्यकर्त्यांनीं आज व नेहमीं त्यांपासून शिकण्यासारख्या कोठल्या गोष्टी आहेत त्या पाहूं. माझ्या मतें पुढील पन्नास वर्षांत खादी-प्रसार, अस्पृश्यता-निवारण, खेडेगांवांची सुधारणा, जातीजातींतील सलोखा, इतकेंच कार्य काँग्रेस, व जनतेच्या आर्थिक व बौद्धिक परिस्थितींत सतत उद्योगानें सुधारणा करणें एवढें एकच कार्य प्रांतिक व मध्यवर्ती सरकारें करीत राहतील, तरच देशाचा तरणोपाय आहे. हिंदुस्थाननें परराष्ट्रीय राजकारणावर फार अवलंबून राहूं नये व त्यावर अधिक पैसा व शक्ति खर्च होऊं देऊं नये व ज्याला काटकसरीची राहाणी म्हणतात तिचें निग्रहानें प्रत्येक बाबतींत आचरण करावें. यांतील प्रत्येक बाब गांधीजींच्या कार्यक्रमांत व मतप्रणालींत आहे व ती महत्त्वाची आहे.

या विषयावर पुनःपुनः पुष्कळांना कटु वाटेल असें इतकें स्पष्टपणानें लिहिण्यांत कोणाही व्यक्तीचा किंवा पक्षाचा अनादर करण्याचा हेतु नाहीं. जो तो आपली परिस्थिति व सामर्थ्य यानुसार खटपट करीत असतो. परंतु बहुसंख्य वर्तमानपत्रें व व्यासपीठें आत्मघृणा (self-pity) व परस्पर-प्रशंसा (mutual admiration) यांनीं व्याप्त असल्यामुळें सामान्य जनतेस वाटणारा उद्वेग कोणी तरी मधून व्यक्त करावा व राज्यांत सर्वत्र आबादीआबाद नाहीं, असें राज्यकर्त्यांस कळावें, या हेतूनें वरील विचार प्रकट केले आहेत.

गांधींची ईश्वरभक्ति किंवा संतवृत्ति किंवा धार्मिकता याची निव्वळ हेटाळणी करणें, ते ढोंगी आहेत असें भासविणें व गांधींचें कार्यपद्धतीनें केवळ राष्ट्राची हानिच झाली असें प्रतिपादणें–हे, गांधीयुगांत जे नामोहरम झाले त्यांतील कांहींचा, नित्याचा व्यवसाय होता. या मंडळींस उत्तर देणें फारसें आवश्यक नाहीं. तुकाराम ढोंगी आहे, सॉक्रेटिस तरुण पिढीस बिघडविणारा आहे, कृष्ण कपटी आहे, असें म्हणणाऱ्यांना जें उत्तर कालानें दिलें तेंच गांधींच्या असल्या प्रतिपक्षीयांनाहि काल देईल व देत आहे. कोणीही लबाड, ढोंगी, निव्वळ बुवाबाजी करणारा मनुष्य तीस वर्षेपर्यंत कोट्यवधि

लोकांचा आवडता नेता राहूं शकेल व स्व-परजनांकडून उत्कट आदर व प्रेम मिळवूं शकेल, असें ज्यांना वाटतें त्यांच्याशीं वाद करण्यांत शहाणपणा नाहीं. गांधींच्या धर्मकारणांत व राजकारणांत दोष दाखवावयाचे असतील तर ते यापेक्षां शहाणपणानें दाखवावे, इतकेंच उत्तर त्यांस पुरें आहे. ज्यांना त्यांच्या प्रांतांत, शहरांत किंवा गल्लींतही अनुयायी नाहींत, ज्यांचे कोणीच कधीहि ऐकत नाहीं, अशा लोकांनीं गांधींना ढोंगी म्हणावें व आपल्या सत्प्रवृत्तीचा टेंभा मिरवावा हें जितके तिरस्करणीय, तितकेंच हास्यास्पद आहे. जीं आमचीं वर्तमानपत्रें, जे प्रवक्ते व जीं व्यासपीठें यांना सारासार विचार राहिला नाहीं व जबाबदारीची जाणीव नाहीं, अशांनींच वरील विधानें केलीं व जसजसे दिवस जातील तसतसा त्यांच्या विधानांचा फोलपणा अधिकच स्पष्ट होईल व इतिहासांत गांधींचे निंदक म्हणून गांधींमुळेंच त्यांची आठवण राहिली तर राहील, स्वतंत्रपणें राहणार नाहीं, याबद्दल मला शंका वाटत नाहीं.

सामान्यतः लोकव्यवहारांत व विशेषतः आपल्या देशांत एका आत्यंतिक विचारसरणीला उत्तर पुष्कळ वेळां दुसऱ्या आत्यंतिक विचारसरणीनेंच दिलें जातें. गांधी ढोंगी आहेत, याच्या उलट गांधी ख्रिस्त व बुद्धापेक्षां श्रेष्ठ आहेत, ख्रिस्त-बुद्धांनीं वैयक्तिक क्षेत्रांत नीतिमत्तेची जी उच्च श्रेणी गांठली ती गांधींनीं सामाजिक क्षेत्रांत गांठली. गांधींनीं राजकारणाचें क्षेत्र पवित्र केलें व सत्य-अहिंसेचें सामर्थ्य व्यावहारिक जगांत किती असतें तें दाखविलें—अशा प्रकारचीं मतें लेखकानें गांधीजींचे अनुयायी म्हणविणाऱ्यांकडून ऐकिलीं आहेत. स्वतः गांधीजी यांची सत्यप्रीति, त्यांचा विनय व निदान त्यांची विनोदबुद्धि यांमुळें गांधी असें समजत असतील हें शक्य नाहीं; परंतु गांधींचा आपणांस उपयोग व्हावयाचा, तो ते स्वतःला काय समजत होते यावरून नसून आम्हीं त्यांना काय, व कां समजत होतों व समजतों यावरून होईल. यास्तव वरील विचारसरणीचा व्यवस्थित विचार करणें अवश्य आहे.

याबाबत माझा सिद्धान्त काय तो थोडक्यांत आधीं सांगून मग त्याचीं प्रमाणें देतों. सिद्धान्त असा कीं, ज्याला ईश्वरदत्त देणगीनें 'देवमाणूस',

'मुक्तात्मा', किंवा 'ज्ञानी' आपण म्हणूं शकूं, असें गांधींचें व्यक्तित्व नव्हतें; इतकेंच नव्हे तर, गांधींचे सत्याचे प्रयोग व ईश्वरभक्ति यांतहि परिस्थितीमुळें व स्वभावामुळें कांहीं दोष आले. ख्रिस्त, बुद्ध, ज्ञानेश्वर, यांच्यापेक्षां गांधींची ईश्वरभक्ति व नैतिक श्रेणी उच्च किंवा यशस्वी आहे, हें मत अगदीं चूक आहे. असे असलें तरी परिस्थितीच्या अडचणींतून स्व-प्रयत्नानें गांधींनीं स्वतःची असामान्य आध्यात्मिक प्रगति केली, व याही बाबतींत आधुनिक भारताचे ते पितृतुल्य नेते होते यांत संशय नाहीं.

शुद्ध संतवृत्ति किंवा ज्याला 'Holiness' असें म्हणतां येईल असें गांधीजींचें व्यक्तित्व नव्हतें असें मीं वर म्हटलें. त्यानें पुष्कळांना अचंबा वाटेल; पण वस्तुस्थिति तशी आहे. लो. टिळक हे वैयक्तिक आचरणानें इतके पवित्र होते कीं, त्यांचे शत्रुहि त्याबाबत त्यांस दोष देऊं शकले नाहींत. तरी पण टिळक हे कडवट, तिखट, अत्याग्रही इतकेंच नव्हे तर, धोरणी व मुत्सद्दी म्हणून अंतर्बाह्य सरळ नसणारे गृहस्थ होते, असा पुष्कळांचा ग्रह आहे व टिळक भोळसट नव्हते, या अर्थानें तें खरेंही आहे. परंतु आपल्या टिळकांविषयींच्या आठवणींत आजचे गव्हर्नर—जनरल श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनीं १९२१ सालीं काढलेले उद्गार कोणी वाचले असल्यास गांधी व टिळक यांच्या व्यक्तिगत नैतिक गुणांबद्दल राजाजींसारख्या गांधीप्रेमी व बुद्धिमान् अशा गृहस्थास काय वाटे हें कोणाच्याहि लक्षांत येईल. ते उद्गार असे :—

I always felt that Lokamanya and Mahatmaji were strange contradictions of their respective philosophies .... While Mahatmaji's gospel is peace and the abolition of all wars and armed rebellions, his own nature is essentially of the military type..... So also I venture to say about diplomacy that Mahatma Gandhi is fitted by nature to practise—and does indeed in his own way practise the highest arts of diplomacy and tact.... In spite of his

insistent worship of truth he (Mahatma Gandhi) is ever ready to yield to the dictates of true expediency."

—लो. टिळकांच्या आठवणी (भाग २ रा)

ज्याला खरोखर सात्त्विक, आत्मसंतुष्ट व स्थितप्रज्ञ म्हणतां येईल असा व्यक्तिपिंड गांधीजींचा नव्हता. त्यांनीं फार प्रयत्नानें बहुशः आपलें व्यक्तिमत्त्व तसें केलें. ही माझी भूमिका एक-दोन प्रकारांनीं मांडून ती अपरिचित वाटली तरी सत्य आहे, असें दाखविण्याचा प्रयत्न मी करणार आहें. ज्यांना खरोखर महाभाग, 'प्राक्तन जन्मविद्ये' चे वारस व सिद्ध असें आपण म्हणतों त्यांस एक बुद्धीचे तरी किंवा स्वभावाचे तरी कांहीं असामान्य ईश्वरदत्त गुण लागतात. आपल्यास सुपरिचित उदाहरणें द्यायचीं तर राम, कृष्ण, बुद्ध, ज्ञानेश्वर ह्यांतच नव्हेत तर टिळक व रानडे यांच्यामध्येंहि असणारे निर्विवाद असे असामान्य व्यक्तिगुण गांधीजींमध्यें–ते त्या दोघांपेक्षां प्रत्यक्ष अधिक यशस्वी झाले असले तरी – नव्हते टिळक, रानडे दोघेहि निव्वळ बुद्धिमत्तेंत गांधींपेक्षां श्रेष्ठ होते, हें सर्वांस मान्य होण्यासारखें आहेच. परंतु या दोघांमध्यें व विशेषतः रानडे यांच्या स्वभावांत व वृत्तींत ते प्रगल्भ बुद्धीचे असूनहि जी सात्त्विकता, जी सहिष्णुता व जी खरी धार्मिक बुद्धि (Piety) होती, तितकी गांधीजींत नव्हती, असें लहानमोठ्या अनेक बाबतींत सिद्ध झालें आहे. असा तुलनात्मक उल्लेख करण्याचें कारण गांधीजींचे कांहीं अनुयायी तसा उल्लेख करतात व गांधीजींनीं रानडे-टिळक यापेक्षांच काय पण ख्रिस्त-बुद्धापेक्षांहि अधिक उच्च व प्रभावी असें आध्यात्मिक यश मिळविलें असें दाखविण्याचा प्रयत्न करतात. तें खरें नव्हे असें म्हणण त्यानें गांधीजींचा मोठेपणा नाहींसा होत नाहीं.

गांधीजी राजकीय पुढारी असल्यामुळें त्यांच्या नैतिक व आध्यात्मिक जीवनांत गौणपणा आला, प्रकृतिदोषाबरोबर व त्याहीपेक्षां अधिक परिस्थितीच्या अडचणीमुळें निर्दोष व बावनकशी आध्यात्मिकतेचा त्यांत वेळोवेळीं अभाव दिसला, अशी माझी भूमिका आहे. व्यक्तिप्रकृतिपुरतें बोलायचें तर बौद्धिक उन्नततेचा अभाव व मुक्तात्म्यांत जीवाच्या अहंकारवृत्तीचा साहजिक लोप होतो त्या लोपाचा अभाव– हे ते दोन दोष होत. गांधीजी या दोषांविरुद्ध

धैर्यानें व निष्ठेनें लढले व क्वचित् यशस्वीहि झाले. परंतु नेहमीं व कायमचा विजय जीवनाच्या शेवटल्या कांहीं महिन्यांत व आपल्या मृत्यूंतच त्यांनीं मिळविला.

गांधीजींच्या जीवनवृत्तांतील घटना व हकीगती यांच्या अनुरोधानें माझा सिद्धान्त मी पुनः मांडतों. मुख्य मुद्दा असा कीं, संतवृत्ति व मुत्सद्देगिरी या दोहींचें गांधीजींनीं एकीकरण केलें म्हणजे काय केलें, याची स्पष्ट कल्पना आपण करून घेतली पाहिजे. दोन-तीन प्रकारांनीं असें एकीकरण तत्त्वतः होऊं शकतें. एक प्रकार-समान पातळीवरून एकीकरणाचा, ज्यायोगें संतवृत्ति—मुत्सद्देगिरी किंवा मुत्सद्देगिरी—संतवृत्ति, अशांपैकीं प्रकार होईल; संतवृत्ति + मुत्सद्देगिरी हा प्रकार होऊं शकत नाहीं. कारण दोन वृत्ति विरोधी आहेत. या दोन वृत्तींपैकीं एक संतवृत्ति प्रभावी ठेवून दुसरी म्हणजे मुत्सद्देगिरी तिचें उपांग केल्यास त्यांचें खरें एकीकरण होतें; परंतु त्या दोनही वृत्ति समबल (co-ordinate) ठेवणें व क्वचित् मुत्सद्देगिरीचें वर्चस्व होऊं देणें हें संतवृत्तीस अपायकारक आहे. परिणामीं राजकारण अध्यात्म-दृष्टया उन्नत (spiritualized) न होतां, अध्यात्मकारण गढूळतें व राजकारण दुर्बल होतें. गांधीजी ज्याला स्वतःची 'बनिया' वृत्ति म्हणत त्यांतील चाणाक्षपणाचा वर उल्लेख केलाच आहे; पण चाणाक्षपणाबरोबरच त्यांत स्वार्थवृत्ति असते व ती आध्यात्मिकतेला विघातक आहे. ती राष्ट्राकरितां असली तरीहि तत्त्वतः ती अध्यात्मविघातकच आहे. ब्रिटिश राजवटीचीं व्यंगें व छिद्रें ओळखून ब्रिटिशांशीं हिंदुस्थानतर्फे गांधीजी त्यांतल्या त्यांत यशस्वी डावपेंच खेळले, या विधानांतच त्यांच्या शुद्ध संतवृत्तीला बाध येतो.

वस्तुतः गांधींचें ध्येय व दावा असा होता कीं, 'शठं प्रति सत्यं' या मार्गानेंच व सत्य आणि अहिंसेच्या राजकारणानेंच हिंदुस्थानला स्वराज्य मिळणार असेल तर मी तें मिळवीन. लो. टिळक व आपण यांच्या दरम्यान हा महत्त्वाचा फरक ते मानीत. वस्तुस्थिति अशी आहे कीं, सत्य व अहिंसा या दोनहि तत्त्वांना गांधीजींच्या राजकारणांत बरीच मुरड घातली गेली. अहिंसा या शब्दाचा अर्थ काय याच्यावर १९४२ च्या चळवळींतून जीं भाष्यें झालीं व १९४२ च्या चळवळींत व आधींहि अनेक वेळां अहिंसावादी

काँग्रेसजन कसे वागले, हें ज्यांनीं डोळे उघडे ठेवून पाहिलें आहे, त्यांना गांधींच्या चळवळी अहिंसात्मक होत्या असें म्हणणें जड जाईल. प्रत्यक्ष गांधींच्या वैयक्तिक आचारणांत अहिंसा पाळली जात असे. परंतु त्यांच्या प्रेरणेनें, नेतृत्वानें, आशीर्वादानें व त्यांच्या निदान मूक संमतीनें देशांत त्यांच्या अनुयायांकडून ज्या घटना घडून आल्या, त्या सर्व नैतिक दृष्टीनें अहिंसामय नव्हत्या. निःशस्त्र व विस्कळित समाजाकडून प्रत्यक्ष लढाया न होणें हें अहिंसा वृत्तीचें द्योतक नसून तो निःशस्त्रत्वाचा स्वाभाविक परिणाम आहे. बहुसंख्य हिंदी जनता संवयीनें मवाळ आहे व लढण्यास न्याय्य प्रसंग असतांहि लढूं इच्छित नाहीं; परंतु ती वृत्तीनें अहिंसात्मक नाहीं, गांधी तिला तशी करूं शकले नाहींत. आपापसांत व परक्यांशीं मार्गे व अजूनहि, गांधींच्या दृष्टिकोणांतून पाहिलें असतां, हिंसात्मक वृत्तीनेंच जनता वागते असें दिसतें. हें सर्व न समजण्याइतके गांधी भोळे नव्हते; इतकेंच नव्हे, तर हें लक्षांत आल्यानेंच त्यांना शेवटीं अंतकाळीं उद्विग्नता आली.

सत्य व अहिंसा हीं तत्त्वतः व व्यवहारतः निगडित असतात. एकाचें जसें व जितकें पालन होतें तितकें व तसेंच दुसऱ्याचेंहि होतें. काँग्रेसची व गांधींची म्हणविणारी आपल्या परिचयाची जी अनेक मंडळी त्यांचा निरनिराळ्या प्रसंगीं वैयक्तिक व सार्वजनिक जीवनांत जो अनुभव असेल त्यावरून, कांहीं थोडें अपवाद सोडल्यास, सत्य व अहिंसा यांचें व्रत ते कितपत पाळतात किंवा पाळूं तरी इच्छितात, हें ज्याचें त्यानें ठरवावें. अशा धरसोडीच्या वृत्तीच्या अनुयायांचा उघड त्याग न करणें इतका तरी दोष गांधीजींकडे येतोच. शिवाय तत्त्वतः गांधींना वाटे व ते म्हणत तितकें व तसें मूल्य अहिंसेला व्यवहारांत आहे कीं नाहीं हें विवाद्य आहे. टिळकांचेंच उदाहरण घ्यावयाचें तर ते गांधींच्या अर्थानें गांधींइतकेच अहिंसावादी होते परंतु शिवाय अहिंसेच्या तात्त्विक मर्यादांचेंहि त्यांना आकलन होतें. टिळकांतील स्वाभाविक, बौद्धिक व तात्त्विक उन्नतता व 'प्राक्तन जन्मविद्ये'चे संस्कार त्यांमुळें हा फरक दिसे.

गांधीजींच्या धार्मिक व आध्यात्मिक जीवनांतील कांहीं नित्य व नैमित्तिक कार्यक्रमांचा वारकाईनें विचार करण्यासारखा आहे. स्वतःच्या शुद्धीकरितां व आपल्या स्नेहाच्या वर्तुळांतील मंडळींच्या मतपरिवर्तना-

करितां त्यांनीं अनेक वेळां उपवास केले. एक किंवा दोन उपवास सोडले, तर ते सर्व सकृद्दर्शनीं यशस्वीहि झाले. तरी पण, खऱ्या आध्यात्मिकतेच्या कसोटीला त्यांचे प्रसिद्ध असलेले उपवास उतरत नाहींत, असें मला वाटतें. नैतिक आचरणाची एक जीवनपियक तात्त्विक भूमिका अशी आहे कीं, शरीरक्लेश हे सदगुणांचें प्रत्यक्ष साधन कधीं होऊं शकत नाहींत. ती भूमिका पूर्णत्वदशेला पोंचलेल्या सदाचाराचें एक लक्षण मानतां येईल. तरी पण सामान्य नैतिक जीवनांत व नैतिक अभ्युदयाचें साधन म्हणून तपश्चर्या, शरीरनियमन वगैरेंना स्थान आहे असें म्हणतां येतें. मला गांधीजींच्या उपवासाबद्दल असें म्हणावयाचें आहे कीं, केवळ आत्मशुद्धि व तपस्या यांकरितां ते केले गेले नाहींत. कांहीं सामाजिक हेतुप्रीत्यर्थ ते केले गेले व म्हणून ते पूर्णतः सात्त्विक नव्हते. कदाचित् एकाद्या लहानशा कुटुंबांत किंवा आश्रमांत असले उपवास केले तर ते योग्य असूं शकतील. कारण त्यांतील सर्व मंडळींत उत्कट आपलेपणा व स्नेह असतो; म्हणून त्यांतील एकाची तपश्चर्या ही सर्वांची होते. याच्या उलट, ब्रिटिश लोक, मुसलमान, हिंदु समाज, किंवा अस्पृश्य जमात यांमधील परस्परसंबंध सुधारण्याकरितां केले गेलेले उपवास गांधीजींच्या व्यक्तिमाहात्म्यामुळें तात्पुरते यशस्वी झालेले दिसले तरी, खरोखर यशस्वी झाले नाहींत, हें झालेल्या सर्व घटना विचारपूर्वक पाहणारांस दिसून येईल. दिसायला जे त्वरित, सोपे, जवळच्या मार्गासारखे (Short cuts) वाटतात, असले उपाय परिणामीं हितकारक होत नाहींत व त्यामुळें सर्वांचें असमाधान व तेव्हां ठरविलेल्या तडजोडीचें अप्रामाणिक पालन होतें. ब्रिटिशांचा, हिंदूंचा, मुसलमानांचा हृदयपालट व अस्पृश्यांचा खरा विश्वास यांतील कांहींच या उपवासांनीं घडूं शकलें नाहीं. त्यांत फरक झाले ते व्यावहारिक व राजकीय घडामोडींमुळें झाले; ते कांहीं अंशीं गांधींच्या शेवटच्या दिवसांतील उत्कट त्यागानें झाले. सात्त्विक तपश्चर्या म्हणून निष्काम, व ज्यांना यत्किंचित् प्रसिद्धि दिली जात नाहीं असे, उपवास नैतिक कसोटीला उतरतात, दुसरे नव्हेत. दानाप्रमाणें तपश्चर्याहि गुप्त असावी. या उपवासाबद्दल स्वतः गांधीजी व त्यांचे अनेक अनुयायी यांचें खरें मत काय होतें, हें गांधीजी इतरांना सहसा उपवास करण्याचा सल्ला देत नसत, तो कां देत नसत

यावरून, व गांधीजींव्यतिरिक्त इतरांच्या उपवासाबद्दल आतां अधिकाधिक प्रामाणिकपणें होत असलेल्या मतप्रदर्शनावरून दिसून येतें.

सामुदायिक प्रार्थनेला गांधीजींच्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान होतें. 'प्रार्थना' ह्या क्रियेचें व ह्या अनुभवाचें सुसंस्कृत मानवी जीवनांत अत्युच्च स्थान आहे. सान्त व मर्यादित जीवाचा अनंत परमात्म्याला पोंचण्याचा तो मार्ग आहे व सर्व अभ्युदय आणि निःश्रेयस यांचें तें अचूक साधन आहे. आपापल्या आश्रमांत सर्व सिद्ध व साधक प्रार्थना करतात व करवितात. हिंदुसमाजापुरतें बोलावयाचें तर, माझ्या मतें सामुदायिक प्रार्थना व इतर धार्मिक विधींचें आचरण यांच्याबद्दलची आज असलेली अनास्था अतिशय अनिष्ट आहे व जुन्या धार्मिक व सामाजिक चालीरीति व विधि पुन. विचारपूर्वक करूं लागणें हिंदुसमाजाच्या उन्नतीकरितां अत्यंत अवश्य आहे. परंतु प्रार्थना ही खरोखरच निरपेक्ष असली पाहिजे. 'देवा, मला अमुक दे' याऐवजीं, 'देवा, मला योग्य तें देशीलच' या वृत्तीची पाहिजे. स्वराज्याचें दानहि त्यांत मागूं नये. प्रार्थनेला येणारी मंडळी पापभीरु व जबाबदार वृत्तीची असावी. १९४५ पासून गांधींच्या प्रार्थनेला जमणें ही कुतूहलाची, करमणुकीची बाब होऊन हजारोंनीं जनसमुदाय जमे. त्यांतील शेंकडा एकानें तरी गांधीजींच्या प्रार्थनेंतीला उपदेश ऐकला असता तर पुष्कळच अनर्थ टळले असते. याच मंडळींत गांधीजींच्या उपदेशाचा तिरस्कार करणारे, त्याबद्दल चीड येणारे लोक असत, हें तर पुढील घटनांवरून सिद्ध झालेंच; परंतु जे इतर निरुपद्रवी लोक जमत, ते प्रायः निरुपयोगी व प्रार्थनेला नालायक असत. अशांकरितां व अशांबरोबर प्रार्थना करण्यापेक्षां गांधीजींनीं सार्वजनिक प्रार्थना बंद करून खरोखर आपल्या वृत्तीच्या असलेल्या थोड्या लोकांत ती केली असती तर फार बरें झालें असतें. सार्वजनिक सभांना चटावलेल्या लोकांना प्रार्थनेला येऊं देणें याचा अर्थ प्रार्थनेचें गांभीर्य लक्षांत न घेणें होय. या प्रार्थनांत माउन्ट-बॅटन, क्रिप्स-मिशन, नेहरू-पटेल यांचे मतभेद, यांवर चर्चा व ह्यांबद्दल उपदेश येई. तो आला नसता तर त्यांचें पावित्र्य अधिक राहतें! देश-परिस्थितिजन्य घटनांमुळें मोठा थोर व प्रामाणिक मनुष्यहि आपल्या उच्च

आध्यात्मिक पातळीवरून प्रसंगीं कसा खालीं ओढला जातो, याचें गांधीजींच्या अलीकडील प्रार्थना हें खेदजनक उदाहरण आहे.

या सर्व चर्चेचा शेवट एका तात्त्विक निदर्शनानें करतों. गांधीजींच्या नैतिक जीवनाची खरी मर्यादा तें केवळ 'नैतिक' आहे, तात्त्विक (Philosophical) किंवा धार्मिक (Religious) नाहीं ही आहे. नीतिमत्तेचा दृष्टिकोण प्रायः भावनानिष्ठ म्हणून कांहींसा अंध, व्यक्तिनिष्ठ म्हणून कांहींसा अहंकारयुक्त व कृत्रिम, कार्यनिष्ठ म्हणून कांहींसा अविचारी व उथळ असतो. म्हणून जीवन्मुक्त, किंवा भागवत किंवा वैष्णवजन अशा व्यक्तींच्या जीवनांत जी सहजता, जो प्रसाद, जो पूर्ण परंतु शांत प्रकाश, जी सहिष्णुता, जी गतिमान् स्तब्धता असते ती त्यांत असूं शकत नाहीं.

वरील विवेचनांत जें गुणदोषदर्शन केलें त्यांतील दृष्टिकोण सत्यान्वेषक विद्यार्थ्याचा आहे. ज्याला आपण 'Standard' किंवा 'आदर्श' म्हणूं त्याशीं तुलना करतां परमेश्वराशिवाय कोठचीहि व्यक्ति उणीच ठरणार. त्यामुळें सामान्य माणसांशीं तुलना करतां गांधींचा असामान्य मोठेपणा व थोरपणा कमी होत नाहीं. गांधींपासून आपण जर कांहीं शिकणार असलों तर ग. ज. राजाजी यांनीं नुकतेंच म्हटल्याप्रमाणें आपण त्यांचा 'देव' करूं नये. यांतच त्यांच्याबद्दल खरी आदरबुद्धि आहे. उत्साही परंतु उथळ अनुयायांच्या पद्धतीप्रमाणें अनावश्यक तुलना करून इतर मोठ्या व्यक्तींपेक्षां गांधी श्रेष्ठ होते असें दाखविण्याचा प्रयत्न करणें खऱ्या गांधीभक्तीचें द्योतक नसून वृथाभिमानाचें आहे.

गांधीजींचें व्यक्तिमत्त्व व त्यांचें कार्य याबद्दल जें विवेचन वर केलें त्याचा सारांश व तात्पर्य थोडक्यांत पण स्पष्टपणें सांगून हा लांबलेला लेख पुरा करतों. कोठल्याहि मापानें मोजल्यास ज्यास 'युगपुरुष' असें संबोधावें असें गांधीजींचें व्यक्तिमत्त्व होतें व जसजसा काळ अधिक जाईल तसतसे त्यांच्या जीवनांतील गौण भाग विसरले जाऊन त्यांचें माहात्म्य उठावदार दिसेल. त्यांनीं हिंदुस्थानची केलेली सेवा मोठी असली तरी इतिहासांतील त्यांचें स्थान त्या सेवेपेक्षां त्यांच्या नैतिक, सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक कामगिरीवरून ठरेल. त्या कामगिरीला त्यांच्या

प्रभावी राष्ट्रसेवेचें उत्तम कोंदण मिळालें असें सकृद्दर्शनीं वाटलें तरी त्यानें, त्या कामगिरींत कांहीं दोष व उपाधि आल्या आहेत. ख्रिस्त व बुद्ध हे राजकीय पुढारी नव्हते. यामुळें त्यांचें क्षेत्र व कार्य कांहींसें मर्यादित परंतु सरमिसळ नसलेलें व अधिक शुद्ध झालें. हिंदुस्थानची पार्श्वभूमि गांधींच्या जीवनास मिळाली ही घटनाहि त्यांच्या खऱ्या कार्यास सर्वस्वीं हितकारक नव्हती. कारण अनेक प्रकारें मागासलेल्या व अधोगतीला पावलेल्या राष्ट्राचें नेतृत्व यशस्वी रीतीनें संभाळणें एका अर्थीं सोपें, परंतु दुसऱ्या अर्थीं दुष्कर व सदोष ठरतें. राष्ट्रांतील जनतेच्या वैगुण्याचा ठसा नेत्याच्या जीवनावर व कार्यावर उमटल्याशिवाय राहात नाहीं.

गांधीजींचे अनुयायी म्हणविणारे सर्व लोक व सामान्यतः हिंदी जनता यांना यापुढें तरी गांधीजींशीं घडलेल्या निकट सहवासाचा खरा फायदा व्हावा अशी इच्छा असेल, तर त्यांस पुष्कळच आत्मनिरीक्षण करण्याची आवश्यकता आहे. तसें त्यांनीं केलें तर आशिया खंडाच्या व जगाच्या नेतृत्वाच्या लंब्या-चवड्या गप्पा न मारतां, आपल्या राष्ट्राच्या जीवनाकरतां अगदीं अवश्य असलेली आर्थिक परिस्थिति निर्माण करण्याचा प्रयत्न करून सामान्य नैतिक मूल्यें व शील इतकीं मिळवावीं हें त्यांस समजेल. गांधींचें राष्ट्र म्हणवून घेण्यास आपणांस पुष्कळच मार्ग आक्रमावा लागेल. परंतु निदान अगदीं दुसऱ्या टोंकास तरी न जाण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणें करावा. तरच आपला व्यावहारिक राजकारणांतहि कांहीं पाड लागल. शिवाय गांधींच्या जीवनांतील मूल्यें कोणतीं व उपाधि कोणत्या, यांचाहि आम्हीं विचार करावयास हवा. गांधीजी मोठे असले तरी मानव होते व आमच्यांतले होते म्हणून त्यांच्या कार्यांत अनेक दोष आले. 'यानि अस्माकं सुचरितानि' तींच आदर्श माना, असें इतर महाभागांप्रमाणें गांधीजीही जन्मभर सांगत असत हें विसरूं नये—

I am but a poor instrument of truth; let not those, who profess to follow me, follow me who am but a weak reed, but live up to that which has been my guiding star in my constant but often unsuccessful effort.'

या अर्थाचे विचार गांधीजींनीं किती वेळां तरी प्रकट केले आहेत.

वरील सर्व विवेचनांत मुख्यतः गांधीजींचे अनुयायी व कांहीं बाबतींत त्यांचे विरोधक यांचाच उल्लेख आला असला तरी गांधीजींच्या चरित्रावरून त्यांच्या बरोबरच इतरांनींहि बोध घेण्यासारखा होता, आहे व घेणें आवश्यक आहे. गांधीजींच्या कार्यांत दोष राहिले असतील तर त्याबद्दल गांधीजींचे अनुयायी व प्रतिपक्षी यांव्यतिरिक्त इतर म्हणजे सुशिक्षित वर्गापैकीं बहुसंख्य यांचेवरही उत्तरदायित्व येतें. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाकडे व कार्याकडे या समाजानें अक्षम्य दुर्लक्ष केलें म्हणून त्यांतील गुणांचें पूर्ण चीज होऊं शकलें नाहीं व उणीवा भरून निघाल्या नाहींत. आतां तरी अनुयायी, व सापेक्षतः अनुपेक्षा दाखविणारे इतर सर्व एकत्र येऊन गांधीजींच्या ध्येयाबद्दल व पद्धतीबद्दल विचार करतील तर देशाचें खरें हित होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्वतंत्र
पुस्तक क्र. ७४९३८ दि. १०/८/६८
खाते क्र. १९६३ दि. ७/३/७१
मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
१२३०६
(स्थळ प्रत)
REFBK-0013309

'पांच थोर नेते' या पुस्तकाप्रमाणेंच वाचनीय, मननीय आणि विचारप्रवर्तक अशीं आमचीं पुढें दिलेलीं कांहीं पुस्तकें.

अवश्य वाचा ! !

म. गांधी दर्शन : ले. पां. श्री. आपटे गुरुजी **मू. रु. २-००**

पांच थोर नेत्यांपैकींच एक, भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासांत ज्यांचें नांव अग्रभागीं लिहिलें जातें व आपल्या कृतीनें महात्मा पद प्राप्त करून घेणारे राष्ट्रपिता म. गांधी यांचें सुसंगत आणि उद्‌बोधक चरित्र.

महर्षि कर्वे चरित्र : ले. **वि. के. महाबळेश्वरकर** **मू. रु. ०-५०**

सार्वजनिक कामांत पडलेल्या व आजन्म परोपकारार्थ आणि स्त्रियांच्या उद्धारार्थ चंदनाप्रमाणें देह झिजविणाऱ्या महापुरुषाचें छोटें चरित्र.

कै. केतकर-चरित्र : **मू. रु. २-००**

पुणें अ. वि. गृहाचे कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांचें विद्यार्थी व ध्येयनिष्ठ समाजसेवक यांना मार्गदर्शन करणारें चरित्र.

माझा जन्मभरचा उद्योग : ले. **कै. न. चिं. केळकर** **मू. रु. २-००**

लेखकांनीं स्वतःच लिहिलेलें वाङ्मयविषयक आत्मचरित्र.

सदाचार-चिंतनी : चिंतक **डॉ. ग. श्री. खैर** **मू. रु. २-००**

थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. खैर यांनीं सदाचारास पोषक तसेंच व्यवहारास व न्यायास धरून व्यक्तीनें कसें वागावें यांवर सुविचार रूपानें केलेलें मार्गदर्शन.

सांस्कृतिक सुविचार-शतक : ले. **वा. श्री. पुरोहित** **मू. रु. २-००**

ज्यांतून मोठेपणीं थोर नेते निर्माण होणार आहेत, त्या आजच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या मनावर योग्य संस्कार घडविणाऱ्या व नैतिक शिक्षण देणाऱ्या सांस्कृतिक विचार शतकांची ज्ञान-दीपमाला.

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

कपटनीति यांबरोबरच महात्मा गांधींसकट त्यांच्या बहुसंख्य अनुयायांमधला मुत्सद्दीपणाचा व एकसूत्रीपणाचा अभाव हींच त्याचीं कारणें होत, असें दिसून येईल. मुसलमान म्हटला कीं तो लबाड व दुष्टच, अशीच ज्यांची विचारसरणी असेल त्यांची गोष्ट वेगळी; परंतु मुसलमान लोकहि आपणांसारखेच मानव आहेत व हिंदीहि आहेत; मग ते एकदम असे देशद्रोह्यांसारखे कां वागूं लागले हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे व त्या बाबत पुष्कळच आत्मनिरीक्षण करतां येण्यासारखें आहे. अस्पृश्य जमातीचा प्रश्न अद्यापि समाधानकारक रीतीनें सुटलेला नाहीं व आज तो दबलेला दिसत असला, तरी केव्हांना केव्हां तरी तो हिंदुस्थानच्या प्रगतीच्या आड पुनः येईल अशी भीति आहे. त्याचेंहि कारण म्हणजे गांधी व त्यांचे अनुयायी यांची धरसोडीची वृत्तीच. गेल्या प्रांतिक निवडणुकींत अस्पृश्य समाजानें मोठ्या बहुमतानें निवडलेले उमेदवार नंतर सार्वत्रिक मतनोंदणींत अयशस्वी होणें, डॉ. आंबेडकर यांना घटनासमितींत निवडून येण्याकरितां बंगालपर्यंत जावें लागणें, हैद्राबाद संस्थानांतील अस्पृश्य समाजाचा रझाकारांना किंवा निदान हिंदविरोधी गटांना मिळत असलेला पाठिंबा, या घटनांचा नीट विचार केला तर या जमातीचा प्रश्न न्याय्य व समाधानकारक रीतीनें सोडविला गेलेला नाहीं हें स्पष्ट होईल. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचे तर जो ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रश्न आम्हीं सोडविला असें काँग्रेसचे येथील नेते म्हणत होते, तो सुटलेला नाहीं, हें 'बहुजनसमाज' पक्षाची स्थापना दाखवीत आहे.

गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमांपैकीं अतिशय महत्त्वाची आणखी एक बाब म्हणजे खादी. स्वावलंबन, साधेपणा व न्याय्य अर्थविभागणी यांनींच हिंदुस्थानचा (व जगाचाहि) दारिद्र्याचा प्रश्न सुटूं शकेल व याबाबत नेत्यांनीं उदाहरण घालून दिलें पाहिजे, हा खादीच्या कार्यक्रमाचा खरा अर्थ; परंतु गांधींच्या हयातींतच त्यांच्या व्यापारी मित्रांनीं व त्यांच्या बहुसंख्य काँग्रेस अनुयायांनीं खऱ्या खादीला वाणीनें नसला तरी कृतीनें धोका दिला ! खादी वापरली; पण ती मिलची किंवा जपानीहि ! ! व वापरली तीहि काँग्रेस-संस्थेंत व तिच्याकरवीं इतरत्र निवडून येण्याकरितां ! ! ! ही गोष्ट गांधींसारख्या चतुर मनुष्याच्या लक्षांत आली नसेल, हें शक्य